# दैनिक राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक २६५ I बुधवार ८ जुलै २०२६

I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com


## पंचभूत व कुंडलिनी...



'सहजयोग'

भाग १०२

आता जे काही आपण वेदात वाचलेलं आहे हे सर्व काही फक्त ब्रम्हशक्ति वर लिहिलेलं आहे. आश्चर्याची गोष्ट आहे, की आपण एकच घेऊन बसलो आहे. ज्यावेळी मानव संसारात आला, तेव्हा त्यालासुद्धा क्रिया करण्याची इच्छा झाली. इच्छाशक्ति तर त्याच्यात होतीच; पण क्रिया करण्याची इच्छा झाली. क्रिया करण्यासाठी, आधी त्याला पहिला सामना करावा लागला, तो पाच पंचमहाभूतांचा. हे पाच पंचमहाभूत आपल्यामध्ये आले कुठून? तर त्याच्या पाच तन्मात्रा, त्याच्या आधी महत्-अहंकार आदी, असे एकंदर चोवीस गुण आहेत ते. ह्या सर्व शक्तींतनं ते चोवीस गुण प्रकट झाले आणि त्यांनी संसारामध्ये पंचमहाभूतं आली. ह्या पंचमहाभूतांना हातात कसं घ्यायचं? त्याच्यावर मास्टरी कशी मिळवायची? त्यांना उपयोगात कसं आणायचं? त्यांना जाणून कसं घ्यायचं? ह्या सर्व पंचमहाभूतांवर काहीतरी एक-एक दैवत आहे, एक-एक; अशी काहीतरी शक्ति आहे की जी त्याला कंट्रोल करते. प्रत्येक पंचमहाभूताला एक शक्ति आहे जी त्याला सांभाळुन आहे आणि तीच त्याला अबाधित वाहत आहे. तेव्हा त्यानी प्रत्येक, अग्नी-वायू वगैरे, प्रत्येक देवतांची पूजा सुरुवातीला केली. विशेषतः यज्ञ वगैरे जेवढे आहेत ते सगळे ह्या पंचमहाभूतांना खुश करण्यासाठी केलेले आहेत. ही पूर्वीची वेळ आहे. ज्यावेळेला मानवानी कृषी सुरुवात केली किंवा कोणत्याही क्रियेला सुरुवात केली, त्यानी घरं बांधायला सुरु केली किंवा त्यानी मोठमोठाल्या संस्था स्थापन केल्या, त्यावेळेला त्यांना पंचमहाभूतांवरती पहिल्यांदा मास्टरी मिळवायची होती. म्हणून त्यानी यज्ञ, हवन वगैरे करून त्या पंचमहाभूतांना जागृत केलं. त्यांना जागृत करतांना त्याला साधवणं आलं की त्याच्यातही सात शक्त्या आहेत. त्या सात शक्त्यांपैकी एक शक्ति गायत्री आहे, सावित्री आहे, अशा अनेक सात शक्त्या आहेत. तेव्हा गायत्री मंत्र हा त्या वेदातनं निघाला आणि गायत्री मंत्र हा सुद्धा पिंगला नाडीवरती बसलेल्या सर्व देवतांना, म्हणजे पंचमहाभूतांवर राज्य करणाऱ्या सर्व देवतांना, उजव्या बाजूला असलेल्या, विराटाच्या उजव्या बाजूला असलेल्या सर्व देवतांना जागृत करण्यासाठी – एक महाशक्ति माणसाने निर्माण केली.

२३ सप्टेंबर १९७९,मुंबई. www.sahajayogamumbai.org 8871519191

सौजन्य : निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी



आळंदी



नाशिक

# पाच दिवस वादळी पावसाचा इशारा

## नागरिकांनी स्थानिक प्रशासनाच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** मुंबई वेधशाळेने राज्यासाठी पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज जाहीर केला असून, विविध भागांत मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि काही ठिकाणी उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. ७ जुलै रोजी पालघर, नाशिक घाट आणि पुणे घाट परिसरासाठी रेड अलर्ट देण्यात आला आहे. ७ जुलै रोजी मुंबई शहर, मुंबई उपनगर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, कोल्हापूर घाट,अहिल्यानगर, धुले जळगाव, वाशीम आणि वर्धा, नागपूर येथे यलो अलर्ट देण्यात आला आहे. तर ठाणे, रायगड, नाशिक, नंदुरबार, बुलडाणा, अकोला, सातारा घाट आणि अमरावती येथे ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

### मुळा धरणाची सद्यस्थिती

**७ जुलै २०२६ रोजी सकाळी ६ वाजेपर्यंत मुळा धरणात ७,२२६ एमसीएफटी पाणीसाठा नोंदविण्यात आला आहे. धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील पावसामुळे कोतूळ येथे ३७,८७५ क्युसेक वेगाने पाण्याची आवक सुरू आहे. मात्र, सध्या मुळा उजवा व डावा कालवा बंद ठेवण्यात आला असून मुळा नदीपात्रातही कोणताही विसर्ग करण्यात आलेला नाही. पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे आगामी काही दिवसांत धरणातील पाणीसाठ्यात आणखी वाढ होण्याची शक्यता जलसंपदा विभागाकडून व्यक्त करण्यात येत आहे.**

### भंडारदरा धरण निम्म्याहून अधिक भरले

**अहिल्यानगर : जिल्ह्यातील प्रमुख धरणांच्या लाभक्षेत्रात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे पाणीसाठ्यात लक्षणीय वाढ होऊ लागली आहे. विशेषतः भंडारदरा व मुळा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात सातत्याने होत असलेल्या पावसामुळे धरणांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाण्याची आवक सुरू झाली असून आगामी काही दिवसांत साठ्यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.**

८ जुलै रोजी पालघर, नाशिक घाट, रायगड, रत्नागिरी, कोल्हापूर घाट, बुलडाणा, अकोला, अमरावती आणि वर्धा येथे यलो अलर्ट राहणार असून, पुणे घाट आणि सातारा घाट परिसरात ऑरेंज अलर्ट असेल.९ जुलै रोजी रत्नागिरी, सातारा घाट, पुणे घाट, खंडाळा घाट, चंद्रपूर आणि गडचिरोली येथे यलो अलर्ट देण्यात आला आहे.१० जुलै रोजी वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली आणि यवतमाळ जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट कायम राहणार आहे. ११ जुलै रोजी अमरावती, वर्धा, नागपूर आणि चंद्रपूर येथे यलो अलर्ट देण्यात आला आहे.मुंबई वेधशाळेने नागरिकांनी स्थानिक प्रशासन व हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करून आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.

सोमवारी सायंकाळी ६ वाजेपर्यंतच्या आकडेवारीनुसार, भंडारदरा धरणात ५,६०४ दशलक्ष घनफूट (एमसीएफटी) म्हणजेच ५०.७६ टक्के पाणीसाठा झाला आहे. त्यामुळे जिल्ह्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असलेले भंडारदरा धरण निम्म्याहून अधिक भरले असून शेतकरी व नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

निळवंडे धरणातही २,११६ एमसीएफटी (२५.३८ टक्के) पाणीसाठा झाला असून वरच्या भागातून पाण्याची आवक सातत्याने सुरू आहे. दरम्यान, मुळा धरणाच्या लाभक्षेत्रातही जोरदार पाऊस सुरू असल्याने त्या धरणातील पाणीपातळीत वेगाने वाढ होत असल्याची माहिती जलसंपदा विभागाच्या सूत्रांनी दिली.

याशिवाय आढळा धरणात ३८९ एमसीएफटी (३६.७० टक्के) तर वाकी धरण १०० टक्के भरले असून तेथून २,१९९ क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू आहे.

हवामान विभागाने पुढील दोन दिवस घाटमाथा व धरणांच्या पाणलोट क्षेत्रात मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त केला असल्याने प्रमुख धरणांतील पाणीसाठ्यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे जलसंपदा विभाग परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून असून नदीकाठच्या नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# शरद पवारांची राष्ट्रवादी महायुतीच्या वाटेवर?

### जयंत पाटील-विनोद तावडे यांच्यात बंद दाराआड चर्चा; राजकीय वर्तुळात नव्या समीकरणांची चर्चा





प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** राज्यातील 'ऑपरेशन टायगर'च्या राजकीय चर्चेची धूळ अद्याप खाली बसलेली नसतानाच महाराष्ट्राच्या राजकारणात नव्या समीकरणांची चर्चा सुरू झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे माजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि भाजपचे वरिष्ठ नेते विनोद तावडे यांच्यात मुंबईतील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये शुक्रवारी बंद दाराआड बैठक झाल्याची माहिती समोर आली आहे. या भेटीनंतर राज्याच्या राजकीय वर्तुळात विविध तर्क-वितर्कांना उधाण आले आहे.

विश्वसनीय सूत्रांच्या माहितीनुसार, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाने महायुतीत सहभागी झाल्यास पक्षाच्या वाट्याला काय येऊ शकते, तसेच संभाव्य राजकीय समीकरणांबाबत प्राथमिक स्वरूपाची चर्चा या बैठकीत झाल्याचे सांगितले जात आहे. बैठकीनंतर जयंत पाटील यांनी पक्षातील एका वरिष्ठ नेत्याशीही स्वतंत्र चर्चा केल्याची माहिती समोर आली आहे.

दरम्यान, जयंत पाटील यांनी विनोद तावडे यांच्याशी भेट झाल्याचे मान्य केले आहे. मात्र, या भेटीत कोणतीही राजकीय चर्चा झाली नसून केवळ अनौपचारिक संवाद झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

राज्यातील बदलत्या राजकीय घडामोडी, पक्षांतराच्या चर्चा आणि नव्या सत्तासमीकरणांच्या पार्श्वभूमीवर या भेटीकडे विशेष महत्त्वाने पाहिले जात आहे. अद्याप कोणत्याही पक्षाकडून अधिकृत भूमिका जाहीर करण्यात आलेली नसली, तरी या भेटीमुळे आगामी काळात महाराष्ट्राच्या राजकारणात मोठ्या घडामोडी घडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

राजकीय विश्लेषकांच्या मते, या बैठकीचे पडसाद आगामी राजकीय निर्णयांमध्ये उमटू शकतात. मात्र, अधिकृत घोषणा होईपर्यंत या घडामोडीकडे केवळ राजकीय चर्चेच्या स्वरूपातच पाहण्याची गरज असल्याचे मतही व्यक्त केले जात आहे.

# पूरग्रस्त आळंदीसाठी १० कोटींचा विशेष निधी!

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून कोसळत असलेल्या मुसळधार पावसामुळे आणि आलेल्या महापुरामुळे श्रीक्षेत्र आळंदी येथील नागरी व पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर, तेथील पायाभूत सुविधांच्या पुर्नउभारणीसाठी राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने १० कोटी रुपयांचा विशेष निधी मंजूर केला आहे. ही सर्व विकासकामे तातडीने आणि युद्धपातळीवर सुरू करण्याचे निर्देश राज्याचे उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी आळंदी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी माधव खांडेकर यांना दिले आहेत.

आगामी आषाढी एकादशीच्या पालखी सोहळ्यासाठी लाखो वारकरी आणि भाविक आळंदीत दाखल होत आहेत. परंतु, मुसळधार पावसामुळे व पुरामुळे या भाविकांसाठी उभारण्यात आलेली तात्पुरती शौचालये वाहून गेली आहेत. तसेच आळंदी येथील जलशुद्धीकरण केंद्र पाण्याखाली गेले असून, पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपलाईनचेही मोठे नुकसान झाले आहे.

अनेक ठिकाणचे पथदिवे कोसळले असून बहुतांश भागातील रस्ते उखडले आहेत, तर नदीवरचे संरक्षक कठडेसुद्धा काही ठिकाणी तुटले आहेत. यामुळे आळंदीत दाखल होणाऱ्या भाविकांची व स्थानिक नागरिकांची मोठी गैरसोय होत होती.राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेदेखील आळंदीतील भाविकांना होणारी गैरसोय दूर करण्यासाठी आणि परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी मार्गदर्शन करत आहेत.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीसुध्दा मंगळवारी दुपारी आळंदी नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांशी थेट दूरध्वनीवरून चर्चा करून परिस्थितीचा सविस्तर आढावा घेतला.

तसेच, आळंदीत पोहोचलेल्या वारकऱ्यांशीदेखील व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून संवाद साधून त्यांच्या अडचणी समजावून घेतल्या.या महत्त्वाच्या चर्चेनंतर आळंदी येथील अत्यावश्यक कामांसाठी नगरविकास विभागाने तातडीने १० कोटी रुपये मंजूर केले असून, अवघ्या काही तासांत यासंबंधीचा शासन निर्णयसुद्धा प्रसिद्ध करण्यात आला आहे.

# शरद पवार एनडीएत असते तर राष्ट्रपती असते

## मला राष्ट्रपती पदात रस नाही मंत्रीच बरा – ना. आठवले

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** शरद पवार जर २०१४ साली एनडीए मध्ये सोबत आले असते तर ते या देशाचे राष्ट्रपती बनले असते, असा खळबळजनक दावा केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री नामदार रामदास आठवले यांनी काल शिर्डीत केला असून मला राष्ट्रपती पदाबाबत रस नसल्याचे त्यांनी सांगितले. ऑपरेशन टायगरच्या मुद्द्यावरून अमित शहा पंतप्रधान होतील का? या चर्चांना त्यांनी पूर्णविराम दिला असून अशा कोणत्या प्रकारच्या हालचाली केंद्रात नसल्याचे आठवले म्हणाले .

काल ते अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या अनावरण कार्यक्रमास जात असताना त्यांनी शिर्डी येथील शासकीय विश्राम गृहावर परिषद पत्रकार परिषद घेत संबोधन केले .

यावेळी त्यांचे समवेत जिल्हा संपर्कप्रमुख श्रीकांत भालेराव, राज्यसचिव विजय वाकचौरे,सचिव दीपक गायकवाड, जिल्हा अध्यक्ष सुरेंद्र थोरात, युवा जिल्हाध्यक्ष पप्पू बनसोडे, भीमा बागुल, चांगदेव जगताप, कैलास शेजवळ, सुनील मोकळ, राहाता तालुका अध्यक्ष धनंजय निकाळे, रमेश गायकवाड आदी उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले की,

अजित पवार असते तर दोन्ही राष्ट्रवादी गट एकत्र होण्याची प्रक्रिया सुरू होती. शरद पवार यांचे वय झाले असल्यामुळे ते या चर्चांना नव्हते या चर्चेत सुप्रिया सुळे आणि त्यांचे आमदार खासदार अजित पवार यांच्या संपर्कात होते .दोन्ही गटाची एकच राष्ट्रवादी बनविण्याची शक्यता होती . अजित पवार यांचे म्हणणे होते **(पान ४ वर)**

### एनडीए सोडल्याने ठाकरे सेना संपली



शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी काँग्रेस आघाडी सोबत युती केल्याने त्यांच्या पक्षाचे आज हे हाल झाले होत आहे. त्यांचे सहा खासदार शिंदे गटात गेले आता पंधरा ते वीस आमदार शिंदे गटात जातील. उद्धव ठाकरे यांनी भाजप सोबत राहणे गरजेचे होते त्यांनी ते नाकारल्यामुळे त्यांच्या पक्षाचे नुकसान झाले. जर ते भाजप सोबत असते तर त्यांच्यावर ही वेळ आली नसती त्यामुळे त्यांच्या हातून सर्व निष्ठून चालले असल्याचे ना आठवले म्हणाले.

# कर्जत नगराध्यक्षपदी छाया शेलार बिनविरोध

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** कर्जत नगरपंचायतीच्या रिक्त झालेल्या नगराध्यक्षपदासाठी भाजपाच्या छाया सुनील शेलार यांची मंगळवारी बिनविरोध निवड निश्चित झाली. नगराध्यक्षपदासाठी त्यांचाच एकमेव उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने निवड निर्विवाद ठरली असून, त्याची अधिकृत घोषणा शुक्रवार (१० जुलै) रोजी करण्यात येणार आहे. या निवडीमुळे विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी सत्तांतराच्या वेळी दिलेला शब्द अखेर पूर्ण झाल्याचे मानले जात आहे.

सोमवारी तत्कालीन नगराध्यक्षा रोहिणी घुले यांनी अविश्वास ठरावापूर्वीच जिल्हाधिकाऱ्यांकडे राजीनामा दिल्यानंतर निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला होता. त्यानुसार मंगळवारी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत होती. भाजपाच्या वतीने छाया शेलार यांनी दुपारी सव्वा एकच्या सुमारास मुख्याधिकारी अक्षय जायभाये यांच्याकडे उमेदवारी अर्ज दाखल केला.

या अर्जावर गटनेते सतीश पाटील यांनी सूचक, तर नगरसेविका लंकाबाई खरात यांनी अनुमोदक म्हणून स्वाक्षरी केली. विशेष म्हणजे भाजपाचे ९ आणि आमदार रोहित पवार गटाचे ४ अशा सर्व १३ नगरसेवकांनी शेलार यांच्या उमेदवारीला पाठिंबा दिल्याने निवड बिनविरोध झाली. अर्जाची छाननी पीठासीन अधिकारी तथा प्रांताधिकारी नितीन पाटील यांनी केली आणि अर्ज वैध ठरविला.

**सत्तांतरातील आश्वासनाला पूर्णविराम**

कर्जत नगरपंचायतीत सत्तांतर घडवून आणताना राम शिंदे यांनी उर्वरित कार्यकाळात दोन नगराध्यक्षांचा फॉर्म्युला जाहीर केला होता. पहिल्या टप्प्यात रोहिणी घुले, तर दुसऱ्या टप्प्यात छाया शेलार यांना संधी देण्याचे आश्वासन **(पान ४ वर)**

# श्रीरामपूर विभागातील ६८ सराईत गुन्हेगार हद्दपार!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने सन २०२५ आणि २०२६ या वर्षातील श्रीरामपूर विभागातील एकूण ६८ इसमांना हद्दपार करण्यात आले आहे, अशी माहिती अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांनी दिली.

अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलाने गुन्हेगारी टोळ्या आणि सराईत गुन्हेगारांविरुद्ध 'झिरो टॉलरन्स' धोरण स्वीकारले असून, त्या अनुषंगाने जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका एम सुदर्शन यांनी सक्रिय गुन्हेगारांवर कडक प्रतिबंधक कारवाई करण्याचे निर्देश सर्व पोलीस ठाण्यांना दिले होते.

त्यानुसार, अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक शांतता व कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी, तसेच मानवी

> हद्दपार करण्यात आलेल्या व्यक्तींनी आदेशाचे उल्लंघन केल्यास त्यांच्यावर अत्यंत गंभीर कायदेशीर कारवाई प्रस्तावित करण्यात येईल.
>
> **सोमनाथ वाकचौरे**
> **अप्पर पोलीस अधीक्षक**
> **श्रीरामपूर विभाग**

जीवितास व मालमत्तेस धोका निर्माण करणाऱ्या सराईत आरोपींवर महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५५ आणि ५६ नुसार ही मोठी कारवाई करण्यात आली आहे.


या तडीपार केलेल्यामध्ये सोमनाथ भाऊराव कुदळे (राऊत वस्ती, श्रीरामपूर), अरबाज एजाज बागवान (वॉर्ड क्र. २), अरबाज आयुब पठाण (हुसेननगर), मनोज संजय साबळे (डावखर रोड), सौरभ संजय शिंदे (हुसेननगर), सागर भाऊसाहेब कुदळे (राऊत वस्ती, अशोकनगर फाटा), ओंकार शंकर साळवे,(निपाणीवडगाव),जीशान अब्दुल गणी शेख, (वॉर्ड नं.२ ) मोसीन बुंदी इसा कुरेशी ( वॉर्ड नं.२),दीपक बबन जाधव ( रा. श्रीरामपूर ) आणि बबलू दिलीप शेळके (वॉर्ड १, श्रीरामपूर) या १ वर्षांसाठी हद्दपार करण्यात आले, ऋषिकेश भाऊसाहेब भगत (मांजरी), नागेश संजय चव्हाण (मोमीन आखाडा) राम प्रसाद रत्नाकर वादे उर्फ रामा वादे ( रा. श्रीरामपूर ) अक्षय अशोक मते ( रा. जगताप वस्ती, भोकर ), सनी ऊर्फ रितेश खंडू जाधव ( रा. टाकळीभान ), संजय चंद्रकांत वेताळ (वांबोरी), अरिफ गफूर शेख (पिंप्री अवघड), योगेश सोपान बाचकर (बारगाव नांदूर), सागर वसंत नेटके (रा. देवगाव ता. नेवासा ),गुड्या उर्फ प्रति दौलत आरण ( रा. झोपडपट्टी घोडेगाव ता. नेवासा ), वंसत उर्फ कोंडिराम दानियल गाडे (रा. महालक्ष्मी हिवरे, ता. नेवासा ), सुरज कैलास परदेशी (रा. माळीचिंचोरा ता. नेवासा ), शाहरुख उर्फ चाटया जावेद शेख (रा. घोडेगाव ) निलेश मधूकर केदार ( रा. घोडेगाव ) यांना दोन वर्षाकरिता हद्दपार करण्यात आले.अजय दिलीप डावखर (रा. कोपरगाव ),चेतन सुनिल शिरसाठ (रा. कोपरगाव ),

सचिन संजय साळवे ( रा.कोपरगाव), प्रमोद हरी लोखंडे ( रा.पिंपळस, राहाता), प्रवीण उर्फ पचास नानासाहेब वाघमारे (पिंपळस), गणेश आप्पासाहेब शेजवळ ( रा. शिर्डी ),अक्षय सुभाष शिंदे ( रा. रुई, राहाता ),सुदर्शन शशिकांत वाणी ( रा. शिर्डी),करण सुरेश आव्हाड ( रा. शिर्डी ), बाब्या उर्फ सौरभ विकी रोजारीओ ( रा. शिर्डी ), शरद गोटीराम फुलारी ( रा. पोहेगाव ), राजेंद्र तुकाराम सानप (रा. संगमनेर ), संकेत पाडूरंग खरात ( रा. कोतूळ ६ महिन्यासाठी ), सागर विजय खरात (रा. कोतूळ, अकोले ), अनिल निवृत्ती खरात **(पान ४ वर)**


२४ वे

पुण्यस्मरण

आमचे प्रेरणास्थान



लोकनेते मारुतराव घुले पाटील

ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना व उद्योग समुहाचे संस्थापक

आमचे प्रेरणास्थान

लोकनेते मारुतरावजी घुले पाटील साहेब

यांचे पुण्यस्मृतीस विनम्र अभिवादन !!!

सर्व संचालक मंडळ, सभासद, ऊस उत्पादक शेतकरी व कर्मचारी वृंद

लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना लि., व उद्योगसमुह ज्ञानेश्वरनगर, पो. भेंडे साखर कारखाना, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर

# लाडकी बहीण : निवडणुकीच्या आश्वासनापासून शाश्वत सक्षमीकरणापर्यंतचा प्रवास




महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या दोन वर्षांत सर्वाधिक चर्चेत राहिलेली योजना म्हणजे 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना'. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या योजनेने केवळ राजकीय समीकरणे बदलली नाहीत, तर लाखो महिलांच्या आर्थिक आयुष्यालाही नवी दिशा दिली. विरोधकांनी या योजनेवर 'रेवडी संस्कृती', आर्थिक बोजा आणि मतांसाठीचा प्रयोग अशी टीका केली; तर सरकारने ती महिलांच्या सन्मानाची आणि आर्थिक स्वावलंबनाची योजना असल्याचा दावा केला. आता पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेच्या अभ्यास अहवालामुळे या योजनेकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्याची गरज निर्माण झाली आहे.

या अहवालात महाराष्ट्रातील 'माझी लाडकी बहीण' आणि ओडिशातील 'सुभद्रा' योजनेचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, या अभ्यासात रोख आर्थिक मदतीचा महिलांच्या जीवनावर सकारात्मक परिणाम झाल्याचे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. महिलांची बचत वाढली, घरगुती खर्चाची क्षमता सुधारली, आरोग्य, शिक्षण आणि दैनंदिन गरजांवरील खर्चात वाढ झाली, तसेच संपूर्ण कुटुंबाच्या आर्थिक व्यवस्थापनात सकारात्मक बदल दिसून आला. महाराष्ट्रातील महिलांच्या बँक खात्यातील सरासरी शिल्लक तब्बल ८४ टक्क्यांनी वाढली, तर मासिक खर्चात ४६ टक्क्यांची वाढ झाल्याचे निरीक्षण या अहवालात नोंदवण्यात आले आहे. ही आकडेवारी केवळ आर्थिक व्यवहाराची नसून महिलांच्या निर्णयक्षमतेत वाढ झाल्याचेही द्योतक आहे.

या अहवालातील सर्वात महत्त्वाची शिफारस म्हणजे अशा योजनांची रक्कम महागाई आणि वाढत्या जीवनमानानुसार वेळोवेळी पुनरावलोकन करून आवश्यकतेनुसार वाढवली पाहिजे. याच मुद्द्यामुळे पुन्हा एकदा १,५०० वरून २,१०० देण्याच्या आश्वासनाची चर्चा सुरू झाली आहे. महायुती सरकारने निवडणुकीदरम्यान हा शब्द दिला होता. त्यामुळे महिलांमध्ये आजही "२,१०० कधी मिळणार?" हा प्रश्न कायम आहे. पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेच्या च्या शिफारशीमुळे मागणीला वैचारि आणि धोरणात्मक आधार मिळाला आहे. मात्र, हा अहवाल म्हणजे रक्कम वाढविण्याचा सरकारी निर्णय नाही, हेही तितकेच स्पष्ट आहे. अंतिम निर्णय राज्य सरकारलाच घ्यावा लागणार आहे.

योजनेच्या यशाइतकेच तिचे दुसरे वास्तवही समोर आले आहे. तब्बल ८० लाख महिला अपात्र ठरल्या. ई-केवायसी पूर्ण न करणे, अर्जातील त्रुटी, पात्रतेचे निकष पूर्ण न होणे किंवा डेटाबेसमधील विसंगती यामुळे लाखो महिलांना लाभापासून वंचित राहावे लागले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले की, पात्र महिलांना वगळण्यात आलेले नाही; मात्र निकष पूर्ण न करणाऱ्यांना लाभ मिळणार नाही. ही भूमिका प्रशासनाच्या दृष्टीने योग्य असली तरी प्रत्यक्षात अनेक ग्रामीण आणि अल्पशिक्षित महिलांना तांत्रिक प्रक्रियेतील अडचणींमुळे लाभ गमवावा लागल्याची वस्तुस्थितीही नाकारता येणार नाही.

याच ठिकाणी सरकारपुढील खरी कसोटी सुरू होते. एखादी योजना सुरू करणे आणि ती प्रभावीपणे अंमलात आणणे यात मोठा फरक असतो. जर लाखो महिला केवळ ई-केवायसी, कागदपत्रे किंवा डिजिटल प्रक्रियेतील अडचणींमुळे बाहेर पडत असतील, तर त्या प्रक्रियाच अधिक सुलभ करण्याची गरज आहे. शासनाने गावपातळीवर विशेष शिबिरे, मोबाईल सहाय्य केंद्रे आणि डिजिटल ...ी व्यवस्था उभारली, ...नेक पात्र महिलांना पुन्हा ...ी मिळू शकते.

पंतप्रधान आर्थिक सल्लागार परिषदेच्या अहवालातील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे केवळ रोख मदत पुरेशी नाही. महिलांना डिजिटल ...साक्षरता, कौशल्य ...स, स्वयं-सहायता गट, ...ोग, बचत गट आणि उद्योजकतेशी जोडले पाहिजे. हा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण दरमहा मिळणारी आर्थिक मदत तात्पुरता आधार देऊ शकते; पण कायमस्वरूपी आर्थिक स्वावलंबन निर्माण करू शकत नाही. जर ही योजना रोजगारनिर्मिती, लघुउद्योग आणि आर्थिक सक्षमीकरणाशी जोडली गेली, तर ती महाराष्ट्रातील महिलांसाठी सामाजिक परिवर्तनाची चळवळ ठरू शकते.

मात्र, या योजनेचा आर्थिक पैलूही तितकाच महत्त्वाचा आहे. राज्यावर आधीच मोठे कर्ज आहे. अशा परिस्थितीत लाभार्थ्यांची संख्या कायम ठेवत रक्कम २,१०० करण्यासाठी हजारो कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी आवश्यक ठरणार आहे. त्यामुळे सरकारने भावनिक किंवा राजकीय दबावाऐवजी आर्थिक शाश्वततेचा विचार करूनच निर्णय घ्यायला हवा. अन्यथा एका लोकप्रिय योजनेचा भार विकासकामांवर, पायाभूत सुविधांवर किंवा इतर कल्याणकारी योजनांवर पडू शकतो.

राजकीयदृष्ट्याही ही योजना आगामी स्थानिक स्वराज्य संस्था आणि पुढील निवडणुकांमध्ये महत्त्वाची ठरणार आहे. महिलांमध्ये निर्माण झालेला विश्वास टिकवायचा असेल, तर सरकारने केवळ घोषणा न करता स्पष्ट वेळापत्रक जाहीर करणे आवश्यक आहे. २,१०० देणार असल्यास त्याची तारीख, निधी आणि अंमलबजावणीची रूपरेषा स्पष्ट केली पाहिजे. आणि जर तातडीने वाढ शक्य नसेल, तर त्यामागील आर्थिक कारणेही पारदर्शकपणे मांडली पाहिजेत.

'लाडकी बहीण' योजना ही आता केवळ मासिक आर्थिक मदतीची योजना राहिलेली नाही. ती महिलांच्या आर्थिक सहभागाची, सामाजिक सन्मानाची आणि राज्याच्या कल्याणकारी धोरणांची कसोटी बनली आहे. अहवालाने या योजनेच्या सकारात्मक परिणामांवर शिक्कामोर्तब केले असले, तरी त्याचबरोबर सुधारणा, पारदर्शकता आणि दीर्घकालीन सक्षमीकरणाची दिशाही दाखवली आहे.

सरकारने आता पुढचा टप्पा गाठण्याची वेळ आली आहे. 'लाडकी बहीण' ही केवळ निवडणूक जिंकण्याची योजना न राहता, महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम, स्वावलंबी आणि आत्मनिर्भर बनविणारी व्यापक विकास मोहीम बनली, तरच या योजनेचे खरे यश मानता येईल. १,५०० की २,१०० हा प्रश्न महत्त्वाचा आहेच; पण त्याहून अधिक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे प्रत्येक लाभार्थी महिला भविष्यात शासनाच्या मदतीवर अवलंबून न राहता स्वतःच्या कर्तृत्वावर उभी राहील का? या प्रश्नाचे उत्तर शोधण्यातच या योजनेचे आणि सरकारचे खरे यश दडलेले आहे.


# वैष्णोदेवी यात्रा पायी पूर्ण करणाऱ्या सतीश तनपुरे यांचा राहुरीत नागरी सत्कार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** श्रद्धा, सेवाभाव आणि ध्येयपूर्तीची जिद्द असेल, तर कोणतेही अंतर मोठे नसते. सतीष तनपुरे यांनी राहुरी ते माता वैष्णोदेवी ही सुमारे २२०० किलोमीटरची पदयात्रा ७५ दिवसात पूर्ण करून अशक्य वाटणारे स्वप्न प्रत्यक्षात साकार केले आहे. त्यांच्या या कार्याचा प्रत्येकाने आदर्श घेतला पाहिजे असे प्रतिपादन भाजपा प्रदेश उपाध्यक्ष, माजी खा.डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले.

आले. यावेळी भव्य मिरवणूक काढण्यात आली आणि त्यानंतर झालेल्या सत्कार समारंभात विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला.

राहुरी येथून सुरू झालेल्या या पदयात्रेत बाळासाहेब कुऱ्हाट, सुभाष चोपडे, गोरख कटारे यांच्यासह एकूण पाच जणांचा समूह सहभागी झाला होता. या सर्व पदयात्रींचाही मान्यवरांच्या हस्ते यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी हभप उद्धव महाराज मंडलिक यांनी देखील मनोगत व्यक्त केले.



राहुरी येथील उद्योजक तथा माता वैष्णोदेवीचे निस्सीम भक्त सतीषकाका साहेबराव तनपुरे यांनी राहुरी ते माता वैष्णोदेवी (कटरा) अशी सुमारे २२०० किलोमीटरची पदयात्रा यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबद्दल आयोजित भव्य सत्कार समारंभात ते बोलत होते. यावेळी माजी खा.डॉ.सुजय विखे पाटील व हभप उद्धव महाराज मंडलिक यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सतीष तनपुरे यांनी आपल्या सहकाऱ्यांसह ७५ दिवसांत ही पदयात्रा पूर्ण केली. कटरा येथे सुखरूप पोहोचून माता वैष्णोदेवीच्या चरणी संकल्पपूर्ती केल्यानंतर राहुरीत त्यांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात

या कार्यक्रमास संत कवी महिपती महाराज देवस्थान ट्रस्टचे हभप अर्जुन महाराज तनपुरे, राहुरी तालुका विकास मंडळाचे अध्यक्ष रावसाहेब तनपुरे, सुभाष फराटे-देशमुख, शितलकुमार फराटे-देशमुख, संदीप फराटे-देशमुख, नितीन तनपुरे, हर्षल तनपुरे, अक्षय तनपुरे, सुरज तनपुरे, रमेश नालकर, शनेश्वर देवस्थान ट्रस्टचे विकास बानकर, किशोर बानकर, कैलास तनपुरे, विकास तनपुरे, जितेंद्र तावरे, नगरसेवक सोन्याबापू जगधने, यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, भाविक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दीपक कदम यांना 'छत्रपती शिवाजी महाराज ज्ञानदीप गौरव' पुरस्कार प्रदान



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** स्वराज्यातून सुराज्याच्या नवनिर्माणाचा ध्यास घेतलेल्या स्वराज्य प्रतिष्ठान, शिवक्रांती प्रतिष्ठान ट्रस्ट आणि हुतात्मा बाळू गेणू स्मारक समितीच्या वतीने शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये

श्रीरामपूर येथील महाराष्ट्र अल्पसंख्याक ख्रिस्ती विकास परिषदेचे जिल्हाध्यक्ष दीपक कदम यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल 'छत्रपती शिवाजी महाराज ज्ञानदीप गौरव पुरस्कार २०२६' देऊन सन्मानित करण्यात आले.

हा सोहळा स्वराज्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रमोद आप्पा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आणि माजी पोलीस महासंचालक डॉ. सुधाकर सुराडकर यांच्या उद्धाटनाखाली संपन्न झाला. याप्रसंगी माजी राज्यमंत्री ज्योतीताई ठाकरे, संभाजीराजे जाधवराव, अभिनेत्री पियू चौहाण, सुरज भोईर आणि अनिताताई काळे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. मैत्री संस्था, सामाजिक कार्यकर्ते समन्वय समिती व मुंबई मित्र संघटनेचे या कार्यक्रमाला विशेष सहकार्य लाभले. पुरस्कार मिळाल्याबद्दल दीपक कदम यांनी सर्व उपस्थितांचे व आयोजकांचे आभार मानले असून त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

# कीर्तन विना मानधन; दक्षिणाही माऊलींच्या चरणी अर्पण

## देवीदास महाराज यांच्याकडून पालखी सोहळ्यासाठी १.०१ लाखांची देणगी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** वारकरी संप्रदायातील निस्पृह कीर्तनकार म्हणून परिचित असलेले तीर्थक्षेत्र नेवासा येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे विश्वस्त महंत पूज्य वेदांताचार्य ह.भ.प. देवीदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांनी कीर्तनातून भाविकांकडून प्राप्त झालेली एक लाख एक हजार एकशे अकरा रुपयांची दक्षिणा श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यासाठी संस्थानकडे अर्पण केली. त्यांच्या या दातृत्वाचे वारकरी संप्रदायातून कौतुक होत आहे.

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर यापूर्वीही त्यांनी 'श्रीगुरू विठ्ठल महाराज घुले दिंडी' (क्र. २) व 'ओम चैतन्य अडभंगनाथ देवस्थान दिंडी' (क्र. १०) यांना आर्थिक मदत केली होती. त्यानंतर आता पालखी सोहळ्यासाठीही त्यांनी देणगी दिली आहे.

संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे अध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग यांच्याकडे ही देणगी सुपूर्द करण्यात आली. यावेळी विश्वस्त कृष्णाभाऊ पिसोटे, कैलास जाधव, जनसंपर्क अधिकारी भैय्या कावरे, आदिनाथ महाराज पांगरे, संकेत गवळी, व्यवस्थापक रवी जमदाडे, भीमाशंकर जाधव तसेच वारकरी संप्रदायातील भाविक उपस्थित होते.

कोणतेही मानधन किंवा अपेक्षा न ठेवता संतविचारांचा प्रचार करणारे देवीदासजी महाराज यांचा आदर्श समाजासाठी प्रेरणादायी असून, त्यांच्या या निरपेक्ष दातृत्वामुळे पालखी सोहळ्याच्या तयारीला बळ मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.



# डागडुजीच नाही, ढापेही न काढल्याने खानापूर बंधारा धोक्यात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगांव :** गोदावरी नदीला नाशिक पाणलोट क्षेत्रातून १७०० क्युसेस पाणी सोडलेले असताना .श्रीरामपूर तालुक्यातील पूर्व भागात गोदावरी नदीवरील खानापूर केटीवेअर च्या बंधाऱ्यांवरील ढापे फळ्या काढलेल्या नसल्याने जलसंपदा विभागाचा ढिसाळ दुर्लक्षितपणा खानापूर शिवारातील शेतकऱ्यांनी चव्हाट्यावर आणला आहे.

गोदावरी नदीला आज रात्री पाणी येणार म्हणून खानापूर अव्वलगांव भामाठान येथील शेतकऱ्यांनी बंधाऱ्याची पाहणी केली. जलसंपदा पाटबंधारे विभागाकडून उन्हाळ्यात मे जून महिन्यात ढापे डागडुजी करण्यात येऊन बाहेर काढली जातात. परंतू यावर्षी पाटबंधारे विभागाचे अधिकारी फिरकले सुध्दा नाही. मागील वर्षी तळातील ढापे गंजून गळती वाढल्याने शेतकऱ्यांनी त्यामध्ये लाकडी ओंडक्याचे सहाय्याने गोधडच्या चिंध्या टाकून पाण्याची गळती थांबवीली होती.

तळतील ढाप्याची दुरुस्ती नाही अन्य घाटे काढण्यात आलेले नाही.गोदावरीच्या पाणी पातळीत झाली तर साईडने बंधाऱ्याला तुटण्याचा धोका पोहचू शकतो. या बंधाऱ्याची देखभाल पाहण्यासाठी नियुक्ती झालेल्या अधिकाऱ्यांकडे दोन ठिकाणचा चार्ज असल्याने. खानापूर बंधाऱ्याचे डागडुजी कडे दुर्लक्ष झाल्याचे समजते.

# गंगापूर शेतकरी खरेदी-विक्री सहकारी संघाची निवडणूक बिनविरोध

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** तालुका शेतकरी खरेदी-विक्री सहकारी संघ मर्यादितच्या संचालक मंडळाची निवडणूक सर्वपक्षीय समन्वयातून बिनविरोध पार पडली. १८ जुलै रोजी होणारी निवडणूक अर्ज माघारीच्या अंतिम दिवशी बिनविरोध झाली असून, सर्व १५ उमेदवारांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे.



या निवडणुकीत काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष किरण पाटील डोणगावकर यांच्या गटाचे पाच, आमदार प्रशांत बंब यांच्या गटाचे चार, कृष्णा पाटील डोणगावकर यांच्या गटाचे दोन आणि नगराध्यक्ष संजय जाधव यांच्या गटाचे दोन उमेदवार यांच्यासह सर्व गटांमध्ये समन्वय साधून निवडणूक बिनविरोध करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे सहकार क्षेत्रात सलोखा आणि एकोप्याचा संदेश दिल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. बिनविरोध निवडून आलेले उमेदवार: ज्ञानेश्वर दादा म्हस्के पाटील, जनार्धन कचरू चनघटे, राजाभाऊ भाऊसाहेब दंडे, भाऊसाहेब शेकनाथ बारहाते, नारायण विश्वनाथ सोलंकर, रामभाऊ शंकर धोत्रे, सुभाष विठ्ठलराव धोत्रे, लक्ष्मण मुरलीधर भुसारे, बद्रीनाथ भानुदास बारहाते, कृष्णा मुरलीधर एडके, निर्मलाबाई शिवाजी बोडखे, ज्योती संदीप कानडे, सारंगधर शंकर जाधव, नानासाहेब येडू जगताप आणि बालचंद खंडेराव जाधव.

यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष किरण पाटील डोणगावकर, सूर्यकांत गरड, भाजपचे जिल्हा बँकेचे सदस्य तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शेषराव पाटील जाधव, मारुती खैरे, पंचायत समितीचे उपसभापती राजेश्वर हिवाळे, नंदकुमार गांधीले, प्रदीप पाटील, कृष्णकांत व्यवहारे, अतुल रासकर, सोपान देशमुख, आप्पासाहेब पाचपुते, नानासाहेब सोनवणे, शिवाजी बोडखे आदींसह विविध पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते

# सहकारातील संत : लोकनेते मारुतरावजी घुले पाटील

अहमदनगर जिल्ह्यात विसाव्या शतकात राजकारण, समाजकारण, शिक्षण, उद्योग या क्षेत्रात जे ग्रामीण नेतृत्व उदयाला आले त्यामध्ये एकेकाळचे अहमदनगर जिल्ह्याचे नेते, शेवगाव-नेवासा तालुक्याचे भाग्यविधाते लोकनेते स्व. मारूतरावजी घुले पाटील हे अग्रभागी होते. त्यांनी या भागात हरितक्रांती घडवून आणली. समाजाला नवी दिशा दिली. अहमदनगर जिल्ह्याच्या विकासात भरीव योगदान दिले म्हणून अहमदनगर जिल्ह्याचाच नव्हे तर महाराष्ट्राचा स्वातंत्र्योत्तर इतिहास अभ्यासायचा झाला तर लोकनेते स्व .मारुतरावजी घुले पाटील यांचे योगदान समजून घेणे अपरिहार्य ठरते.

त्यांचा जन्म १५ सप्टेंबर १९३० रोजी झाला. उपजतच त्यांना समाजकार्याची आवड होती श्रीरामपूर येथे शिक्षण घेत असताना शाळेतील गोरगरीब विद्यार्थ्यांना त्यांनी मदत केली. वसतिगृहात राहणाऱ्या मुलांसाठी ते मित्रांच्या सहाय्याने धान्याची व पैशाची मदत गोळा करत .तो काळ पारतंत्र्याचा होता. स्वातंत्र्याचे वारे वाहू लागले होते. त्यांनी विद्यार्थ्यांचे नेतृत्व करत स्वातंत्र्यलढा समजावून घेतला. प्रभात फेरी सारख्या उपक्रमात भाग घेतला. त्यांनी दहिगावच्या पाटीलकीची सूत्रे हाती घेतली तेव्हा. या काळात हैदराबाद सरकारच्या सीमेवरून रझाकारांचा त्रास शेतकऱ्यांना होत होता तो त्रास कमी करण्यासाठी त्यांनी गावातील युवकांना एकत्र करून ग्रामसुरक्षा दलाची स्थापना करुण रझाकारांचा मुकाबला केला. तो काळ सावकारशाहीचा होता. गोरगरीब जनता सावकारी कर्जाच्या विळख्यात सापडलेली होती. अनेकांच्या जमिनी सावकर कवडीमोलाने गिळंकृत करत होते. अशा परिस्थितीत त्यांनी जिल्हा सहकारी बँकेची स्थापना करण्याचा निर्णय घेतला. जिल्ह्यातील सहकाऱ्यांच्या साह्याने अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेची स्थापना केली. बँकेमार्फत कर्ज पुरवठा सुलभ व्हावा म्हणून गावोगाव सहकारी सोसायट्या स्थापन करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित केले. शेतकऱ्यांच्या शेतीमालाला योग्य किंमत मिळावी व शेतकऱ्यांना योग्य किमतीत खते व अवजारे उपलब्ध व्हावीत म्हणून शेवगाव येथे कृषी उत्पन्न बाजार समिती व खरेदी विक्री संघ या संस्था दीर्घकाळ चालविल्या. कापसाला योग्य भाव मिळावा म्हणून शेवगाव येथे जिनिंग प्रेसिंग मिल ची स्थापना केली.

लोकनेते मारुतराव घुले पाटील यांच्यावर म.फुले, शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, म.गांधी, पंडित नेहरू यांच्या विचारांचा प्रभाव होता. खेड्यापाड्यात कर्मवीर भाऊराव पाटलांचे चाललेले शैक्षणिक कार्य पाहून ते प्रभावित झाले होते. आपल्याही परिसरातील शेतकरी, कष्टकरी, दलित, समाजाची मुले- मुली शिकले पाहिजे या हेतूने त्यांनी १९५९साली दहिगाव-ने येथे जनता शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना करून नवजीवन विद्यालय सुरू केले. वसतिगृह सुरू करून परिसरातील गोरगरीब मुलांची राहण्याची व जेवणाची मोफत सोय केली व परिसरात शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली.

१ मे १९६ साली संयुक्त महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. यशवंतराव चव्हाणांनी महाराष्ट्राची सूत्रे हातात घेतली आणि महाराष्ट्र प्रगतिपथावर नेण्यासाठी महाराष्ट्रात अनेक अनुयायी त्यांनी तयार केले त्यात लोकनेते मारुतराव घुले पाटील हे अहमदनगर जिल्हयातून अग्रभागी होते.१० वर्षे त्यांनी अहमदनगर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्षपद सांभाळले. जिल्ह्यात काँग्रेस मजबूत केली. त्यांचे संघटन पाहून यशवंतराव चव्हाण यांनी १९६२ साली त्यांना शेवगाव- नेवासा मतदारसंघातून विधानसभेची उमेदवारी दिली. ते प्रचंड मतांनी निवडून आले. तर १९६७ सालीही ते विधान सभेत निवडून गेले. विधानसभेत त्यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न पोटतिडकीने मांडले. शिक्षण हे सक्तीचे केले पाहिजे असा आग्रह धरला. १९६५ साली महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे भव्य शिबिराचे नियोजन व संयोजन त्यांनी कुशलतने केले.

सदैव शेतकऱ्यांची काळजी करणारे लोकनेते मारुतराव घुले पाटील यांच्यावर जायकवाडी धरण निर्मितीमुळे मोठा आघात झाला. शेवगाव- नेवासा भागातील हजारो एकर काळीकसदार जमीन पाण्याखाली गेली. त्या कठीण परिस्थितीत त्यांनी विस्थापितांना सावरले. त्यांना भक्कम आधार दिला. धरणग्रस्तांचे पुनर्वसन व कुटुंबातील एका व्यक्तीस शासकीय नोकरी मिळाली पाहिजे, धरणग्रस्तांसाठी जायकवाडी धरणाचे ३ टीएमसी पाणी राखीव असा कायदा विधानसभेत पास करून घेतला. गोदाकाठच्या शेतकऱ्यांना जायकवाडी बॅकवॉटरचा लाभ मिळावा म्हणून



वैयक्तिक पाईपलाईन, लिफ्ट योजना, वीजजोडणी यासाठी अहोरात्र प्रयत्न केले. सहकारी बँकेमार्फत आर्थिक पुरवठा केला. त्यामुळेच आज गोदाकाठ समृद्ध झालेला दिसतो. जायकवाडी प्रकल्पग्रस्तांच्या सुशिक्षित बेरोजगार मुलांना रोजगार उपलब्ध व्हावा म्हणून शेवगाव येथे औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू केली. तर शेवगाव- नेवासा भागातील शेतकऱ्यांच्या मुलांना उच्च शिक्षण मिळावे म्हणून नेवासा येथे ज्ञानेश्वर महाविद्यालयाची भेंडा येथे जिजामाता महाविद्यालय, कृषी तंत्र विद्यालय, वसतिगृह, आयटीआय, खेडयापाडयात माध्यमिक विद्यालये स्थापन करुन शिक्षणाचा प्रसार केला.

मुळाधरणाचे पाणी शेवगाव- नेवासा भागातील शेवटच्या घटकापर्यंत मिळवण्यासाठी त्यांनी संघर्ष केला. या पाण्यामुळे शेतीचे उत्पन्न वाढले उसासारखे नगदी पीक शेतकरी घेऊ लागला परंतु खासगी साखर कारखाने मनमानी करू लागले. शेतकऱ्यांना ऊस बांधावर तोडून टाकण्याची वेळ आली तेव्हा लोकनेते मारुतरावजी घुले पाटील व्यथित झाले. शेवगाव- नेवासा परिसरात शेतकऱ्यांच्या मालकीचा साखर कारखाना उभा राहिला पाहिजे असा त्यांनी निश्चय केला व यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, वसंतदादा पाटील, अण्णासाहेब शिंदे, यांच्या सहकार्याने खूप कष्टसहन करत १९७३ साली केंद्रशासनाकडून परवानगी मिळवली. व भेंडा येथे ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याची उभारणी केली. १२५० मे. टन गाळप क्षमतेचा साखर कारखाना १९७५ पासून सुरू झाला आणि परिसराचा चेहरामोहरा बदलला. या भागात वीज मिळाली पाहिजे म्हणून त्यांनी खूप कष्ट घेतले. दूरध्वनी मिळवण्यासाठी प्रयत्न केले. नेवासा येथील ज्ञानेश्वर मंदिरासमोर पहिल्या वीज पोलाची पूजा करण्यात आली तर नगरयेथून लाकडी पोल टाकून दूरध्वनी सुरू करण्यात आले. १९७२ साली त्यांची विधानपरिषदेवर निवड झाली. विधानपरिषदेतही त्यांनी शेतकऱ्यांचे मूलभूत प्रश्न मांडले.

शेतकऱ्यांच्या उसाला जास्तीत जास्त भाव मिळावा म्हणून त्यांनी अल्कोहोल निर्मिती प्रकल्प उभारला परंतु अल्कोहोल पासून दारू निर्मिती कटाक्षाने टाळली.

१२५०प्रतिदिनी गाळप क्षमता असणाऱ्या कारखान्याचे त्यांनी २००१ पर्यंत ५००० मे.टन प्रतिदिनी विस्तारीकरण केले सभासद बिगर सभासद असा भेदभाव न करता सर्व शेतकऱ्यांना समान भाव दिला. कामगारांना स्वतःची घरे बांधण्यासाठी कारखान्याच्या मालकीची जागा देऊन आर्थिक मदत केली. महाराष्ट्रातील एक अग्रगण्य कारखाना म्हणून नावलौकिक मिळवून दिला. त्यांच्या कार्याची राष्ट्रीय पातळीवर दखल घेतली गेली १९९५ मध्ये त्यांना इंदिरा गांधी प्रियदर्शनी पुरस्कार, १९९६ साली भारतीय उद्योगरत्न पुरस्कार, १९९७ मध्ये सहकार भूषण पुरस्कार हे पुरस्कार प्राप्त झाले तर ज्ञानेश्वर साखर कारखान्यास उत्कृष्ट कार्यक्षमतेबद्दल अनेक राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाले. सन २००० मध्ये आय.एस.ओ. प्रमाणपत्र मिळाले.

शेवगाव- नेवासा भागाला शेती, शिक्षण, वीज, पाणी, उद्योग, या बाबतीत त्यांनी स्वयंपूर्ण केले रचनात्मक ग्रामीण विकासाचा पाया त्यांनी घातला म्हणून या परिसराचे ते विकासाचे शिल्पकार ठरले आहेत. समाजकार्यात कार्यरत असतानाच त्यांचे ८ जुलै २००२ रोजी निधन झाले परंतु, त्यांनी दिलेला विचार केलेली कामे चिरंतन असून अनेक पिढ्यांना प्रेरणा देत आहे. त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव मा.आ. डॉ .नरेंद्र घुले पाटील यांनी शेवगाव-नेवासा भागाचे दोन वेळा विधानसभेत प्रतिनिधित्व केले असून त्यांच्या कार्यावर आपल्या कर्तृत्वाने कळस चढवला आहे. तर शेवगाव-पाथर्डी मतदार संघात त्यांचे दुसरे चिरंजीव मा .आ . चंद्रशेखर घुले पाटील यांनी प्रतिनिधत्व करुन मतदारसंघात सर्वाधिक विकासनिधी आणून नेत्रदीपक कार्याचा ठसा अल्पावधित जनतेत उमठवला . नातू डॉ . क्षितिज घुले पाटील शेवगाव पंचायत समितीचे सभापती व स्नुषा राजश्रीताई घुले पाटील अ . नगर जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष असताना तालुक्यात व जिल्ह्यात नेत्रदिपक विकास कामे केली आहेत एक कर्तृत्वसंपन्न, कामाचा मोठा आवाका असणारे सुसंस्कृत, चरित्रसंपन्न, जिद्दी व लढवू घुले पाटील कुटुंबिय आज लोकनेते मारुतरावजी घुले पाटील यांचे नवनिर्मितीचे अधुरे स्वप्न साकार करत आहेत हेच येथील जनतेचे भाग्य आहे. लोकनेते मारूतरावजी घुले पाटील यांचे आज पुण्यस्मरण या निमित्ताने त्यांना विनम्र अभिवादन !

**शब्दांकन -. भाऊसाहेब सावंत**
**संकलन -बाळासाहेब आरगडे**

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

दखल

## जळगाव जिल्हयातील आदिमाया शक्ती मुक्ताबाई दिंडीचे स्वागत



**नेवासा** : पंढरीच्या विठुरायाच्या दर्शनासाठी मार्गक्रमण करत असलेल्या जळगाव जिल्हयातील बाभळे वघाडी हनुमंत खेडे येथील आदिमाया शक्ती मुक्ताबाई दिंडीचे नेवासा तालुक्यातील अहिल्यानगर-छत्रपती संभाजीनगर हायवेवर असलेल्या सुरेशनगर येथे सरपंच शैलाताई उभेदळ व कल्याणराव उभेदळ परिवाराच्या वतीने उत्स्फूर्त स्वागत करत दिंडीला भोजन देण्यात आले.

कार्यक्रम प्रसंगी स्वामी रमेशानंदगिरी महाराज, पिचडगाव येथील माऊली आश्रमाचे प्रमुख महंत हभप ज्ञानेश्वर महाराज हजारे, संतसेवक लक्ष्मीनारायण महाराज जोंधळे, दिंडी प्रमुख योगेश महाराज जाधव यांची प्रमुख उपस्थिती यावेळी होती. उपस्थित संत महंतांचे संतपूजन यावेळी करण्यात आले.

यावेळी सरपंच शैलाताई उभेदळ व मार्गदर्शक कल्याणराव उभेदळ, अजित उभेदळ व पूजा उभेदळ विजय उभेदळ व दीप्ती उभेदळ यांच्या हस्ते दिंडीतील पादुकांचे पूजन करण्यात येऊन आरती करण्यात आली. सुरेशनगरगावचे मार्गदर्शक कल्याणराव उभेदळ यांनी दिंडीच्या स्वागताची परंपरा आपण कायम सुरू ठेऊ अशी ग्वाही यावेळी बोलतांना दिली.

## सोनईच्या दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान

**सोनई** : नेवासा तालुक्यातील सोनई येथील आषाढी वारीनिमित्त वारकऱ्यांच्या दिंडीचे सोमवारी (दि. ७) जुलै रोजी महादेव मंदिर परिसरातून उत्साहपूर्ण वातावरणात पंढरपूरकडे प्रस्थान झाले. 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या जयघोषात, टाळ-मृदुंगाच्या गजरात आणि विठ्ठल नामाच्या अखंड गजरात दिंडी मार्गस्थ झाल्याने परिसर भक्तिमय झाला होता.

दिंडीत सहभागी झालेल्या पुरुष वारकऱ्यांच्या हातात टाळ असून ते अभंग व हरिनामाचा गजर करीत मार्गक्रमण करत होते. महिला वारकऱ्यांनी डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन पारंपरिक वेशभूषेत सहभागी होत वारीची परंपरा जपली. पांडुरंगाच्या प्रतिमेने सजविलेला रथही दिंडीसोबत आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. रथाचे दर्शन घेण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली. विठ्ठल-रखुमाईच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. भक्तिभाव, शिस्त आणि उत्साहाचे दर्शन घडवत दिंडी पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ झाली.

## वाकडीच्या सरपंच रोहिणी आहेर यांना 'आदर्श सरपंच पुरस्कार'




**वाकडी** : राहाता तालुक्यातील खंडोबाची वाकडी येथील प्रथम लोकनियुक्त महिला सरपंच रोहिणीताई बाळासाहेब आहेर यांना सरपंच सेवा संघ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने यंदाचा 'आदर्श सरपंच पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला. गावातील पारदर्शक कारभार, स्वच्छता, महिला सक्षमीकरण आणि उल्लेखनीय विकासकामांची दखल घेऊन त्यांना हा सन्मान मिळाला. पुरस्कार स्वीकारताना रोहिणी आहेर म्हणाल्या, हा सन्मान माझा नसून संपूर्ण वाकडी ग्रामस्थांचा आहेत. मी, तो गावाला समर्पित करते.

या सोहळ्याला 'गणेश' कारखान्याचे चेअरमन सुधीर लहारे, बाबासाहेब पावसे, विष्णुपंत शेळके, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. माजी आमदार स्नेहलताताई कोल्हे व आमदार विवेकभैय्या कोल्हे यांनीही त्यांचे अभिनंदन केले.

## अनिता जगताप यांची जिल्हा नियोजन समितीत निवड, डॉ. विखे यांच्याकडून सत्कार



**शिर्डी** : शिर्डी नगर परिषदेच्या माजी नगराध्यक्ष अनिताताई जगताप यांची अहिल्यानगर जिल्हा नियोजन समितीच्या सदस्यपदी नुकतीच निवड करण्यात आली असून त्यांचे निवडीचे शिर्डीत स्वागत करण्यात आले. यावेळी डॉ सुजय विखे यांच्याकडून शाल, पुष्पगुच्छ देत सत्कार व पेढा भरवत जगताप दांपत्याचे कौतुक केले.

यावेळी डॉ. सुजय विखे म्हणाले की अनिताताई जगताप यांचं संघटनेसाठी व विखे परिवारासाठी फार मोठ योगदान असून त्या नक्कीच उल्लेखनीय काम करत त्या पदाला न्याय देतील असा आत्मविश्वास डॉ. सुजय विखे यांनी व्यक्त करत शुभेच्छा दिल्या. अनिता जगताप यांच्या जिल्हा नियोजन समितीच्या सदस्यपदी निवडीने शिर्डीची मान अभिमानाने उंचावली असून साईबाबांच्या नगरीत श्रद्धा सबुरी ठेवून प्रामाणिक काम केल्याची आज पावती मिळाल्याचे सौ अनिता जगताप म्हणाल्या.

दरम्यान जगताप यांच्या जिल्हा नियोजन समितीवर निवडीमुळे शिर्डी परिसराला निधीसाठी झुकते माप दिले जाईल अशी चर्चा शिर्डी शहरात होती.

# संगमनेरला कामगार रुग्णालयाच्या कामास सुरुवात

## चार दशकांपासूनची प्रतीक्षा संपली



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : तब्बल चार दशकांपासून प्रलंबित असलेल्या कामगार रुग्णालयाचे स्वप्न अखेर साकार होत आहे. आ. अमोल खताळ यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या रुग्णालयास शासनाची मंजुरी मिळाली असून शहरातील जाणता राजा मार्गावरी स्टेट बँकेच्या समोर असणाऱ्या इमारतीत या रुग्णालयाचे काम प्रत्यक्षात सुरू करण्या आले आहे. लवकरच हे रुग्णालय संगमनेर तालुक्यातील कामगारांच्या सेवेत दाखल होणार आहे.

या रुग्णालयाचा कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांना लाभ होणार आहे. संगमनेर तालुक्यातील कर्मचारी राज्य विमा योजनेअंतर्गत येणाऱ्या कामगारांना उपचारासाठी नाशिक, अहिल्यानगर तसेच इतर शहरांमध्ये जावे लागत होते. त्यामुळे वेळ, पैसा आणि मानसिक त्रास सहन करावा लागत होता.

संगमनेरमध्येच कर्मचारी राज्य विमा योजना रुग्णालय सुरू व्हावे, यासाठी आमदार खताळ यांनी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना यश आले असून या कामगार रुग्णालयाचे प्रत्यक्षात काम सुरू झाले आहे. या रुग्णालयाच्या माध्यमातून कामगारांना प्राथमिक उपचार, तज्ज्ञ वैद्यकीय अधिकारी यांचे मार्गदर्शन, विविध वैद्यकीय तपासण्या, औषध उपचार तसेच इतर आवश्यक आरोग्य सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे कामगारांना दर्जेदार, जलद आणि सुलभ आरोग्यसेवा मिळणार असून बाहेरगावी जाण्याची गरज लागणार नाही.

> संगमनेरच्या विकासाच्या दृष्टीने हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली कामगारांची मागणी आता पूर्णत्वास येत असल्याने विविध कामगार संघटना, सामाजिक संस्था तसेच नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. शासनाकडून मंजुरी मिळवून हा प्रकल्प मार्गी लावल्या बद्दल कामगारांनी आमदार अमोल खताळ यांचे आभार मानले आहे .
>
> **हजारो कामगारांना मोठा दिलासा-शेवाळे**

> संगमनेर शहरातील जाणता राजा मार्गावर कामगार रुग्णालय सुरू झाल्यानंतर संपूर्ण तालुक्यातील हजारो कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांना त्याचा थेट लाभ होणार आहे. सर्वसामान्यांना अधिक सक्षम आणि सुलभ आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी हा प्रकल्प मैलाचा दगड ठरेल. लवकरच हे रुग्णालय सुरू होऊन कामगारांच्या सेवेत दाखल होणार आहे
>
> **सुशील शेवाळे, तालुकाध्यक्ष, युवा सेना, संगमनेर**

# संत निवृत्तीनाथ महाराज पालखी प्रस्थानानिमित्त श्रीरामपुरात वाहतुकीत मोठे बदल

## या पर्यायी मार्गेचा अवलंब करावा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर येथून पंढरपूरकडे मार्गस्थ झालेली संत निवृत्तीनाथ महाराज पालखी आज, बुधवारी श्रीरामपूरनगरीत पदार्पण करत आहेत. पालखी सोहळ्यादरम्यान शहरात वाहतूक कोंडी टाळण्यासाठी, तसेच कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी श्रीरामपूर शहर आणि परिसरातील जड वाहनांची वाहतूक अन्य मार्गांनी वळविण्यात आली आहे. श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विशाल खैरे यांनी वाहनधारकांना पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन केले आहे.

बुधवारी, ८ जुलै पहाटे ४:०० ते दुपारी १:०० वाजेपर्यंत, पालखी सकाळी अंदाजे ५:३० वाजता बाभळेश्वर येथून श्रीरामपूरकडे रवाना होईल. या काळात खालीलप्रमाणे मार्ग बदल करण्यात आले आहे.बाभळेश्वरकडून श्रीरामपूरमार्गे नेवासा आणि छत्रपती संभाजीनगरकडे जाणारी जड वाहने: अहिल्यानगर-मनमाड महामार्गाने राहाता, चितळी रोड मार्गे वळविण्यात आली आहेत. तसेच, बाभळेश्वर - राहाता - चितळी- गोंधवणी पूल - दशमेश चौक- कर्मवीर भाऊराव पाटील चौक- तीन पुतळे - रेल्वे ब्रीज जवळील रोड - इंदिरानगर -शिरसगाव- अशोकनगर फाटा- पुढे नेवासा रोडने निश्चित स्थळी जातील.

नेवासाकडून बाभळेश्वरकडे जाणारी वाहतूक अशोकनगर फाटा-शिरसगाव - इंदिरानगर -रेल्वेब्रीज जवळील रोड - तीन पुतळे - कर्मवीर भाऊराव पाटील चौक -दशमेश चौक - गोंधवणी पूल - चितळी - राहाता मार्गे जातील.गुरुवारी ९ जुलै पहाटे ४:०० ते दुपारी १:०० वाजेपर्यंत, पालखी सकाळी ५:०० वाजता बेलापूरमार्गे राहुरीकडे प्रस्थान करेल. या काळात देवळाली प्रवरा आणि राहुरीकडे जाणाऱ्या वाहतुकीत खालील बदल असतील,देवळाली प्रवरा-राहुरीकडे जाणारी जड वाहने: ही वाहने श्रीरामपूर-बाभळेश्वर मार्गे वळविण्यात येतील.श्रीरामपूर - बाभळेश्वर -कोल्हार बुद्रुक मार्गे जातील.पोलीस प्रशासनाचे आवाहन करण्यात आले.


## Notice

This is to notify all the people that, as per my Aadhaar Card, my correct name is **"Arjumand Akil Shaikh"**.
On my passport, my name appears as **"Arjuman Akil Shaikh"** on my husband's passport, under the title spouse's name it appears as **"Shaikh Azimunbano Akil"**.
By this notice, I clarify that, these are not the names of different people. All the above mentioned names are mine and my correct name is as it appears on my Aadhar card

**M. A. SHAIKH**
**Bsc. L.L.B.**
**ADVOCATE. Shrirampur,**
**Dist. A'nagar**
**9665503344.**


# वृत्तपत्र विक्रेत्याच्या मुलीची भरारी

## अस्मिता पेहरकर भानसहिवऱ्याची पहिली महिला वकील

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा** : पहाटेपासून गावोगावी वृत्तपत्रे पोहोचविणाऱ्या वडिलांच्या कष्टाला आणि शेतमजुरी करणाऱ्या आईच्या संघर्षाला शिक्षणाच्या बळावर यशाची जोड देत भानसहिवरा येथील अस्मिता अशोक पेहरकर हिने गावातील तसेच माळी समाजातील पहिली महिला वकील होण्याचा मान मिळविला आहे. वृत्तपत्र विक्रेते अशोक पेहरकर व रंजना पेहरकर यांची कन्या अस्मिताने छत्रपती संभाजीनगर येथील माणिकचंद पहाडे विधी महाविद्यालयातून बी.ए. एलएल.बी.ची पाच वर्षांची पदवी प्रथम श्रेणीत संपादन केली. साधी आर्थिक परिस्थिती, आई-वडिलांचे अथक परिश्रम आणि स्वतःची जिद्द यांच्या बळावर तिने हे यश मिळविले. पेहरकर कुटुंबाने मुलगा-मुलगी असा भेदभाव न करता तिन्ही मुलींना उच्च शिक्षण दिले.

त्यापैकी दोन मुली डॉक्टर झाल्या असून अस्मिताने वकिली क्षेत्राची वाट निवडत कुटुंबाच्या यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. कायद्याचे ज्ञान नसलेल्या सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रामाणिकपणे काम करणार, असा निर्धार अस्मिताने व्यक्त केला. या यशासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अपर्णा कोतापल्ले, डॉ. शीतल बारहाते, डॉ. प्रतिभा गिरबाने आणि ड. संदीप मुंडे यांचे मार्गदर्शन लाभल्याचे तिने सांगितले. अस्मिताच्या यशाबद्दल परिसरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून तिची यशोगाथा ग्रामीण भागातील मुलींसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# माजी विद्यार्थ्यांकडून शाळेला ७५०० लिटर पाण्याच्या टाकीची भेट

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान** : न्यू इंग्लिश स्कूल व कै. आण्णासाहेब पटारे पाटील कनिष्ठ महाविद्यालयातील सन २००३-०४ च्या दहावीच्या माजी विद्यार्थ्यांच्या पुढाकारातून शाळेसाठी ७५०० लिटर क्षमतेच्या पाण्याच्या टाकीच्या बांधकामाचे भूमिपूजन सोमवारी उत्साहात पार पडले. २२ एप्रिल २०२६ रोजी झालेल्या माजी विद्यार्थ्यांच्या स्नेहमेळाव्यात, ज्या शाळेने घडविले त्या शाळेप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पाण्याची टाकी उभारण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार या कामाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी टाकळीभान ग्रामपंचायतीचे उपसरपंच तथा स्कूल कमिटीचे अध्यक्ष कान्हा खंडागळे, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य बापूसाहेब पटारे, स्थानिक स्कूल कमिटी सदस्य राहुल पटारे, माजी अध्यक्ष मंजाबापू थोरात, भाऊसाहेब पवार, दिलीप लोखंडे, सुधीर मगर, अविनाश लोखंडे, अनिल दाभाडे, विद्यालयाचे प्राचार्य शिंदे, पर्यवेक्षक जरे, शिक्षक व कर्मचारी तसेच २००३-०४ बॅचचे अनेक माजी विद्यार्थी उपस्थित होते. माजी विद्यार्थ्यांच्या या उपक्रमामुळे शाळेच्या पाणीपुरवठ्याची सुविधा अधिक सक्षम होणार असून, त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन आदिनाथ पाचपिंड यांनी केले.


## जाहीर निविदा

**ग्रामपंचायत मढी बु ता. कोपरगाव जि .अहिल्यानगर**

ग्रामपंचायत मढी बु ता. कोपरगाव जि. अहिल्यानगर येथील अनुसुचित जाती व नवबौद्ध घटकांचा विकास करणे सन २०२५/२६ साठी नोंदणीकृत, ठेकेदार, पुरवठादार यांच्याकडून सीलबंद निविदा मागवण्यात येत आहे.

| अ क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फि | ठेकेदारचा वर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | गावठाण येथे विज पुरवठा करणे | ५ लक्ष | ५९० | सुबेअ |
| २ | मोठेबाबा रोड विज पुरवठा करणे | १० लक्ष | ५९० | सुबेअ |

**अटी व शर्ती :- १**) निविदा फार्म माहितीपत्रक दि.८/७/२०२६ ते १४/७/२०२६ या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेत मिळतील. **२**) बी १ निविदा दि. १५/७/२०२६ रोजी स ११ वा उघडण्यात येईल. **३**) निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

**ग्रामपंचायत अधिकारी**
**मढी बु ता कोपरगाव**

**गटविकास अधिकारी**
**कोपरगाव पंचायत समिती**

## जाहिर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः सौंदाळा परिसरातील लोकांना, तसेच नेवासा तालुक्यातील लोकांना या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की,

मौजे सौंदाळा ता. नेवासा येथील सुनिल दादासाहेब आरगडे हे दिनांक २२/०५/२०२६ रोजी मौजे सौंदाळा ता. नेवासा येथे मयत झालेले झालेले आहेत. त्यांना त्यांच्या पत्नी श्रीमती सुनिता सुनिल आरगडे ह्या एकमेव कायदेशीर वारस आहेत. सदर मयत सुनिल आरगडे यांच्या मृत्यूसमयी त्यांच्या नावावर टाटा कंपनीचा दहा टायर ट्रक त्याचा आर.टी.ओ पासिंग नंबर MH16-Y7373 असा असुन त्याचा चेसीज नंबर MAT448035C7J37261 हा ट्रक तसेच महिंद्रा कंपनीची स्कॉर्पिओ तिचा आर.टी.ओ. पासिंग नंबर MH17AJ9096 ही मयत सुनिल दादासाहेब आरगडे यांच्या नावावर होती. वर नमुद दोन्ही गाड्यांची आर.सी.बुक हे हरवलेले आहेत. सदर वर नमुद दोन्ही वाहने मयत सुनिल दादासाहेब आरगडे यांच्या नावावरुन त्यांची कायदेशीर पत्नी सुनिता सुनिल आरगडे यांच्या नावावर होणे अत्यंत जरुरीचे आहे. तथापि, सदर वर नमुद वाहनांच्या हरवलेल्या आर.सी.बुक बाबत, तसेच मयत सुनिल आरगडे यांच्या कायदेशीर वारस सुनिता सुनिल आरगडे यांच्या नावावर सदर वाहनांचे आर. सी.बुक करण्याबाबत कुणाचीही काहीएक हरकत असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत श्रीमती सुनिता सुनिल आरगडे, रा. सौंदाळा, ता. नेवासा यांचेशी तथा त्यांचे खालील नमुद विधीज्ञ यांचेशी संपर्क साधावा. सदर ७ दिवसामध्ये कोणाचीही काहीएक हरकत न आल्यास आमचे अशिल सदरची वर नमुद वाहने स्वतःच्या नावावर करुन घेतील, त्यांनतर कुणाचीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

नेवासा
दिनांक :-०७/०७/२०२६

शिक्का

**नोटीस देणार तर्फे**
**ॲड. सुजित बाळकृष्ण गरड**
**नेवासा कोर्ट, नेवासा ता. नेवासा,**
**जि. अहिल्यानगर**
**मोबा नं. ९८५०१६६१८७**

## हरवले आहे

ओरिजनल १२वी चा दाखला, त्याचे ४ झेरॉक्स, बोर्ड प्रमाणपत्र झेरॉक्स, इत्यादी शैक्षणिक कागदपत्रे असलेली प्लॅस्टिकची कॅरीबॅग आष्टी बस स्टँड च्या आवारात हरवली आहे, तरी कोणाला आढळल्यास संपर्क करा.

**मुस्कान इसहाक पठाण**
**रा. खुरदैठण ता.जामखेड**
**जि.अहिल्यानगर**
**मो.९७६७९६०९६१**

## जाहीर प्रगटन

समस्त गावकरी मिरजगाव ता. कर्जत, जि.अहिल्यानगर यांना कळविण्यात येते की या कार्यालयात श्री/श्रीम. यास्मिन शमशोद्दिन शेख रा. मिरजगाव, ता. कर्जत सध्या रा पंढरपूर यांनी स्वतः नामे श्री/श्रीम. यास्मिन शमशोद्दिन शेख या नावे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळणे बाबत मागणी केलेली आहे.

सदर व्यक्तीचा जन्म/मृत्यू मिरजगाव ता. कर्जत, जि. अहिल्यानगर या ठिकाणी दिनांक ०१/०१/१९८५ रोजी झाला असून प्रमाणपत्र मिळणे संबंधित दिनांक २२/०५/२०२६ रोजी या कार्यालयात अर्ज केला आहे.

वरील व्यक्तीच्या जन्मा बाबत कोणाची हरकत असल्यास सदर जाहीर प्रकटन प्रसिद्ध झाले पासून पंधरा दिवसांच्या आत आपली लेखी हरकत या कार्यालयास सादर करावी दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या हरकती मान्य केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

**रवी सतवन**
**तहसीलदार कर्जत**

## जाहीर प्रगटन

समस्त गावकरी मिरजगाव ता. कर्जत, जि.अहिल्यानगर यांना कळविण्यात येते की या कार्यालयात श्री/श्रीम. जस्मिन शमशोद्दिन शेख रा. मिरजगाव, ता. कर्जत सध्या रा पंढरपूर यांनी स्वतः नामे श्री/श्रीम. जस्मिन शमशोद्दिन शेख या नावे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळणे बाबत मागणी केलेली आहे.

सदर व्यक्तीचा जन्म/मृत्यू मिरजगाव ता. कर्जत, जि. अहिल्यानगर या ठिकाणी दिनांक २५/०१/१९८३ रोजी झाला असून प्रमाणपत्र मिळणे संबंधित दिनांक २२/०५/२०२६ रोजी या कार्यालयात अर्ज केला आहे.

वरील व्यक्तीच्या जन्मा बाबत कोणाची हरकत असल्यास सदर जाहीर प्रकटन प्रसिद्ध झाले पासून पंधरा दिवसांच्या आत आपली लेखी हरकत या कार्यालयास सादर करावी दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या हरकती मान्य केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

**रवी सतवन**
**तहसीलदार कर्जत**


# दोन फुटांवर मृत्यूचा थरार! क्षिरसागर दाम्पत्य थोडक्यात बचावले

## दोन विभागांच्या ढकलाढकलीत नागरिकांच्या जीवाशी खेळ



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी** : पावसाळा सुरू होताच आश्वी खुर्द परिसरात विजेच्या तारा तुटण्याच्या घटना पुन्हा समोर येत आहेत. रविवारी (दि. ५ जुलै) सकाळी सुमारे ९ वाजता गायांसाठी चारा कापत असताना आश्वी खुर्द ता. संगमनेर येथील प्रगतशील शेतकरी रामनाथ क्षिरसागर (वय ४४) व त्यांच्या पत्नी योगिता क्षिरसागर (वय ३८) यांच्या अवघ्या दोन फुटांवर उच्चदाब वीजवाहिनी तुटून कोसळली.

तारेला असलेल्या रबराच्या आवरणामुळे आणि दोघेही काही अंतरावर असल्याने मोठा अनर्थ टळला. क्षणभरात मृत्यू समोर उभा ठाकल्याचा थरारक अनुभव या दाम्पत्याने घेतला. ही घटना जगुमाई-पाचमोऱ्या ओढा परिसरात, आश्वी माळेवाडी रस्ता असलेल्या प्रवरा उजव्या कालव्यालगत क्षिरसागर यांच्या शेता लगत घडली. मोठा स्फोट झाल्यासारखा आवाज, हवेत ठिणग्या आणि काही क्षण अंधारी येताच त्यांच्या समोर मुख्य वीजवाहिनी जमिनीवर पडलेली दिसली. सुदैवाने तारेला रबराचे संरक्षण असल्याने मोठी जीवितहानी टळली.

विशेष म्हणजे, याच परिसरात नऊ वर्षांपूर्वी शेतकरी रमेश लहानू शिंदे यांचा तुटलेल्या विजेच्या तारेचा स्पर्श झाल्याने दुर्दैवी मृत्यू झाला होता. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून जुनी दुर्घटना पुन्हा सर्वांच्या डोळ्यांसमोर उभी राहिली आहे. घटनेची माहिती रामनाथ क्षिरसागर यांनी तातडीने वीज वितरण कंपनीचे हर्षल गडगे गणेश गायकवाड तान्हाजी सांगळे यांच्याशी संपर्क साधला. असता ते घटनास्थळी दाखल होऊन झाडांच्या फांद्या तोडत वीजपुरवठा सुरळीत केला. मात्र मूळ प्रश्न आजही कायम आहे. आश्वी खुर्द उपकेंद्रातून हंगेवाडी व शेडगावकडे जाणाऱ्या शेतीच्या वीजवाहिन्यांखाली मोठमोठी झाडे वाढली आहेत. वारा, पाऊस किंवा वादळ सुरू होताच फांद्या तारांवर पडून अशा घटना घडतात.

या मार्गावरून दररोज शेतकरी, ग्रामस्थ आणि शालेय विद्यार्थी ये-जा करतात. त्यामुळे भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, अनेक वेळा तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. वीज वितरण कंपनी झाडे पाटबंधारे विभागाची असल्याचे सांगते, तर पाटबंधारे विभाग वीज वितरण कंपनीची जबाबदारी असल्याचे सांगून हात झटकत आहे. दोन विभागांच्या या ढकलाढकलीत सर्वसामान्य नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याचा आरोप होत आहे.

या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेऊन तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी ग्रामस्थ करणार आहेत.

> घटनेनंतर तातडीने कर्मचारी पाठवून वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला. मात्र झाडे पूर्णपणे हटविण्यासाठी पाटबंधारे विभागाची परवानगी आवश्यक आहे.
>
> **अक्षय विखे अभियंता, वीज वितरण कंपनी आश्वी**

> या झाडांबाबत अनेक वेळा मागणी करूनही दखल घेतली जात नाही. भविष्यात दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी संबंधित दोन्ही विभागांवर राहील. गरज पडल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल.
>
> **सतीश गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते, आश्वी खुर्द**

> नऊ वर्षांपूर्वी एका शेतकऱ्याचा बळी गेला... आता क्षिरसागर दाम्पत्य थोडक्यात बचावले... आणखी किती जीव धोक्यात घातल्यानंतर प्रशासन जागे होणार?
>
> **कैलास गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते आश्वी खुर्द**

# पान १ वरुन

## अविश्वास ठरावापूर्वीच कर्जतच्या नगराध्यक्षा रोहिणी घुले यांचा राजीनामा

नगरपंचायत कार्यालयात पीठासीन अधिकारी तथा कर्जतचे प्रांताधिकारी नितीन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सर्व नगरसेवक-नगरसेविकांची विशेष सभा बोलावण्यात आली होती. मात्र अविश्वास ठरावास सामोरे जाण्यापूर्वीच नगराध्यक्षा रोहिणी घुले यांनी आपला राजीनामा सोमवारी दुपारी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याकडे सुपूर्द केला. आपल्या नगराध्यक्षा पदाच्या कार्यकाळात केलेल्या सहकार्याबद्दल त्यांनी मुख्याधिकाऱ्यासह कार्यालयीन कर्मचारी आणि सर्व नगरसेवकांचे आभार मानत ऋण व्यक्त केले.

रोहिणी घुले यांच्या राजीनाम्यानंतर मंगळवारी नगराध्यक्षा अविश्वास ठरावावर केवळ विशेष सभेची औपचारिकता आता शिल्लक राहिली असून विधान परिषदेचे सभापती राम शिंदे आता सहा म हिन्यांसाठी कोणाच्या गळ्यात कर्जतच्या नगराध्यक्षा पदाची माळ घालतात याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. नगराध्यक्षा पदानंतर उपनगराध्यक्ष पदाची निवडणूक देखील लागणार आहे. त्यामुळे आगामी काळात दोन्ही पदावर कोणत्या नगरसेवकांची वर्णी लागणार ? १३ नगरसेवकांमध्ये राम शिंदे कसा सुवर्णमध्य काढतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## रोडे अर्बन निधीच्या पदाधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याचे न्यायालयाचे आदेश

उत्तरे दिली, काही काळानंतर कार्यालय बंद ठेवण्यात आले, तर म ोबाईल फोनही बंद करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे ठेवीदारांची आर्थिक फसवणूक झाल्याचा दावा करण्यात आला आहे.त्यानंतर तक्रारदार यांनी याबाबत श्रीगोंदा पोलिसांकडे धाव घेतली मात्र तत्कालीन पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांनी कोणत्याही प्रकरची दखल घेतली नाही त्यानंतर तक्रादार न्यायालयात धाव घेतली न्यायालयाने उपलब्ध कागदपत्रे आणि तक्रारीची दखल घेत श्रीगोंदा पोलिसांना चेरमन संतोष विठ्ठलराव रोडे यांच्यासह संचालक अभिजित प्रकाश देशमुख, विठ्ठल बळवंत रोडे, आदिती अभिजित देशमुख, प्रवीण विठ्ठल रोडे, अमोल झुंबर रसाळ याच्यासह संबंधितांविरुद्ध कायद्यानुसार गुन्हा नोंदवून तपास करण्याचे आदेश दिले आहेत. या कारवाईनंतर आणखी अनेक ठेवीदार पुढे येण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

## कोर्टाच्या आदेशाशिवाय गोशाळेतून १२ म्हशींची विक्री

केली होती. त्यानंतर न्यायालयाचा अंतिम आदेश होईपर्यंत या म्हशींच्या देखभालीची जबाबदारी वाळकी येथील लक्ष्मीमाता गोशाळेला देण्यात आली होती. दरम्यान, ५ जुलै रोजी रात्री डायल-११२ वर कर्तव्य बजावत असलेल्या पोलीस कॉन्स्टेबल विजय दशरथ साठे यांना गोशाळेतून म्हशी परस्पर बाहेर काढून दोन पिकअप वाहनांतून नेल्या जात असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी तातडीने जळवाडी शिवारात नाकाबंदी करून दोन्ही बोलेरो पिकअप अडविले. वाहनांची तपासणी केली असता १२ म्हशी अत्यंत निर्दयीपणे, दाटीवाटीने बांधून वाहतूक केली जात असल्याचे आढळले.चौकशीत समोर आलेल्या माहितीनुसार, गोशाळा चालक चांगदेव भालसिंग याने न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वीच म्हशी परत देण्यासाठी २० हजार रुपयांची रक्कम स्वीकारली. त्यानंतर भाड्याने पिकअप वाहने बोलावून रात्रीच्या अंधारात म्हशी मालकांच्या ताब्यात देण्याचा प्रयत्न करण्यात आला. या संपूर्ण प्रकारात गोशाळा चालकाने न्यायालयाचा विश्वास आणि पोलिसांची दिशाभूल केल्याचे तपासात निष्पन्न झाले. या प्रकरणी चांगदेव गोरख भालसिंग, नितेश बबन वैरागर, शरद जगन्नाथ आल्हाट, अमोल दशरथ कासार आणि शरद गुलाब साठे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दोन बोलेरो पिकअप आणि १२ म्हशींसह ५ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल लाड करीत आहेत.

## शरद पवार एनडीएत असते तर राष्ट्रपती असते

की तुम्हाला शिवसेना चालते भाजप का चालत नाही विकासासाठी व सत्तेत राहण्यासाठी भाजपसोबत जाण्यासाठी हरकत नाही असे अजित पवार यांचे मत होते . मोदी आणि शरद पवार यांची भूमिका त्यांनी मांडली होती जेव्हा अटल बिहारी यांच्या काळामध्ये जॉर्ज फर्नांडिस, शरद यादव ,नवीन पटनायक, करुणानिधी असे अनेक नेते अटल बिहारी यांच्या काळात होते २०१४ साली शरद पवार एनडीए मध्ये आले असते तर कदाचित ते या देशाचे राष्ट्रपती सुद्धा होऊ शकले असते तरी त्यांचा राष्ट्रवादी पक्ष एनडीए मध्ये आल्यास त्यांचं स्वागतच असल्याचे आठवले म्हणाले.

मोदी आणि शहा यांची मोठी दोस्ती असून मोदी पंतप्रधान पदी राहिले पाहिजे असे माझे मत आहे. २०२९ ला सत्ता आमचीच येणार असून एनडीएचे सरकार येणार असून पंतप्रधान पदी मोदीच असतील.

मोदींची तब्येत चांगली आहे. अजून ते आठ वर्ष चांगले काम करू शकतात त्यांच्या जागी दुसरा कोणी नाही. मी पंतप्रधान पदासाठी मोदींची निवड करतो मोदी सर्वांना बरोबर घेऊन जात आहे. मोदी विकासाला चालना देत आहे तर शहा पार्टीला मजबूत करण्याचा प्रयत्न करत आहेत शहा यांचे मोठे योगदान आहे. पंतप्रधान पदासाठी मी मोदींची निवड करेल.

ऑपरेशन टायगर मधे ठाकरे यांचे सहा खासदार शिंदे गटात गेली असली तरी त्याचा राजकारणावर कोणताही परिणाम होणार नाही.

एकनाथ शिंदे आणि अमित शहांचे संबंध अतिशय चांगले आहेत. एकनाथ शिंदे यांना भाजपने मुख्यमंत्री पद दिले होते. शिंदेंना पुन्हा भाजप संधी देण्याची संधी कमी आहे. देवेंद्र फडवणीस यांना बदलून शिंदे यांना मुख्यमंत्रीपद्यतील असा विषय अजिबात नाही. मुख्यमंत्री म्हणून शिंदे यांनी चांगली काम केले आहे. आणि आता उपमुख्यमंत्री म्हणून चांगले काम करत आहे.

## कर्जत नगराध्यक्षपदी छाया शेलार बिनविरोध

त्यांनी दिले होते. न्यायालयीन प्रक्रियेनंतर आणि राजीनाम्याच्या घडामोडींनंतर अखेर शेलार यांची बिनविरोध निवड निश्चित झाल्याने शिंदे यांनी दिलेला शब्द प्रत्यक्षात उतरला. यावेळी नगरसेवक अमृत काळदाते, प्रसाद ढोकरीकर, ज्येष्ठ नेते अशोक खेडकर, भाजप मंडळाध्यक्ष अनिल गदादे, युवा मोर्चाचे स्वप्नील तोरडमल, तसेच सुनील शेलार, देवा खरात आदी उपस्थित होते. उमेदवारीनंतर कार्यकर्त्यांनी संत सद्गुरू गोदड महाराज यांच्या जयघोषाने परिसर दणाणून सोडला. मी नव्हे, आम्ही सर्व नगराध्यक्ष' उमेदवारी अर्ज वैध ठरल्यानंतर छाया शेलार यांनी सर्व नगरसेवकांचे आणि राम शिंदे यांचे आभार मानले. ही जबाबदारी सहा महिन्यांसाठी असली तरी सर्वांच्या सहकार्याने शहराच्या विकासासाठी काम करणार आहे. मी नव्हे, आम्ही सर्व नगराध्यक्ष आहोत, या भावनेतून काम करेन, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

## श्रीरामपूर विभागातील ६८ सराईत गुन्हेगार हद्दपार!

( रा. कोतूळ ), दत्तात्रय निवृत्ती खरात (रा. कोतूळ), बाळू किसन चौधरी (रा. धामणगावपाट अकोले), राजिक रज्जाक शेख (रा. संगम नेर ), गणेश बबन कुरकुटे (रा. संगमनेर ), अब्दूल गणी कुरेशी (रा. सुभेदार वस्ती ), एजाज कादर कुरेशी (वॉर्ड नं.२ ), अरबाज मस्तान शेख ( रा. वॉर्ड नं.१ ), गौरव रमेश सोनटक्के ( रा. दशमेश नगर पंजाबी कॉलनी श्रीरामपूर ), दीपक बबन लाटे ( रा.चिंचोली ता. राहूरी), निखिल बबन लाटे ( रा.चिंचोली ), शहादेव विठठल माने (रा. चिंचोली ),अभिषेक राजेंद्र नाचणे (रा. चिंचोली ), गणपत बबन गफले ( रा. चिंचोली), संदीप गोपीनाथ लाटे (रा. चिंचोली ), अक्षय मच्छिंद्र कुसमुडे ( रा. वांबोरी ), आकाश अशोक मंडलिक ( रा. वांबोरी ), राहूल अंबादास पिटेकर ( रा. जेऊर हैब ता. राहुरी), फैजान जब्बार कुरेशी ( टोळी प्रमुख ), मुन्तजीर मुनिर कुरेशी ( टोळी सदस्य ), अब्दुल करीम अमिर कुरेशी, मुनिर अमीर कुरेशी, जब्बार हसन कुरेशी, नाजीम आयुब कुरेशी, वसीम आयुब कुरेशी, रिजवान मेहबूब कुरेशी ( सर्व रा. ममदापूर ता. राहाता ), सागर उर्फ मोद्या रामदास मंजुळ,( रा.कोपरगाव ), अतुल देविदास आव्हाड ( रा. कोपरगाव ), भारत भाऊसाहेब आव्हाड (रा. कोपरगाव ) यांना एक व सहा महिन्यासांठी काहीना दोन वर्षांकरिता अशा ६८ इसमांना हद्दपार करण्यात आलेले आहे.

## अर्जुन राऊत यांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान** : पत्रकार अर्जुन राऊत यांची निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाच्या जिल्हा संघटकपदी निवड झाल्याबद्दल राजेंद्र कोकणे मित्र मंडळ व महादेव यात्रा कमिटी यांच्या वतीने त्यांचा हार पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी राऊत यांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी सामाजिक, पर्यावरण संवर्धन व जनजागृतीच्या कार्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. त्यांच्या माध्यमातून पर्यावरण संरक्षण व सामाजिक कार्याला अधिक बळ मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. सत्कार प्रसंगी श्रीधर गाडे,प्रा. कार्लस साठे, गजानन कोकणे, ॲड. रत्नाकर रणनवरे, भैया पठाण, आप्पासाहेब वाघुले, जितेंद्र छल्लारे, रावसाहेब आहेर,बापूसाहेब शिंदे, सुरेश पवार, काकासाहेब डिके, मधुकर गायकवाड, गोवर्धन पटारे, रावसाहेब गायकवाड,नवनाथ पवार, सोमनाथ पवार, ज्ञानेश्वर वखरे, राजेंद्र रणनवरे आदी सह गावातील पदाधिकारी, महादेव यात्रा कमिटीचे सदस्य, पत्रकार व ग्रामस्थ उपस्थित होते.




## मुळा कारखान्याच्या चेअरमनपदी भाऊसाहेब मोटे, व्हा. चेअरमनपदी बाळासाहेब पाटील बिनविरोध

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : मुळा सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमनपदी भाऊसाहेब निवृत्ती मोटे तर व्हाईस चेअरमनपदी बाळासाहेब दादा पाटील यांची मंगळवारी बिनविरोध निवड करण्यात आली. प्राधिकृत अधिकारी तथा प्रांताधिकारी सुधीर पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत या निवडी जाहीर करण्यात आल्या.



निवडीनंतर माजी मंत्री शंकरराव गडाख यांनी नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करून अभिनंदन केले. यावेळी माजी चेअरमन नानासाहेब तुवर, माजी व्हाईस चेअरमन कडूबाळ कर्डीले, नवनिर्वाचित चेअरमन भाऊसाहेब मोटे आदींनी मनोगते व्यक्त केली.

यावेळी बोलताना शंकरराव गडाख म्हणाले, ''कारखान्याच्या सभासदांनी आपल्यावर मोठा विश्वास दाखविला आहे. संचालक मंडळाने सभासद शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून काम करावे. मुळा कारखाना हा परिसरातील शेतकऱ्यांची कामधेनू असून सभासदांनी अधिकाधिक ऊस कारखान्याला द्यावा.'' आगामी गळीत हंगामाचे नियोजन स्वतः लक्ष घालून करणार असल्याचे सांगत त्यांनी नूतन पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या.

बैठकीच्या निमित्ताने कारखान्यातील मिल रोलर पूजनाचा कार्यक्रमही आयोजित करण्यात आला. संचालक पांडुरंग निपुंगे व एकनाथ जगताप यांच्या हस्ते विधीवत पूजन करण्यात आले. आगामी गळीत हंगामात कोणतेही स्टॉपेज होऊ नयेत, यासाठी यंत्रसामग्रीची ओव्हरऑईलिंग व देखभाल वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना गडाख यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिल्या. ज्ञानेश्वर देवस्थानचे ह.भ.प. देविदास महाराज म्हस्के, ज्येष्ठ नेते विश्वासराव गडाख, दादासाहेब शेळके, कारभारी जावळे, नंदकुमार पाटील, विविध संचालक, पदाधिकारी, सभासद, शेतकरी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कारखान्याचे सचिव रितेश टेमक यांनी सूत्रसंचालन, तर कार्यकारी संचालक शरदराव बेल्हेकर यांनी आभार मानले. विशेष म्हणजे, माजी मंत्री शंकरराव गडाख यांनी सलग तिसऱ्या पंचवार्षिकातही चेअरमन व व्हाईस चेअरमन पदासाठी कार्यकर्त्यांनाच संधी देत नेतृत्वाला प्रोत्साहन देण्याची परंपरा कायम राखली.

## निधन वार्ता

### मा. सरपंच अंकुश लकडे



**सोमेश्वरनगर** - बारामती तालुक्यातील खंडोबाचीवाडीचे माजी सरपंच अंकुश लकडे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक भाऊ असा परिवार आहे. सरपंच म्हणून कार्यरत असताना अंकुश लकडे यांनी गावाच्या सर्वांगीण विकासासाठी उल्लेखनीय योगदान दिले होते.

### सुभाष लव्हाटे



**नेवासा** : तालुक्यातील खरवंडी येथील प्रगतशील शेतकरी सुभाष किसन लव्हाटे (वय ५९) यांचे सोमवारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई,पत्नी,एक मुलगा,एक मुलगी,दोन भाऊ,दोन बहिणी असा परिवार आहे.नेवासा येथील राजे शिवकालीन मर्दानी खेळ प्रशिक्षण संस्थेचे संस्थापक मास्टर सुरेश लव्हाटे व व्यावसायिक बाबासाहेब लव्हाटे यांचे ते बंधू होते.

### दुर्लभ शिंदे



**टाकळीभान** : सुरेगाव गंगा येथील दुर्लभ भानुदास शिंदे (वय ६६ ) यांचे नूकतेच दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन भाऊ, दोन बहिणी, सूना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. टाकळीभान येथील सेवानिवृत्त एस.टी.वाहक तथा सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब पटारे यांचे ते मेहुणे होत.

### वासुदेव वाघमारे



**श्रीरामपूर** : महाराष्ट्र राज्य औषध विक्रेता संघाचे आणि अहिल्यानगर औषधे विक्रेती संघाचे माजी संचालक , श्रीरामपूर तालुका औषध विक्रेते संघाचे अध्यक्ष जीवन मेडिकल एजन्सी औषधालय व राम मेडिकलचे माजी मालक वासुदेव रंगनाथ वाघमारे (वय ८१) यांचे अल्पशा आजाराने दुःख निधन झाले त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, जावई, नातवंड असा परिवार आहे.

## वैजापूरच्या 'बॉर्डर' वाद विधानसभेत दखल

### आरटीओतील कथित वसुलीप्रकरणी उच्चस्तरीय चौकशीचे आदेश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : वैजापूरमध्ये परिवहन विभागाच्या दोन अधिकाऱ्यांमधील कथित ''भारत-पाकिस्तान बॉर्डर'' वादातून चर्चेत आलेले राजू नागरे हे नाव आता थेट महाराष्ट्र विधानसभेत गाजले आहे. मंगळवारी झालेल्या पावसाळी अधिवेशनात आरटीओ विभागातील कथित अवैध वसुली रॅकेटचा मुद्दा उपस्थित झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याचे निर्देश दिले.

काही दिवसांपूर्वी वैजापूरमध्ये कार्यक्षेत्रावरून दोन आरटीओ अधिकाऱ्यांमध्ये वाद निर्माण झाला होता. एकाच वाहनावर दोन वेगवेगळ्या अधिकाऱ्यांनी कारवाई केल्याने वाहनधारकांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता. या संदर्भातील कथित ध्वनिमुद्रित संभाषणात राजू नागरे यांचे नाव वारंवार समोर आले होते. तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कारवाईत अडकलेल्या व्यक्तीशी संबंधित काही एजंट राज्यातील विविध भागांत अवैध वसुली करत असल्याचे आरोपही करण्यात आले होते.

पावसाळी अधिवेशनात काँग्रेसचे आमदार विजय वडेट्टीवार यांनी आरटीओ विभागातील कथित अवैध वसुली रॅकेटचा मुद्दा उपस्थित करत ध्वनिमुद्रण व अन्य कथित पुराव्यांचा उल्लेख केला. यावेळी राजू नागरे यांचाही उल्लेख सभागृहात करण्यात आला. मुख्यमंत्र्यांनी चौकशीचे आदेश दिल्यानंतर आरटीओ विभागातील कथित वसुलीप्रकरणाची सखोल चौकशी होणार असून, आरोप सिद्ध झाल्यास संबंधित अधिकारी, कर्मचारी आणि कथित एजंटांवर कठोर कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे या प्रकरणाकडे राज्यभराचे लक्ष लागले आहे.

## टाकळीभान येथे ना. रामदास आठवले यांचे स्वागत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**टाकळीभान** : येथे आरपीआयचे जिल्हा उपाध्यक्ष व तंटामुक्तीचे अध्यक्ष आबासाहेब रणनवरे यांच्या हस्ते सामाजिक केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचा नुकताच सर्व पक्षाच्या वतीने यांचा सत्कार करण्यात आला. अहिल्यानगर येथे सामाजिक केंद्रीय मंत्री नुकताच दौरा असून जिल्ह्यातील सर्व दीन दलितांचे व सामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी हा दौरा असून बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यांसाठी अधिकृत जागा असेल त्याठिकाणी बसवा त्याचा प्रस्ताव मला पाठवा आणि युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांचाही पुतळा या ठिकाणी बसवा. तसेच बस स्टँड परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आय लव डिजिटल लाइटिंग पाहून रामदास आठवले भारावून गेले. याप्रसंगी सर्व भीमसैनिक गावातील शिवसैनिक आरपीआय भाजपा गावातील सर्व आठवले यांच्यासाठी स्वागतासाठी उपस्थितराहून फटाक्याच्या आतिषबाजीने स्वागत करत आले.

## शिर्डीच्या विकासासाठी भरीव निधी द्यावा

### शिंदे यांची ना. आठवले यांच्याकडे मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : संभाव्य कुंभमेळानिमित्त होणारी गर्दी लक्षात घेता शिर्डीच्या पायाभूत विकासासाठी भरीव निधी द्यावा अशी मागणी भाजपाचे प्रांतिक सदस्य तथा शिर्डीचे भूमिपुत्र नानासाहेब शिंदे यांनी ना. आठवले यांचेकडे केली आहे.ना. रामदास आठवले हे अहिल्यानगर जिल्हा दौऱ्यावर आले असता शिर्डी येथे शासकीय विश्रामगृह येथे भेट घेत मागण्यांचे निवेदन दिले. तसेच त्यांचा सत्कार करण्यात आला. ।. आठवले यांनी शिर्डीच्या



विकासासाठी सर्व परिने मदत करण्यात येईल तसेच केंद्राच्या विविध योजनेच्या माध्यमातून शिर्डीत भरीव असे काम करू असा विश्वास यावेळी शिंदे यांना दिला.

## मुळाचे नवनिर्वाचित अध्यक्ष भाऊसाहेब मोटे यांचा सन्मान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**चांदा** : नेवासा तालुक्यातील मुळा सहकारी साखर कारखान्याच्या नवनिर्वाचित अध्यक्षपदी भाऊसाहेब निवृत्ती मोटे यांची तर उपाध्यक्षपदी बाळासाहेब पाटील यांची निवड झाली.

भाऊसाहेब मोटे यांची निवड झाल्याबद्दल संजय (नाना) आहेर यांनी नुकताच त्यांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला.या प्रसंगी गणेश आहेर, सुनील कर्डिले, महेश मोटे, राहुल मोटे, प्रकाश मोटे, अशोक जेम्स, बाळासाहेब मोटे, सतीश मोटे, आतीष मोटे, प्रदीप मोटे, मेजर मोटे, अनील मोटे, दत्ता मोटे (मेजर) यांच्या सह आदी पद अधिकारी यावेळी उपस्थित होते.

## माळीवाडगांव येथे बेकायदेशीर गांजा लागवड, ५ किलो गांजा जप्त

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापुर** शिल्लेगाव पोलिसांनी बेकायदेशीर गांजा लागवडीविरोधात धडक कारवाई करत ५ किलो ८०१ ग्रॅम वजनाचा गांजा जप्त केला असून या प्रकरणी एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे.

पोलीस निरीक्षक यांच्या आदेशानुसार पोलीस उपनिरीक्षक काळे हे पोलीस अंमलदारांसह लासूर स्टेशन-देवगाव रोड परिसरात रविवारी (दि. ६) पेट्रोलिंग करत असताना त्यांना गोपनीय माहिती मिळाली. तालुक्यातील माळी वाडगाव शिवारातील गट क्रमांक ७९ मधील शेतात ज्ञानेश्वर शंकर कळवणे यांनी बेकायदेशीररित्या गांजाची लागवड केल्याची माहिती प्राप्त झाली.या माहितीची तत्काळ पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील यांना कल्पना देण्यात आली. त्यानंतर दोन शासकीय पंच आणि कृषी अधिकारी यांच्या उपस्थितीत संबंधित शेतात छापा टाकण्यात आला. कारवाईदरम्यान शेतात गांजाची तीन झाडे आढळून आली. यावेळी आरोपी ज्ञानेश्वर शंकर कळवणे हा एका झाडाचा पाला तोडत असताना रंगेहाथ आढळून आल्याने पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. शासकीय पंचांच्या उपस्थितीत गांजाची झाडे जप्त करून जप्ती पंचनामा करण्यात आला. जप्त करण्यात आलेल्या गांजाचे एकूण वजन ५ किलो ८०१ ग्रॅम असून त्याची अंदाजित किंमत



८७ हजार १५ इतकी असल्याचे पोलिसांनी सांगितले. ही कारवाई पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. निलेश पालवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील, पोलीस उपनिरीक्षक काळे तसेच पोलीस अंमलदार योगेश हरणे, विनोद बिघोत, पटेल, तायडे, निसर्गे आणि नरोडे यांनी संयुक्तरीत्या पार पाडली.या प्रकरणी आरोपीविरुद्ध संबंधित कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास शिल्लेगाव पोलीस करत आहेत.

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME RAHEMATABI RAHEMANALI SHAH (IN PASSPORT No.M965982) (BEFORE NAME) TO THE NEW NAME AS RAHEMATBI RAHEMAN ALI SHAH ( AADHAR No. 4305 7384 3285) FROM VIDE AFFADAVIT BEFORE NOTARY PUBLIC SHRIRAMPUR

PLACE – SHRIRAMPUR

DATE – 07/07/2026

## रामानंद संप्रदायाच्या वतीने नेवासा येथे वृक्षारोपण पंधरवडा उपक्रमाचा शुभारंभ

**नेवासा** : ''वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे'' या संत तुकाराम महाराजांच्या अभंगा प्रमाणे रामानंद संप्रदायाच्या वतीने या बोधवचनाला कृतीत आणत, अनंत श्री विभूषित



जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजींच्या कृपाशीर्वादाने आणि पीठाचे उत्तराधिकारी परमपूज्य कानिफनाथ महाराजांच्या प्रेरणेने नेवासा येथे वृक्षारोपण पंधरवाडा उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

रविवार दि.५ जुलै २०२६ रोजी नेवासा तालुका जनरल सभा व वृक्षारोपण यज्ञ बदामबाई हायस्कूलच्या पवित्र प्रांगणात पार पडला.सकाळी बारा वाजता मंगलदीप प्रज्वलनाने सभेस सुरुवात झाली.यावेळी नगरसेविका स्त्री रोग तज्ञ डॉ.सौ.मनिषा भाऊसाहेब वाघ व वन विभागाचे वनरक्षक अधिकारी सदाशिव मदने यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला अध्यात्मिक उर्जा लाभली. वनरक्षक अधिकारी सदाशिव मदने यांच्या हस्ते रोपांची पूजा करून वृक्षारोपणाचा यज्ञ संपन्न झाला. ''वृक्ष म्हणजे ईश्वराची साक्षात मूर्ती, त्याची सेवा म्हणजे परमेश्वराची उपासना'' या भावने प्रत्येक रोप मातृभूमीच्या कुशीत रुजवण्यात आले. वन विभागाचे मदतनीस बाळासाहेब कोतकर यांचेही सहकार्य लाभले.या सेवाकार्यात सहभागी झालेल्या नगरसेविका डॉ. मनीषाताई वाघ यांचे उत्तर अहिल्यानगर जिल्हा सेवा समिती तर्फे कृतज्ञतापूर्वक अभिनंदन करण्यात आले. दि. ५ जुलै ते १९ जुलै या १५ दिवसांचा ''वृक्षारोपण पंधरवाडा'' संपूर्ण देशभर रामानंद संप्रदायातर्फे साजरा होत आहे. नेवासा तालुक्यातील हा शुभारंभ भक्तिभाव, कीर्तन गजर आणि आनंदात झाला.यावेळी तालुक्यातील संप्रदायातील भक्त, साधक, शिष्य, युवा सेना, महिला सेना, संग्राम सेना, जनम प्रवचनकार, धाम यात्री, आजी-माजी पदाधिकारी व जिल्हा सेवा समितीचे सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

गुरुवार दि .०२ जुलै २०२६

**मिलनम डे**

उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १२८ २९० ३८० | १-४ | १४६ १२९ ५९० | जोड १०-८०-२९-२५-४९ |

**कल्याण**

उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १२० ६७० ५९० | ३-६ | २४० २६८ ६०० | जोड ३१-७६-९२ ०४ -६८ |

**मुंबैम (मेन)**

उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १५० १६५ १०४ | ६-२ | १२९ ४८० २२८ | जोड ६७-०२-१८-९३-२४ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 06/10/2025 to 10/10/2025 | 890 71 678 | 160 71 470 | 457 61 236 | 569 09 270 | 690 58 459 |
| 13/10/2025 to 17/10/2025 | 157 38 468 | 688 20 136 | 358 64 248 | 500 54 266 | 125 85 168 |
| 20/10/2025 to 24/10/2025 | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** |
| 27/10/2025 to 31/10/2025 | 190 06 150 | 457 64 167 | 247 36 330 | 490 32 156 | 130 48 170 |
| 03/11/2025 to 07/11/2025 | 127 04 269 | 259 63 256 | 799 52 679 | 244 00 389 | 490 32 138 |
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 657 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 238 | 168 57 379 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 309 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 466 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |
| 05/01/2026 to 09/01/2026 | 477 86 178 | 458 73 580 | 355 34 338 | 239 46 259 | 123 67 188 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 139 | 199 96 330 | 258 59 559 |

द • ख • ल

## मंदाताई मंचरे आदर्श माता पुरस्काराने सन्मानित




**टाकळी ढोकेश्वर :** पारनेर तालुक्यातील तिखोल येथील मंदाताई मंचरे यांना अहिल्यानगर येथील यशवंत सेना आणि जयमल्हार शैक्षणिक आणि बहुउद्देशीय सामाजिक संस्था यांच्या वतीने आदर्श माता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. आई कशी असावी याचे एक ज्वलंत उदाहरण म्हणजे मंदाताई मंचरे.आपली तीनही अपत्ये मुकबधीर असुनही त्यांनी हार न मानता या मुलांना बाराखडीचे धडे शिकवले.स्वतःच्या ओठाच्या हालचालीने बाराखडी शिकवण्यापासुन तर थेट लिहीण्यापर्यंत स्वतःच शिक्षिकेची भुमीका बजावत जिल्हा परिषेदेच्या शाळेत आपली मुले घडवली.आपल्या तीनही मुलांना पदवीपर्यंत शिक्षण देऊन त्यांना सामाजिक जाणीव करून दिली. त्याचबरोबर आपल्या मुलांना कुस्ती खेळात पारंगत करण्यासाठी त्यांच्या सोबत कुस्ती खेळत त्यांना उत्तम कुस्तीपट्टू बनवले.आपल्यावर आलेल्या संकटाला त्यांनी मोठया कष्टाने सामोरे जात लढा दिला त्यामुळेच त्यांना आदर्श माता पुरस्कार देऊन त्यांना गौरविण्यात आले आहे. मंदाताई मंचरे मिळालेल्या या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

## गोरक्षनाथ गडावरून पायी दिंडीचे १४ जुलैला पंढरपूरला प्रस्थान

**अहिल्यानगर :** येथून जवळच असणाऱ्या मांजरसुंबा येथील गोरक्षनाथ गडावरून सालाबादप्रमाणे दिनांक १४ जुलै रोजी श्री क्षेत्र गोरक्षनाथ गड ते पंढरपूर आषाडी दिंडी सोहळा प्रस्थान करणार असून दिंडीचे हे ४० वे वर्ष आहे. वैकुंठवासी बाळकृष्ण महाराज कदम यांनी प्रारंभ केलेली व राम महाराज पोते,वै गोरक्षनाथ महाराज ढोकणे, भाऊसाहेब महाराज हरिचंद्रे व दिंडी सोहळा ट्रस्ट यांच्या मार्गदर्शनाखाली गर्भगिरी डोंगर रांगेतील नगर तालुक्यातील मांजरसुंबा येथील श्रीक्षेत्र गोरक्षनाथ गड येथून १४ जुलै रोजी सकाळी ११ वाजता निघणार आहे,यावेळी अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. पुढे करमाळा मार्गे पंढरपूरला हा सोहळा पोचणार आहे.द्वादशीला काल्याचा प्रसाद झाल्यानंतर दिंडी सोहळा विसर्जित होणार आहे

## अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाला मंजुरी देऊन लागू करा ; मागणी

**अहिल्यानगर :** अनुसूचित जातींच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याबाबत महाराष्ट्र शासनाने तातडीने निर्णय घेऊन तो लागू करावा, अन्यथा १६ जुलै २०२६ रोजी अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा सकल मातंग समाज महाराष्ट्रच्या वतीने घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत देण्यात आला. पत्रकार परिषदेत सांगण्यात आले की, दि. १ ऑगस्ट २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याचा अधिकार राज्य सरकारांना असल्याचा ऐतिहासिक निर्णय दिला. या निर्णयामुळे सामाजिक न्यायाची संकल्पना अधिक प्रभावीपणे राबविण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मातंग समाजाला नोकरी, शिक्षण तसेच विविध शासकीय योजनांमध्ये अपेक्षित प्रतिनिधित्व मिळालेले नसल्याने सन १९८० पासून उपवर्गीकरणाची मागणी सातत्याने करण्यात येत आहे. याअंतर्गत जवाब दो आंदोलन, दवंडी आंदोलन' आणि 'जनआक्रोश महाआंदोलन' यांसारखी आंदोलनेही करण्यात आली. तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर महाराष्ट्र शासनाने १५ ऑक्टोबर २०२४ रोजी निवृत्त न्यायमूर्ती अनंत मनोहर बदर यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय समितीची स्थापना केली होती. समितीने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करून, इतर राज्यांतील उपवर्गीकरणाच्या प्रक्रियेचा आढावा घेतला तसेच आवश्यक माहिती व तथ्यांचे संकलन करून मार्च २०२६ मध्ये शासनाला अहवाल सादर केला.

## केडगाव होणार प्रतिपंढरपूर : आ. जगताप



**अहिल्यानगर :** केडगाव देवी परिसरातील धनश्री कॉलनी-चिपाडे मळा येथे संत सावता महाराज तसेच श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा धार्मिक वातावरणात मोठ्या उत्साहात पार पडला. या सोहळ्यास आमदार संग्राम जगताप यांनी उपस्थित राहून भाविकांना शुभेच्छा दिल्या. परिसरातील नागरिकांच्या सहभागामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय बनला होता. यावेळी आमदार संग्राम जगताप म्हणाले की, विठ्ठल-रुक्मिणी मंदिर म्हणजे श्रद्धा, संस्कार आणि समाज एकत्र आणणारे केंद्र आहे.

# चिखलीच्या पांढरवाळ तलावातून सरपंचाने केला मुरूम उपसा!

## शासकीय अहवालात उघड




प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** मौजे चिखली येथील पांढरवाळ पाझर तलावातून (गट नं. ४७०) तत्कालीन प्रशासक तथा विद्यमान सरपंच कुलदीप पांडुरंग कदम यांनी मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर मुरूम उपसा केल्याची आणि तलाव क्षेत्रात अतिक्रमण केल्याची धक्कादायक बाब शासकीय स्तरावर उघडकीस आली आहे. मृद व जलसंधारण विभागाच्या अधिकृत स्थळ पाहणी अहवालात या बेकायदेशीर कृत्यावर आणि अतिक्रमणावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे.

चिखली येथील पांढरवाळ पाझर तलावात शासकीय नियमांचे उल्लंघन करून बेकायदेशीर उत्खनन आणि मुरूम चोरी होत असल्याबाबत गावातील सुजाण नागरिक महेश झेंडे यांनी आपले सरकार पोर्टलवर पुराव्यांसह अधिकृत तक्रार दाखल केली होती. या तक्रारीची गंभीर दखल घेत उपविभागीय जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण उपविभाग (श्रीगोंदा) यांच्या पथकाने पांढरवाळ पाझर तलावाची प्रत्यक्ष जागेवर जाऊन शासकीय पाहणी केली.

या शासकीय अधिकाऱ्यांनी केलेल्या प्रत्यक्ष पाहणीत पांढरवाळ तलावाच्या पात्रातून मोठ्या प्रमाणावर मुरूम उपसल्याचे व तलाव क्षेत्रात बेकायदेशीर अतिक्रमण झाल्याचे अधिकृतरीत्या आढळून आले आहे. विशेष म्हणजे, या उत्खननामागे 'राहू फाउंडेशन' या सामाजिक संस्थेचे नाव पुढे केले जात होते. मात्र, राहू फाउंडेशनने प्रशासनाला लेखी खुलासा देऊन पांढरवाळ तलावात (गट नंबर ४७०) कोणतेही काम केले नसल्याचे स्पष्ट केले असून संस्थेने केवळ 'उपळी पाझर तलावात' काम केल्याचे सांगितले आहे. त्यामुळे सरपंच कुलदीप कदम यांनीच पांढरवाळ तलावात हे बेकायदेशीर उत्खनन करून शासकीय मालमत्तेची लूट केल्याचे आता स्पष्ट झाले आहे.

तक्रारदार महेश झेंडे यांनी सादर केलेले पुरावे शासकीय तपासणीत तंतोतंत खरे ठरले असून, तलावातील मुरुम चोरी आणि अतिक्रमण शासकीय अहवालात सिद्ध झाले आहे. आता याप्रकरणी महसूल विभाग आणि पोलीस प्रशासन मुरुम उपसा करणाऱ्या सरपंच कुलदीप कदम यांच्यावर तात्काळ फौजदारी गुन्हा दाखल करणार का, याकडे संपूर्ण चिखली पंचक्रोशीचे लक्ष लागले आहे.

## नगरमध्ये वीज वितरण कंपनी व मनपाच्या निष्काळजीपणामुळे नागरिकांचे जीव धोक्यात : चव्हाण

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** शहरात विजेच्या धक्क्यामुळे होणाऱ्या मृत्यूच्या घटना वारंवार घडत असूनही महावितरण कंपनी आणि अहिल्यानगर महानगरपालिका अद्यापही गंभीरपणे दखल घेत नसल्याची टीका काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष दीप चव्हाण यांनी केली आहे. संबंधित विभागांच्या निष्क्रियतेमुळे नागरिकांचा जीव धोक्यात आला असून तातडीने व्यापक सुरक्षा उपाययोजना न केल्यास काँग्रेस पक्षाच्या वतीने तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

अहिल्यानगरमध्ये नुकतीच विजेच्या धक्क्याने अवघ्या साडेतीन वर्षांच्या चिमुकलीचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण शहर हळहळले. यापूर्वी ३१ ऑगस्ट २०२१ रोजी 'मिस्टर एशिया' विजेता आणि आंतरराष्ट्रीय कीर्तीचे बॉडीबिल्डर अजिंक्य सुरेश गायकवाड यांचा घरातील टीव्हीच्या वायरिंगमधून आलेल्या विजेच्या धक्क्याने मृत्यू झाला होता. त्यानंतर सावेडी येथील प्रोफेसर कॉलनी चौकात जाहिरातीचा फ्लेक्स लावत असताना विद्युत तारांच्या संपर्कात आल्याने सौरभ चौरे या तरुणालाही आपला जीव गमवावा लागला. या तीनही घटना केवळ अपघात नसून संबंधित यंत्रणांच्या निष्काळजीपणाचे जिवंत उदाहरण असल्याचे दीप चव्हाण यांनी म्हटले आहे.

अहिल्यानगर शहरात महावितरणचे हजारो वीज खांब, ट्रान्सफॉर्मर (डीपी), पथदिवे आणि विद्युत यंत्रणा अस्तित्वात आहेत. मात्र अनेक ठिकाणी डीपी उघड्या अवस्थेत असून त्यांचे दरवाजे, फ्यूज बॉक्स आणि सुरक्षा कवच गायब आहेत. विजेच्या तारा रस्त्यावर लोंबकळत आहेत. अनेक खांबांवर मोठ्या प्रमाणात वेलींचे जाळे पसरले असून झाडांच्या फांद्या थेट विद्युत तारांना चिकटलेल्या आहेत. दरवर्षी पावसाळ्यापूर्वी छाटणी आणि साफसफाईच्या नावाखाली लाखो रुपयांचा खर्च केला जातो; मात्र प्रत्यक्षात परिस्थिती जैसे थे असल्याचा आरोप त्यांनी केला.

## वैद्यकीय संस्था, क्लिनिकल आस्थापना विधेयकाचा पुनर्विचार न झाल्यास संघर्ष : डॉ. कुलकर्णी

### नियमनाला विरोध नाही, एकतर्फी नियंत्रणाला विरोध; शासनाने व्यापक चर्चा करावी : आयएमएची मागणी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** प्रस्तावित महाराष्ट्र वैद्यकीय संस्था, क्लिनिकल आस्थापना (क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट्स) विधेयक-२०२६ मधील अनेक तरतुदी एकतर्फी, नोकरशाहीप्रधान व प्रत्यक्ष आरोग्यसेवेच्या वास्तवाशी विसंगत असल्याने शासनाने या विधेयकाचा कलमनिहाय पुनर्विचार करावा, अन्यथा राज्यव्यापी लोकशाही मार्गाने संघर्ष उभारावा लागेल, असा इशारा इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) अहिल्यानगर शाखेचे अध्यक्ष डॉ. धनंजय कुलकर्णी व सचिव डॉ. अमित करडे यांनी दिला.

आयएमएने प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात नियमनाला विरोध नसून एकतर्फी नियंत्रणाला विरोध असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. रुग्णसुरक्षा, दर्जेदार आरोग्यसेवा व पारदर्शकतेला वैद्यकीय क्षेत्राचा पूर्ण पाठिंबा असल्याचे नमूद करत डॉक्टर व आरोग्य संस्थांना विश्वासात घेऊनच कायदा करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रस्तावित विधेयकामुळे ग्रामीण भागातील लहान दवाखाने, नर्सिंग होम्स व मध्यम रुग्णालयांवर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. विद्यमान नोंदणीकृत रुग्णालयांना पुन्हा तात्पुरत्या नोंदणीची सक्ती करू नये, नोंदणी प्रक्रिया पारदर्शक व कालबद्ध असावी, आपत्कालीन उपचार करणाऱ्या डॉक्टरांना कायदेशीर संरक्षण मिळावे, तसेच आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी प्रभावी कायदा करावा, अशी मागणीही आयएमएने केली आहे.

## पेडगावात महावितरणचा भोंगळ कारभार

### पुराच्या पाण्यात वीजप्रवाह, शेतकऱ्यांचे जीव धोक्यात!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**श्रीगोंदा :** पुणे जिल्ह्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे भीमा नदीच्या विसर्गामुळे पेडगाव परिसरात पुराचे पाणी वाढल्याने वीज रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) पाण्यात बुडाले आणि परिसरात वीजप्रवाह पसरल्याची धोकादायक परिस्थिती निर्माण झाली. शेतातील मोटारी काढण्यासाठी पाण्यात उतरलेल्या अनेक शेतकऱ्यांना विजेचे धक्के बसल्याने मोठी दुर्घटना टळली असली, तरी महावितरणच्या निष्काळजीपणामुळे नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

पुणे जिल्हयात झालेल्या मुसळधार पावसामुळे भीमा नदीच्या पाण्याच्या पातळीत वाढ झाली असल्यामुळे प्रशासन सतर्क झाले असताना वीज महामंडळाची झोप गेलेली दिसत नाही भीमा नदीच्या पाण्याच्या विसर्ग १६१८४८ क्यूसेस ने वाढल्यामुळे नदीकाठची विजेची रोहित्र पाण्याखाली गेले आहेत तरीही वीज पुरवठा चालूच आहेत परिणामी पाण्यात वीजप्रवाह उतरला असून अनेक शेतकरी पाणी वाढल्यामुळे नदीमधील आपल्या मोटारी काढण्यासाठी पाण्यामध्ये उतरले असता अनेकांना विजेचा धक्का बसला आहे तर विजेचा धक्का बसत असल्यामुळे अनेकांच्या मोटारी वाहून गेल्या आहेत यासाठी परिसरातील शेतकऱ्यांनी घटना घडल्यानंतर संबंधित वायरमनला वारंवार फोन करूनही त्याने प्रतिसाद दिला नाही, असा आरोप नागरिकांनी केला.

संतप्त ग्रामस्थांनी तालुक्यात येऊन महावितरणचे अधिकारी इंदलकर आणि अजय भोगम यांना जाब विचारत धारेवर धरले. अधिकाऱ्यांनी कर्मचारी पांडुरंग होळकर यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला; मात्र त्यांनीही फोन उचलला नसल्याचे सांगण्यात आले.

दरम्यान, पेडगाव विद्युत उपकेंद्रातील कर्मचाऱ्यांना तातडीने वीजपुरवठा बंद करण्याची मागणी करण्यात आली असता, वरिष्ठांच्या आदेशाशिवाय वीजपुरवठा खंडित करता येणार नाही, असे उत्तर मिळाल्याचा ग्रामस्थांचा आरोप आहे. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीतही निर्णय घेण्याचे अधिकार कर्मचाऱ्यांकडे नाहीत का, असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे.सुदैवाने या घटनेत जीवितहानी टळली. नागरिकांचा रोष आणि परस्तिती लक्षात घेऊन वीजपुरवठा खंडित करण्यात आला मात्र, शेतकऱ्यांचे प्राण धोक्यात आल्यानंतरही यंत्रणा जागी होत नसेल, तर अशा निष्काळजी अधिकाऱ्यांवर आणि कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी पेडगाव परिसरातील नागरिकांनी केली आहे.

**मिटींग चालू आहे उद्या प्रतिक्रिया देतो - इंदलकर उप कार्यकारी अभियंता**

याबाबत प्रतिक्रिया घेण्यासाठी उप कार्यकारी अभियंता इंदलकर यांच्याशी प्रतिक्रिया घेण्यासाठी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले आमची व्हीसी चालू आहे याबाबत माहिती घेऊन तुम्हाला उद्या प्रतिक्रिया देतो त्यामुळे लोकांच्या जिवापेक्षा नकीच मिटींग महत्वाची आहे का असा सवाल उपस्थित केला जात आहे त्यामुळे अधिकाऱ्यांची याबाबत किती तत्परता आहे हे यावरून दिसून येते.

## कर्जत-जामखेडच्या प्रलंबित प्रश्नांसाठी आ. पवार मुख्यमंत्र्यांच्या भेटीला



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** कर्जत-जामखेड मतदारसंघातील प्रलंबित विकासकामांना गती मिळावी आणि नागरिकांच्या दैनंदिन अडचणी दूर व्हाव्यात, यासाठी आमदार रोहित पवार यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विधानभवनात भेट घेतली. मतदारसंघाशी संबंधित विविध महत्त्वाच्या विषयांवर त्यांनी मुख्यमंत्र्यांसोबत सविस्तर चर्चा केली आणि आवश्यक निधीसह प्रशासकीय मंजुरी देण्याची आग्रही मागणी केली.

आ. रोहित पवार यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात प्रामुख्याने रस्ते, अतिवृष्टीमुळे वाहून गेलेला पूल आणि अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाच्या निधीचा प्रश्न मांडला. २७.५ किमी रस्त्यांच्या दुरुस्तीची मागणी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत मतदारसंघातील सात महत्त्वाच्या रस्त्यांच्या दुरुस्ती व मजबुतीकरणासाठी मंजुरी देण्याची मागणी त्यांनी केली. यामध्ये प्रामुख्याने खालील रस्त्यांचा समावेश आहे. शिंपोरा रोड आणि दिघी रोड, गुरव पिंपरी ते थिटेवाडी रोड, मिरजगाव ते रातंजन रोड, सावरगाव ते शिउर रस्ता आणि डोणगाव-भवरवाडी रस्ता, एकूण २७.५ किलोमीटर अंतराच्या या रस्त्यांची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाली असून, यामुळे नागरिक, शेतकरी आणि विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत असल्याचे त्यांनी मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले. नांदणी नदीवर तात्पुरता 'आर्मी बेली ब्रिज' उभारण्याची विनंती.

**रस्ते, पूल आणि न्यायालयासाठी निधीची मागणी**

# आण्णा हजारे यांच्या हस्ते राज्यव्यापी शिवपाणंद जनजागरण यात्रेला प्रारंभ

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री




**अहिल्यानगर :** शेत तिथे रस्ता, गाव तिथे समृद्धी या ध्येयवाक्याने प्रेरित महाराष्ट्र राज्य शिवपाणंद शेतरस्ता चळवळीच्या वतीने आदर्शगाव राळेगणसिद्धी येथे पद्मभूषण ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या हस्ते राज्यव्यापी शिवपाणंद शेतरस्ता जनजागरण यात्रा व पदाधिकारी सन्मान अभियानाचा उत्साहात शुभारंभ करण्यात आला. यावेळी राज्यभरातील शेतरस्त्यांच्या लढ्यात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या पदाधिकारी, कार्यकर्ते आणि संघर्षयोद्ध्यांचा 'शिव पाणंद संघर्षयोद्धा' पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, आण्णा हजारे यांच्या पाठिंब्यामुळे शिव पाणंद शेतरस्ता चळवळीला नवी ऊर्जा मिळाली असून मिशन झिरो पेण्डन्सी च्या माध्यमातून महाराष्ट्रातील प्रत्येक गरजवंत शेतकऱ्याला हक्काचा दर्जेदार आणि चिखलमुक्त सिमेंट काँक्रीटचा शेतरस्ता मिळवून देण्यासाठी चळवळ अधिक वेगाने पुढे नेली जाईल.

यावेळी त्यांनी, माझा रस्ता होवो न होवो, पण माझ्या शेवटच्या शेतकरी भावाला दर्जेदार शेतरस्ता मिळेपर्यंत मी थांबणार नाही असा निर्धार व्यक्त करत शेतकऱ्यांच्या हक्कासाठी संघर्ष सुरूच राहणार असल्याचे स्पष्ट केले. कार्यक्रमात शेतरस्त्यांसाठी निस्वार्थपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच गावोगावी जनजागृती करून प्रत्येक शेतकऱ्याला न्याय मिळवून देण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला. राज्याच्या विविध भागांतून आलेल्या पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेतकऱ्यांच्या उत्स्फूर्त उपस्थितीमुळे कार्यक्रमाला उत्साहाचे वातावरण लाभले. यावेळी अण्णा हजारे यांनी राळेगणसिद्धीतील विकासाचे उदाहरण देत शेतरस्त्यांमुळे ग्रामविकासाला गती मिळते, असे सांगितले. तसेच शरद पवळे यांच्या सामाजिक कार्यामुळे नारायणगव्हाण व राळेगणसिद्धी यांच्यातील संबंध अधिक दृढ झाल्याचे नमूद करत शेतकऱ्यांच्या समस्या समजून घेऊन न्याय देण्यासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनीही शिव पाणंद शेतरस्ता चळवळीला कायम पाठिंबा देण्याची ग्वाही दिली. जोरदार पाऊस सुरू असतानाही राज्यभरातून आलेल्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती हे कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अण्णा हजारे यांचे स्वीय सहायक दत्ता आवारी, रामदास सातकर, नाना आवारी यांनी मोलाचे सहकार्य केले. यावेळी शरद पवळे, रविंद्र खुडे, नाथाभाऊ शिंदे, बाळासाहेब थोरात, सुरेश वाळके, विजय शेलार, सचिन शेळके, मनोहर मतकर, आंबादास आव्हाड, पोपट शेळके, शांताराम पानमंद, विठ्ठल निर्मळ, अशोक कचरे, शिवाजी राऊत, राहुल गट, युवराज कानसकर, विजय दळवी, नाना शिंदे, दशरथ वाळूंज, भाऊसाहेब वाळूंज, बबन दाभाडे, शिराज पठाण, दत्तात्रय बांगर, थोरवे राज्यभरातील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## नारायणगव्हाण रस्त्याबाबत प्रशासनाला अंतिम अल्टिमेटम

### १६ जुलैला प्रतीकात्मक पुतळ्याची अंत्ययात्रा, दहन व रास्तारोको

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**जातेगाव :** पुणे महामार्गावरील नारायणगव्हाण येथील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या चौपदरीकरणाच्या कामामुळे नागरिकांचा जीव धोक्यात आला असून, वारंवार होणाऱ्या अपघातांनी ग्रामस्थांचा संताप शिगेला पोहोचला आहे. त्यामुळे रस्त्याचे काम तातडीने सुरू करावे, अन्यथा दि. १६ जुलै २०२६ रोजी प्रशासनाच्या प्रतीकात्मक पुतळ्याची अंत्ययात्रा काढून महामार्गावर पुतळा दहन व तीव्र रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा अंतिम इशारा सामाजिक कार्यकर्ते सचिन बबन शेळके यांनी ग्रामस्थांच्या वतीने जिल्हा प्रशासनाला दिला आहे.

याबाबत जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी (प्रांत), सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता, तहसीलदार पारनेर आणि पोलीस निरीक्षक, सुपा यांना निवेदन सादर करण्यात आले आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, नारायणगव्हाण परिसरातील महामार्गाचे काम अनेक वर्षांपासून रखडल्याने रस्त्यावर जीवघेणी परिस्थिती निर्माण झाली आहे. अपूर्ण काम, धुळीचे साम्राज्य, खड्डे आणि वाहतुकीतील अडथळ्यांमुळे दररोज अपघात होत असून नागरिकांच्या जीविताला गंभीर धोका निर्माण झाला आहे.

गेल्या काही दिवसांत जवळपास दररोज एक ते दोन अपघात घडल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे. अनेक युवक गंभीर जखमी झाले असून काहींना हात-पाय गमवावे लागले आहेत. शालेय विद्यार्थी, महाविद्यालयीन युवक-युवती, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्णवाहिकांनाही या रस्त्यावरून प्रवास करताना मोठ्या संकटाचा सामना करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. ग्रामस्थांनी यापूर्वी अनेक वेळा निवेदने देऊन, पाठपुरावा करून तसेच आंदोलने करूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

दखल

## बनावट इन्स्टाग्राम आयडीवरून महिलेला ब्लॅकमेल; युवक अटकेत

**सोमेश्वरनगर :** बारामती तालुक्यातील वडगाव निंबाळकर पोलीस ठाण्याच्या हद्दीत महिलेच्या नावाने बनावट इन्स्टाग्राम खाते तयार करून तिची बदनामी करणे, अश्लील संदेश पाठविणे आणि नग्न फोटो-व्हिडिओची मागणी करत ब्लॅकमेल केल्याप्रकरणी एका युवकाला पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिपक मधुकर दुबळे (रा. करंजे, ता. बारामती) याने एप्रिल २०२६ ते ३ जुलै २०२६ या कालावधीत फिर्यादी महिलेच्या नावाने बनावट इन्स्टाग्राम आयडी तयार केला. त्यावरून महिलेस अश्लील फोटो पाठवत नग्न फोटो पाठविण्याची मागणी केली. तसेच, फोटो व्हायरल करायचे नसतील तर नग्न अवस्थेत व्हिडिओ कॉल कर, अशी धमकी देऊन तिच्यावर मानसिक दबाव आणल्याचे तक्रारीत नमूद आहे.आरोपीने महिलेचे नग्न फोटो व व्हिडिओ स्वतःच्या मोबाईलमध्ये जतन करून परिसरातील काही व्यक्तींना पाठविल्याने तिची बदनामी झाली असून ती मानसिक धक्क्यात असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.या प्रकरणी वडगाव निंबाळकर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ३१९, ७७, ७८, २९५, पॉक्सो कायद्यातील संबंधित कलमे तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियमातील विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक पवार पुढील तपास करीत असून प्रकरणाचा अहवाल विशेष न्यायालय, बारामती येथे सादर करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.



## थोरांदळेत महिलेचा खून; पती फरार, पोलिसांचा शोध सुरू

**वळती :** आंबेगाव तालुक्यातील थोरांदळे येथील गुंडवस्ती परिसरात ठाकर समाजातील ३५ वर्षीय सपना दीपक पारधी यांचा खून झाल्याची धक्कादायक घटना मंगळवारी उघडकीस आली. त्यांच्या डोक्यात वार करून हत्या करण्यात आल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, सपना पारधी आणि त्यांचे पती दीपक पारधी हे शेतमजुरीसाठी आठ दिवसांपूर्वी थोरांदळे येथे आले होते. मंगळवारी सकाळी शेतकरी दत्तात्रय बारवकर यांना सपना पारधी या रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या अवस्थेत आढळून आल्या. त्यांनी तातडीने याबाबतची माहिती पोलिसांना दिली.घटनेची माहिती मिळताच मंचर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. त्यानंतर सपना पारधी यांना मंचर उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केले.या घटनेनंतर संशयित पती दीपक पारधी हा फरार झाला असून पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला आहे. खुनामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून मंचर पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

## झाडे पडून होणाऱ्या नुकसानीसाठी स्पष्ट नुकसानभरपाईची तरतूद करा : डॉ. गोऱ्हे

**पुणे :** राज्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे झाडे कोसळून मृत्यू, गंभीर दुखापती तसेच खासगी व सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या विद्यमान नियमांमध्ये सुधारणा करून स्पष्ट नुकसानभरपाईची तरतूद करण्यात यावी, अशी मागणी शिवसेना नेत्या व माजी उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. महसूल व वन विभागाच्या २७ मार्च २०२३ च्या शासन निर्णयात झाडे पडल्यामुळे होणाऱ्या मृत्यू किंवा मालमत्तेच्या नुकसानीबाबत स्पष्ट आर्थिक मदतीची तरतूद नसल्याने बाधित नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. त्यामुळे राज्य आपत्ती प्रतिसाद निधी व राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीच्या धर्तीवर नुकसानभरपाईचे निकष निश्चित करण्याची मागणी त्यांनी केली.मुंबईतील वाढत्या झाडे पडण्याच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर डॉ. गोऱ्हे यांनी मुंबई महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे व जिल्हाधिकारी आंचल गोयल यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून परिस्थितीची माहिती घेतली. धोकादायक झाडांबाबत तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याच्या तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या सूचना त्यांनी प्रशासनाला केल्या.

# 'पीएमआरडीए'ची संकटमोचक टीम

## जीवाची पर्वा न करता शेकडो नागरिकांना दिला जीवदानाचा हात

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पुणे:** बाहेर मुसळधार पाऊस, सर्वत्र पाणीच पाणी, पूर आणि भूस्खलनामुळे निर्माण झालेली भीतीदायक परिस्थिती... अशा संकटाच्या क्षणी अनेक नागरिकांसाठी देवदूत ठरली ती पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) अंतर्गत अग्निशमन दल आणि पुणे महानगर आपत्ती प्रतिसाद पथक (पीडीआरएफ). गेल्या २४ तासांत या पथकाने स्वतःचा जीव धोक्यात घालून शेकडो नागरिकांना सुरक्षितस्थळी पोहोचवित मानवतेचे दर्शन घडविले.

लोणावळा, मावळ, खेड, लोहगाव, लोणी काळभोर आणि परिसरात अतिवृष्टीमुळे अनेक ठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली. घरांमध्ये, सोसायट्यांमध्ये आणि वाहनांमध्ये अडकलेल्या नागरिकांना बाहेर काढण्यासाठी बचाव पथकांनी पावसाची पर्वा न करता सलग मोहीम राबविली. ग्रीन लँड व्हिला येथे अडकलेल्या दोन ज्येष्ठ नागरिकांना सुखरूप बाहेर काढण्यात आले, तर कार्ले येथील माऊंट वेस्ट क्रिस्टा सोसायटीतील २१ नागरिकांची लाइफ जॅकेट, लाइफ रिंग आणि दोरांच्या साहाय्याने सुरक्षित सुटका करण्यात आली.

लोहगावमधील आदर्श नगर परिसरात पाण्यात अडकलेल्या बसमधील १० ते १२ प्रवाशांना बाहेर काढण्यात आले. मळवली येथील सूर्य व्हिला परिसरात २० नागरिकांसह एका पाळीव कुत्र्यालाही सुरक्षितस्थळी हलविण्यात आले. वाकसाई परिसरातील विविध व्हिलांमध्ये अडकलेल्या ३४ नागरिकांचीही सुखरूप सुटका करण्यात आली.

दरम्यान, खेड तालुक्यातील रेटवडी येथे बुडालेल्या व्यक्तीच्या शोधासाठी विशेष पथक कार्यरत असून, शेलू येथे एका व्यक्तीचा शोध घेऊन त्याला बाहेर काढण्यात आले. लोणावळ्यातील नॉर्थ पॉईंट आणि श्री सिक्स्टी रिसॉर्ट परिसरातील भूस्खलनानंतरही शोध व बचाव मोहीम सुरू आहे.

महानगर आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी सांगितले की, नागरिकांच्या जीविताचे संरक्षण हेच सर्वोच्च प्राधान्य असून पीएमआरडीएची संपूर्ण यंत्रणा २४ तास सज्ज आहे. त्यांनी नागरिकांना नदीपात्र, सखल भाग आणि धोकादायक ठिकाणांपासून दूर राहण्याचे, अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन केले. संकटाच्या काळात गणवेशातील या जवानांनी दाखविलेली तत्परता, धाडस आणि सेवाभाव यामुळे अनेक कुटुंबांचे जीव वाचले. मुसळधार पावसाच्या संकटात पीएमआरडीएचे अग्निशमन दल आणि पीडीआरएफ खऱ्या अर्थाने नागरिकांसाठी 'संकटमोचक' ठरत असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले.





## मंचर दूध भेसळ प्रकरणी सर्वपक्षीय आक्रमक; उद्या मूक मोर्चाचे आयोजन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**मंचर :** दूध भेसळ प्रकरणाच्या निषेधार्थ मंचर मार्केट यार्ड येथे सर्वपक्षीय आंदोलन करण्यात आले. विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी झाले होते. संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. आंदोलनादरम्यान नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांना कोणतीही सवलत देऊ नये, तसेच दूध भेसळ प्रकरणातील सत्य जनतेसमोर आणावे, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी मांडली. यावेळी जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट देवदत्त निकम,शिवसेना जिल्हाप्रमुख सुरेश भोर, शिवसेना (शिंदे गट) जिल्हाप्रमुख देविदास दरेकर, भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष विजय पवार, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) युवक अध्यक्ष विशाल वाबळे, शिवसेना कार्यकारणी अध्यक्ष सचिन बांगर तसेच शिवसेना नेते राजाराम बाणखेले यांनी आंदोलनात सहभाग घेत प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली.दूध भेसळीसारख्या गंभीर प्रकारामुळे ग्राहकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याने प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. तसेच या प्रकरणातील दोषींना कठोर शिक्षा देऊन भविष्यात अशा प्रकारांना आळा घालावा, असेही त्यांनी नमूद केले. दरम्यान, या प्रकरणाच्या निषेधार्थ उद्या दि. ८ रोजी सकाळी मंचर येथे सर्वपक्षीय मूक मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

## या गावातील रस्ते सतत खड्डेमय एसटी महामंडळानेही बंद केली बस



**सोमेश्वरनगर :** बारामती तालुक्यातील मुर्टी, जोगवडी, कोळविहिरे (सर्वत्र मिळून १० की मी टप्पा) हा रस्ता पावसाच्या अगोदरच खड्डेमय झाला होता आता सुरू असलेल्या सततच्या पावसात जास्तीचे खड्डे पडणार असून येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागणार आहे. संबंधित प्रशासन यांनी पूर्णपणे दुर्लक्ष केले असल्याचे स्थानिक नागरिकांनी बोलताना सांगितले . जीव मुठीत धरत धोकेदायक रस्त्याने प्रवास करावा लागत आहे कुठला खड्डा चुकवायचा आणि कसे जायचे हाच प्रश्न प्रवासी नागरिक शालेय विद्यार्थ्यांना पडला आहे. त्यामध्ये सततच्या पावसामुळे या खड्ड्यामध्ये पाणी साचल्याने अनेक विद्यार्थी दुचाकी या खड्ड्यात पडले आहे.

महत्त्वाचे म्हणजे हा रस्ता फलटण तसेच बारामती तालुक्यातील नागरिकांसाठी अतिशय जवळचा रस्ता आहे जेजुरीला एमआयडीसी कुलदैवत खंडोबा तसेच पुढे पुण्याला जाण्यासाठी बारामती नजीकचा आहे याच रस्त्याने दिवसभरात तीन एस टी बस या मार्गाने जात होत्या परंतु आता त्याही बंद झाल्या असल्याचे स्थानिक नागरिकांनी बोलताना सांगितले. एसटी बस बंद झाल्याने सर्वच गावातील नागरिक तसेच शालेय विद्यार्थी गैरसोय होत आहे. पूर्ववत एसटी महामंडळाने एसटी चालू करावी असेही स्थानिक नागरिकांनी बोलताना सांगितले.

## माऊलींच्या मानाच्या अश्वांची 'दगडूशेठ' गणपतीला अनोखी मानवंदना



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पुणे:** माऊली माऊली, ज्ञानोबा माऊली तुकाराम आणि जय गणेश... गणपती बाप्पा मोरया अशा गणेशभक्तांनी केलेल्या जयघोषाने झालेल्या भक्तिमय वातावरणात संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी सोहळ्यातील मानाच्या अश्वांनी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिराच्या सभामंडपात प्रवेश करीत अनोखी मानवंदना दिली. अश्वांचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मंदिरात मोठी गर्दी केली होती.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळ तर्फे मंदिरात या अश्वांचे पूजन करण्यात आले. कर्नाटक बेळगावमधील अंकली येथून शितोळे सरकार यांच्या मालकीच्या या दोन अश्वांचे आगमन पुण्यामध्ये झाले. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, ट्रस्टचे विश्वस्त, पदाधिकारी, कार्यकर्ते यांसह श्रीमंत उर्जितसिंह शितोळे (सरकार), श्रीमंत महादजी राजे शितोळे (सरकार) तसेच पुणेकर मोठया संख्येने उपस्थित होते.

शितोळे सरकार म्हणाले, माऊलींचे अश्व आणि गणरायाची ही अनोखी भेट आहे. यंदा देखील गणेशाचे दर्शन घेऊन हे अश्व आता आळंदी कडे प्रस्थान करतील. दरवर्षी सुमारे ३०० किलोमीटरचा पायी प्रवास करुन हे अश्व वारीला जातात. दरवर्षी अश्व गणरायासमोर सभामंडपात जाऊन मानवंदना देत असून ही शुभ गोष्ट आहे. ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने म्हणाले, वारीची शेकडो वर्षांची परंपरा आहे. आषाढी वारी ही विठ्ठल भक्तांची वारी आहे. त्यामुळे ज्यांना या वारीला येता येत नाही, ते या अश्वांचे दर्शन घेतात. गेल्या काही वर्षांपासून हे अश्व मंदिराच्या सभामंडपात येऊन गणरायाला मानवंदना देत आहेत. यंदा देखील या अश्वांनी मंदिरात येत गणरायाचे दर्शन घेतले. कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी म्हणाले, ट्रस्टतर्फे वारी अंतर्गत मोफत रुग्णवाहिका सेवा, आरोग्य तपासणी, भोजन सेवा हरित वारी, स्वच्छता अभियान, अनेक उपक्रम राबविले जातात. त्या सर्व उपक्रमांची सुरुवात या कार्यक्रमाने होत असून ट्रस्ट नेहमीच वारकऱ्यांच्या सेवेत नानाविध उपक्रम राबवित राहिल.

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांची जिल्हा नियंत्रण कक्षास भेट

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज पुणे जिल्हाधिकारी कार्यालय येथील जिल्हा नियंत्रण कक्षास भेट देऊन पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा आढावा घेतला. आपत्तीच्या काळात परिस्थितीचे गांभीर्य विचारात घेता तात्काळ उपाययोजना राबविण्याचे निर्देश दिले. तसेच आपत्तीच्या काळात शासन आणि जिल्हाप्रशासन नागरिकांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. त्यामुळे नागरिकांनी अफवावर विश्वास ठेवू नये, प्रशासनाच्यावतीने देण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करावे, आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तात्काळ प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले.



यावेळी आमदार चेतन तुपे, जिल्हा परिषद अध्यक्ष विरधवल जगदाळे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, पाटबंधारे विभागाचे अधीक्षक अभियंता, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी विठ्ठल बनोटे आदी उपस्थित होते.

श्रीमती पवार म्हणाल्या, एकूण ५६८ व्यक्तींना बचावकार्य करुन सुरक्षितरित्या बाहेर काढण्यात आले आहेत. एकूण ९ ठिकाणी छोट्या दरडी कोसळल्या आहेत. ९ ठिकाणी रस्ते बंद करण्यात आले आहेत.

तसेच जिल्ह्यात घाट माथा परिसरात ऑरेंज अलर्ट देण्यात आला असून जुन्नर, आंबेगाव, खेड, मावळ, मुळशी, राजगड व भोर तालुक्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

मावळ तालुक्यातील मौजे लोणावळा परिसरात भाजे धबधबा. लोहगड किल्ला, विसापूर किल्ला, तिकोणा किल्ला, तुंग किल्ला, टायगर पॉईट, लायन्स पॉईट पवना डॅम या ठिकाणी ३१ ऑगस्टपर्यंत भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ लागू करण्यात आले आहे.

## अतिवृष्टीतून ३० जणांची सुटका, २७० नागरिकांचे स्थलांतर

**पुणे :** पुणे जिल्ह्यात ५ व ६ जुलै रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे दरडी कोसळणे, पूल पाण्याखाली जाणे तसेच रस्ते व रेल्वे वाहतुकीवर परिणाम झाल्याच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने युद्धपातळीवर बचाव व मदतकार्य राबविले. या मोहिमेत ३० जणांची सुरक्षित सुटका करण्यात आली असून २७० हून अधिक नागरिकांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्यात आले. मात्र मावळ तालुक्यातील पाटण येथे घरावर दरड कोसळल्याने तिघांचा दुर्दैवी मृत्यू झाला.प्रादेशिक हवामान विभागाने रेड अलर्ट जारी केल्यानंतर महसूल, पोलीस, अग्निशमन दल, एनडीआरएफ, एसडीआरएफ आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी समन्वयाने आपत्कालीन उपाययोजना सुरू केल्या. जिल्ह्यातील २७ महसूल मंडळांमध्ये ६५ मिमीपेक्षा अधिक पावसाची नोंद झाली असून मावळ तालुक्यात सर्वाधिक २३७.३ मिमी पर्जन्यमान झाले.

# इंद्रायणीची आर्त विनंती... वारकरी परंपरा, श्रद्धा आणि नदीसंवर्धनाचा जागर

संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालख्यांचे पंढरपूरकडे प्रस्थान अवघ्या दोन-तीन दिवसांवर येऊन ठेपले असतांना. राज्याच्या कानाकोपऱ्यातून लाखो भाविक वारकरी देहू आणि आळंदी येथे जमा होऊ लागले होते. विठ्ठलनामाच्या गजरात, टाळ-मृदंगाच्या निनादात आणि भक्तीच्या अखंड प्रवाहात संपूर्ण वातावरण पवित्र झाले होते.

परंतु या पवित्र सोहळ्याच्या उंबरठ्यावर एक वेदनादायी वास्तव उभे होते. इंद्रायणी नदीचा प्रवाह नेहमीप्रमाणेच फेसाळलेला, प्रदूषित आणि विद्रूप दिसत होता. ज्या नदीच्या पाण्याला वारकरी तीर्थ मानतात, जिच्या स्नानाने आत्मशुद्धी होते असा विश्वास ठेवतात, त्या नदीची ही अवस्था पाहून प्रत्येक संवेदनशील मन अस्वस्थ होत होते.

कल्पना करा-इंद्रदेवाची कन्या माता इंद्रायणी हे सर्व दृश्य आपल्या अश्रुपूर्ण नेत्रांनी पाहत आहे. तिच्या मनात एकच वेदना आहे. हजारो भक्त मोठ्या श्रद्धेने तिच्या दर्शनासाठी, तिच्या स्पर्शाने पवित्र होण्यासाठी येतील; पण या प्रदूषित पाण्यात ते ना स्नान करू शकतील, ना हातात तीर्थ म्हणून पाणी घेऊ शकतील. याहून मोठे दुःख एका पवित्र नदीसाठी कोणते असू शकते?

पालखी सोहळ्यासाठी केवळ दोनच रात्री शिल्लक होत्या. हतबल झालेली माता इंद्रायणी विचार करू लागली की आता आपल्या पित्यालाच-इंद्रदेवालाच-आर्त विनंती करावी लागेल. कारण वरुणदेव तिचे ऐकतील, याची खात्री नव्हती.

पौराणिक परंपरेनुसार इंद्रायणी नदीचे महात्म्य अद्वितीय आहे. इंद्राच्या तपश्चर्येतून तिचा उदय झाल्याच्या आख्यायिका, शिव-पार्वतीशी संबंधित कथा आणि संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम यांच्या जीवनातील असंख्य घटना यांमुळे इंद्रायणीला महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक स्मृतीत अमूल्य स्थान प्राप्त झाले आहे.

५ जुलैच्या मध्यरात्री माता इंद्रायणी आपल्या पित्याला आर्त हाक मारते-

हे देवराज, माझ्या कुशीत हजारो वारकरी येत आहेत. त्यांना माझे खरे, निर्मळ रूप पाहू द्या. माझ्या स्पर्शाने त्यांना पवित्र होऊ द्या. वरुणदेवाला आदेश द्या की पहाटेपूर्वी मला माझ्या मूळ स्वरूपात वाहू द्या.

पुत्रीची करुण विनवणी ऐकून इंद्रदेव वरुणदेवाला आदेश देतात. आणि पहाट होण्यापूर्वीच आकाशात ढग दाटतात. मुसळधार पाऊस सुरू होतो. ६ जुलैच्या उषःकाळी इंद्रायणी केवळ स्वच्छच होत नाही, तर अपेक्षेपेक्षा अधिक जलप्रवाहाने वाहू लागते. तिच्या प्रवाहात जणू नवजीवन संचारते.

वरील कथा जरी मी कपोलकल्पित मांडली असली तरी तिच्यामागील संदेश अत्यंत वास्तव वादी आहे.

प्रश्न असा आहे की, इतकी पवित्र मानली जाणारी इंद्रायणी नदी वारंवार अशा अवस्थेत का पोहोचते?

इतर देशांमध्येही नद्या आहेत; परंतु त्यांच्या नदीपात्रात प्लास्टिकच्या पिशव्या, कचऱ्याचे ढीग किंवा सांडपाण्याचे फेसाळ प्रवाह दिसत नाहीत. तेथील नागरिक नदीला सार्वजनिक संपत्ती नव्हे, तर जीवनदायिनी मानून तिचे संरक्षण करतात.



आपल्याकडे ही समस्या केवळ इंद्रायणी नदीपुरती मर्यादित नाही. देशभरातील बहुतांश शहरांमधून वाहणाऱ्या नद्यांची परिस्थिती अशीच आहे. आपण स्वच्छ भारत अभियान राबवतो; पण स्वच्छतेची व्याख्या अनेकदा घर, रस्ता आणि परिसरापुरतीच मर्यादित ठेवतो. नदी हीसुद्धा आपल्या घराचाच एक भाग आहे, ही जाणीव मात्र अजूनही निर्माण झालेली नाही.

नदीकाठावरील कचरा पाहिला तर तो एका व्यक्तीने टाकलेला नसतो; तो शेकडो हातांनी टाकलेला असतो. आणि त्या शेकडो हातांमागे हजारो घरांची निष्काळजी वृत्ती दडलेली असते. प्रत्येकाला माहीत असते की घरातील कचरा कुठे जातो, पण तो शेवटी नदीत पोहोचतो, याकडे आपण दुर्लक्ष करतो.

इंद्रायणी नदी केवळ जलप्रवाह नाही तर महाराष्ट्राच्या संस्कृतीचा , संतपरंपरेचा आणि भक्तीचा जीवनवाहिनी आहे. तिचे महात्म्य वर्णन करण्यासाठी अनेक आपल्याला जन्म अपुरे पडतील. तरीही आपण तिच्या पात्रात घाण टाकतो. नदीतील सूक्ष्मजीव, जलवनस्पती आणि संपूर्ण परिसंस्था यांचे अस्तित्व आपण धोक्यात आणतो. त्याच नदीचे पाणी जलशुद्धीकरण करून आपल्या घरात येते आणि आपण तेच पाणी आपल्या कुटुंबाला पाजतो.

सकाळी नळाला पाणी आले नाही तर संपूर्ण घर अस्वस्थ होते. यावरूनच आपल्या जीवनात पाण्याचे महत्त्व किती अनन्यसाधारण आहे, हे स्पष्ट होते.

संत परंपरेत इंद्रायणीचे महात्म्य वर्णन करताना म्हटले आहे-

**ज्ञानदेव ज्ञानदेव वदतां वाचे ।**
**नाही कळिकाळाचे भेव जीवां ।।**
**जातां अलंकापुर गांवीं ।**
**मोक्ष मुक्ति दावी वाट त्यासी ।।**
**ब्रह्मज्ञान जोडोनी हात ।**
**म्हणे मी तुमचा अंकित।।**
**वाचे वदतां इंद्रायणी । यम वंदितो चरणीं ।।**
**एका जनार्दनीं भावें । ज्ञानदेवा आठवावें ।।**

प्रत्येक नदीच्या उगमस्थानी पाणी निर्मळ असते. परंतु नागरी वस्तीकडे येताच ते प्रदूषित होऊ लागते. पूर्वी मानवी संस्कृती नदीभोवती फुलली; आज आधुनिकतेच्या नादात आपण 'जलसंस्कृती'च विसरत चाललो आहोत.

पृथ्वी ही एक सजीव प्रणाली आहे. जंगले तिची फुफ्फुसे आहेत, तर नद्या तिच्या रक्तवाहिन्या आहेत. जर आपण या रक्तवाहिन्यांमध्ये विष मिसळत राहिलो, तर शेवटी संपूर्ण पृथ्वीचेच आरोग्य धोक्यात येईल.

आज नदीसंवर्धनासाठी केवळ कायदे पुरेसे नाहीत; कठोर अंमलबजावणी आवश्यक आहे. नदीपात्रात कचरा टाकणे, सांडपाणी सोडणे आणि अतिक्रमण करणे यावर कठोर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष नदी संरक्षण पथके, आधुनिक देखरेख व्यवस्था आणि प्रभावी दंडात्मक कारवाईची गरज आहे. ज्या प्रकारे राष्ट्रीय संपत्तीचे संरक्षण केले जाते, त्याच गांभीर्याने आपल्या नद्यांचे संरक्षण केले पाहिजे.इंद्रायणी ही फक्त नदी नाही. ती संतांची साक्षीदार आहे, वारकरी परंपरेची जीवनरेखा आहे आणि महाराष्ट्राच्या आत्म्याचा प्रवाह आहे.

जर आपण तिचे रक्षण केले, तर ती आपल्या पुढील पिढ्यांना जीवन देईल. पण जर आपणच तिचा श्वास गुदमरवला, तर इतिहास कदाचित आपल्याला माफ करणार नाही.नदी वाचवा म्हणजे संस्कृती वाचवा; संस्कृती वाचवा म्हणजे भविष्य वाचवा.

**लेखक : भिला सोनू पाटील**
**जलप्रहरी अवॉर्ड विजेता, जलशक्ती मंत्रालय, भारत सरकार**

## द • ख • ल

## काकडे विद्यालयात पर्यवेक्षक आव्हाड व सहशिक्षक डमरे यांचा सेवापूर्ती सत्कार




**एरंडगाव :** कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाच्या वतीने आबासाहेब काकडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शेवगाव येथे पर्यवेक्षक सुनील अंबादास आव्हाड व सहशिक्षक बापूसाहेब हरिभाऊ डमरे यांच्या नियत वयोमानानुसार सेवापूर्ती निमित्त सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास संस्थेचे आजी-माजी पदाधिकारी, प्रशासकीय अधिकारी, शिक्षक, कर्मचारी, माजी शिक्षक, दोनही सत्कारमूर्तींचे नातेवाईक, हितचिंतक व ग्रामस्थ उपस्थित होते. समारंभाच्या अध्यक्षस्थानी कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे विश्वस्त पृथ्वीसिंहभैय्या काकडे हे होते. प्रमुख उपस्थितीत समूहाचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रा. डॉ. लक्ष्मण बिटाळ, जालना येथील डिशनल कलेक्टर रमेश मिसाळ, शिक्षण विभाग प्रमुख वंदना पुजारी, सहप्रमुख अशोक आहेर, महाविद्यालयाचे उपप्राचार्य अशोक तमनर यांच्यासह दोनही सत्कारमूर्तींचे कुटुंबीय उपस्थित होते. यावेळी पृथ्वीसिंह काकडे, प्रा. डॉ. लक्ष्मण बिटाळ, सहशिक्षक ज्ञानेश्वर गरड, दोनही सत्कारमूर्तींचे नातेवाईक यांनी सुनील आव्हाड व बापूसाहेब डंबरे यांच्याविषयीच्या आपल्या आठवणींना उजाळा दिला. सत्कारमूर्ती सुनील आव्हाड यांनी आपल्या ३१ वर्षांच्या कार्यप्रवासातील अनुभव मांडत संस्था, सहकारी, विद्यार्थी व पालकांप्रती ऋण व्यक्त केले. बापूसाहेब डमरे यांनीही आपल्या मनोगतातून संस्थेने दिलेल्या संधींबद्दल तसेच सहकारी, विद्यार्थी व कुटुंबीयांविषयी कृतज्ञता व्यक्त केली.

## घंटागाडी सेवेला प्रारंभ; शेवगावच्या घनकचरा व्यवस्थापनाला नवी दिशा



**शेवगाव :** शहरातील घनकचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्याच्या उद्देशाने शेवगाव नगरपरिषदेच्या वतीने घराघरातून ओला व सुका कचरा विलगीकरण करून संकलन व वाहतूक (घंटागाडी) सेवेला सोमवारी प्रारंभ करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.स्वच्छ सर्वेक्षणात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या नागरी स्वराज्य संस्थांना मिळालेल्या प्रोत्साहनपर निधीतून हा उपक्रम राबविण्यात येत असून, पुढील दोन वर्षांसाठी हे काम 'दिग्विजय इंटरप्रायजेस, नाशिक' या संस्थेकडे सोपविण्यात आले आहे. नगरपरिषदेच्या पर्यवेक्षणाखाली या सेवेची अंमलबजावणी सुरू झाली आहे. उद्घाटनप्रसंगी नगराध्यक्ष अरुण मुंढे, उपनगराध्यक्ष ताहेर पटेल, नगरसेवक कैलास तिजोरे, वजीर पठाण, आशुतोष डहाळे, नंदू मुंढे, बाबासाहेब लांडे, प्रवीण भारस्कर, संतोष जाधव यांच्यासह नगरपरिषदेचे अभियंता व विभागप्रमुख जाधवर, आरोग्य निरीक्षक संतोष मोहिते, वाहन मुकादम निलेश जाधव, मुकादम संजय लांडे, सुभाष जाधव, आरोग्य विभागाचे कर्मचारी व नागरिक उपस्थित होते. घंटागाडी सेवेबाबत तक्रार असल्यास वाहन निरीक्षक निलेश जाधव किंवा प्रभारी आरोग्य निरीक्षक संतोष मोहिते यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## न थांबता, अविरत परिश्रमाने यश नक्की नवनियुक्त स.पो.नि.सखाराम जुंबड



**शेवगाव :** फक्त पोलीस या पदावर न राहता इतर अधिकाऱ्यांकडे बघून व त्यांची प्रेरणा घेऊन तसेच शिक्षकांमुळेच पी.एस.आय.या पदावर पोहोचू शकलो.अविरत परिश्रम घेतले तरी यश नक्की मिळते असे प्रतिपादन सहाय्यक पोलीस निरीक्षक सखाराम झुंबड यांनी केले. चापडगाव कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता अकरावी कला व विज्ञान शाखेतील नवागत विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ व कर्मयोगी आबासाहेब काकडे यांच्या १०७ व्या जयंती उत्सव पंधरवडा निमित्त शालेय खो-खो क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटन समारंभ प्रसंगी ते अध्यक्षस्थानाहुन बोलत होते. यावेळी प्रा. संपत दसपुते, सुनील जायभाये, संजय दुधाडे, विठ्ठल गमे, सखाराम जुंबड, पंडित नेमाने, भारत लोहकरे, बाबासाहेब पातकळ, गणेश तेलोरे, विलास खोसे, मारुती कातकडे, आबासाहेब नेमाने, शशिकांत नेमाने, विष्णू नेमाने, संजय मडके, रवींद्र मोरे, वनीता मोरे, जनार्दन जुंबड, हरिभाऊ लोहकरे,संजय चंदळकर, नारायण पातकळ, ज्ञानदेव दातीर, भाऊसाहेब धुपे, क्रीडा शिक्षक गणेश ढोले, कल्पेश भागवत, दीपक कुसळकर, सादिक शेख, ज्ञानेश्वर तहकीक, सचिन वाल्हेकर, आदिनाथ काटे उपस्थित होते.

## अतिवृष्टीमुळे दोन रस्ते वाहतुकीसाठी बंद

**लिंपणगाव :** जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे नदी व नाल्यांवरील पाणीपातळीत वाढ झाली असून सुरक्षिततेच्या दृष्टीने खालील रस्ते तात्पुरते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत. १. पेडगाव - शेडगाव मार्ग बंद निमगाव खलू - कौठा - अजनुज - पेडगाव - शेडगाव (रा.मा. ४७८) कि.मी. १८/२०० येथील सरस्वती नदीवरील पर्यायी मार्ग पाण्याखाली गेल्यामुळे पेडगाव ते शेडगाव मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. २. आर्वी पुनर्वसन - अजनुज मार्ग बंद => कौठा - अनगरे - आर्वी - अजनुज - श्रीगोंदा (रा.मा. ४७९) कि.मी. ७/७०० येथील पाईप मोरीवरून पाणी वाहत असल्यामुळे आर्वी पुनर्वसन ते अजनुज मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. नागरिकांना आवाहन बंद मार्गांवरून प्रवास करण्याचा प्रयत्न करू नये. पर्यायी सुरक्षित मार्गांचा वापर करावा. प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून सहकार्य करावे.



# रिमझिम सरींनी बळीराजाच्या आशा पल्लवीत ; पेरणीसाठी शेतशिवार सज्ज!

**शशिकांत पवार। राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** मृग-रोहिणी कोरडे ; मूग-उडीदाची पेरणी वाया ; बाजरी, सोयाबीकडे कल ; सर्वदूर पावसाची हजेरी नगर तालुका ( शशिकांत पवार) : नगर तालुक्यात मृग व रोहिणी नक्षत्राने अक्षरशः पाठ फिरवल्याने खरीप हंगामाची सुरुवातच संकटात सापडली. पावसाअभावी मूग व उडीदाची पेरणी वाया गेली. २२ जूनपासून सुरू झालेल्या आर्द्रा नक्षत्रात समाधानकारक पाऊस झाला नसला तरी कमी-अधिक प्रमाणात सरी कोसळल्या. ६ जुलैपासून पुनर्वसू नक्षत्र सुरू होताच तालुक्यात सलग तीन दिवस रिमझिम पाऊस सुरू असल्याने बळीराजाच्या आशा पुन्हा एकदा पल्लवीत झाल्या आहेत. वापसा होताच तालुक्यात पेरणीच्या कामांची लगबग सुरू होणार आहे.

रविवारपासून सुरू असलेल्या रिमझिम पावसामुळे शिवारात ओलावा निर्माण झाला आहे. पाऊस समाधानकारक नसला तरी दीर्घ प्रतीक्षेनंतर मिळालेल्या या ओलाव्यावरच शेतकरी बाजरी, सोयाबीन व तुरीच्या पेरणीला सुरुवात करण्याच्या तयारीत आहेत. आणखी प्रतीक्षा करण्याची मानसिकता आता शेतकऱ्यांची राहिलेली नसून उपलब्ध ओलाव्याचा फायदा घेऊन पेरण्या उरकण्याकडे त्यांचा कल आहे.

मृग व रोहिणी नक्षत्र कोरडे गेल्यामुळे मूग व उडीदाच्या क्षेत्राला मोठा फटका बसला आहे. त्यामुळे या पिकांच्या जागी बाजरी व सोयाबीनचे क्षेत्र वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे. विशेषतः सोयाबीनच्या पेरणीकडे शेतकऱ्यांचा वाढता कल राहणार असल्याचे दिसून येत आहे.

सलग तीन दिवस सुरु असलेल्या रिमझिम पावसामुळे आर्द्रा नक्षत्राच्या सुरुवातीला पेरणी केलेल्या पिकांनाही नवसंजीवनी मिळाली आहे.

तालुक्यात अद्यापही समाधानकारक पाऊस झालेला नसल्याने खरीप हंगामाचे भवितव्य पुढील पावसावरच अवलंबून आहे. दरम्यान तालुक्यात पिण्याच्या पाण्याची समस्याही गंभीर बनली असून तब्बल १९ गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागत आहे. २० जुलैपासून सुरू होणाऱ्या पुष्य नक्षत्राकडे शेतकऱ्यांच्या नजरा लागल्या आहेत.


**मंडळ निहाय झालेला एकुण पाऊस !**
**नालेगाव- ५६.९, सावेडी- ५०.५ , कापूरवाडी- ५०.९ , केडगाव- ५५.५, भिंगार- ४२.७, नागापुर- ३२.२, जेऊर- २५.८, चिचोंडी पाटील- ३९.८, वाळकी-३९.८, चास- ५०.७, रुईछत्तीसी -४४.९, नेप्ती- ७१ मिलीमीटर.**

**शेतकऱ्यांनी ७५ ते १०० मिलिमीटर पाऊस झाल्याशिवाय पेरणी करू नये. बीज प्रक्रिया करूनच पेरणी करावी. पेरणी करताना उच्च दर्जाच्या बियाणांची निवड करावी. काही समस्या असल्यास कृषी विभागाशी संपर्क साधावा.**
**माधवी घोरपडे,** मंडळाधिकारी, कृषी विभाग



**पावसाची वाट पाहता पाहता डोळे थकले. मशागतीवर मोठा खर्च झाला पण पाऊस दडी मारत होता. आता पडलेल्या सरींनी आशा जागवल्या आहेत. आगामी नक्षत्रात वरुणराजाने साथ दिली तरच खरीप हंगाम हातात राहील.**
**राजु पवार ,** शेतकरी, जेऊर

**मृग आणि रोहिणीने पूर्णपणे निराश केलं. मूग-उडीदाची पेरणी वाया गेली. सध्या सुरू असलेल्या रिमझिम पावसावरच बाजरी, सोयाबीन आणि तुरीची पेरणी करणार आहोत. समाधानकारक पाऊस व्हावा एवढीच बळीराजाची अपेक्षा आहे.**
**निलेश कासार,** शेतकरी, वाळकी



## मिरी विद्यालयाचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**करंजी :** मिरी ता. पाथर्डी येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी महाराज विद्यालयाने इयत्ता ५ वी व ८ वी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. इयत्ता ८ वीचे १० विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले असून विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे. इयत्ता ५ वीमध्ये कृष्णा जाधव (२१४) व माऊली जाधव (२०८) यांनी उल्लेखनीय गुण मिळविले. इयत्ता ८ वीमध्ये ऋतुजा तोगे (२३८), स्वराली आव्हाड (२३६), सरस्वती सरोदे (२२८), श्रावणी गाले (२२४), श्रुती घोरपडे (२१०), तनुजा राऊत (२१०), श्रीराज घोरपडे (२०८), शिवम गवळी (२०४), शिवम घोरपडे (२००) व श्रुती घाडगे (२००) हे विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले. मिरी विद्यालयाचे शिष्यवृत्ती मिळवणारे हे विद्यार्थी रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागामध्ये गुणवत्ता यादीत चमकले आहेत. मिरी विद्यालयामध्ये या पूर्वीही वेगळ्यावेगळ्या शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यार्थ्यांनी मोठे यश संपादन केलेले आहे.रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागांमध्ये मिरी येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज विद्यालय हे गुणवत्ते मध्ये चौथ्या क्रमांकावर आहे. त्यामुळे परिसरातून या शाळेला मोठी पसंती दिली जात असून शाळेचा गुणवत्तेचा दर्जा दिवसेंदिवस उंचावत असल्याचे संतोष शिंदे, सुभाष गवळी, डॉ. अमोल नरसाळे आदि ग्रामस्थांनी यावेळी सांगितले.

## संकटग्रस्त शेतकरी कुटुंबाला तातडीने मदत करा : रवींद्र राजदेव

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**टाकळी ढोकेश्वर :** सतत कोसळणाऱ्या पावसाने एका शेतकरी कुटुंबाच्या डोक्यावरचे छप्परच संकटात आणले आहे. पारनेर तालुक्यातील सावरगाव येथील चिकणेवाडीमध्ये राहणारे शेतकरी पुंडलिक गोविंद चिकणे यांच्या घराच्या पुढील व मागील बाजूच्या दगडी भिंती अचानक कोसळल्याने संपूर्ण कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.गेल्या चार-पाच दिवसांपासून सुरू असलेल्या रिमझिम पावसामुळे भिंती पूर्णपणे ढासळल्या. उर्वरित भिंतींनाही मोठे तडे गेल्याने घर कोणत्याही क्षणी कोसळण्याच्या स्थितीत आहे. जीव मुठीत धरून जगण्याची वेळ या कुटुंबावर आली आहे. आयुष्यभराच्या कष्टातून उभारलेले घर क्षणात उद्ध्वस्त झाल्याने कुटुंबावर आर्थिक आणि मानसिक आघात झाला आहे. आता या कुटुंबासमोर सुरक्षित निवाऱ्याचा गंभीर प्रश्न उभा ठाकला आहे. त्यांनी संबंधित तलाठी व महसूल अधिकाऱ्यांना बोलावून पंचनामा करून घेतला आणि शासनाच्या आपत्ती निवारण निधीतून त्वरित आर्थिक मदत मंजूर करण्याची मागणी केली तसेच चिकणे कुटुंबाची अत्यंत हलाखीची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन त्यांना तातडीने घरकुल योजनेचा लाभ देण्याची मागणीही प्रशासनाकडे केली. यावेळी शिवाजी बेलकर, बाळा चिकणे, भानुदास आग्रे, नवनाथ गांजे, रमेश घोलप, रवींद्र चौधरी, पांडुरंग जेडगुले, तलाठी भालेकर ग्रामस्थ उपस्थित होते.



## ५ वी शिष्यवृत्ती परीक्षेत पिंपरी जलसेन शाळेची जिल्ह्यात सर्वोत्कृष्ट कामगिरी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर :** तालुक्यातील पिंपरी जलसेन शाळेमध्ये इ.५ वी शिष्यवृत्ती परीक्षेत ५५ विद्यार्थी ह पात्र झाले आहेत. निवडक विद्यार्थ्यांवरती काम न करता जास्तीत जास्त विद्यार्थ्यांवरती क्षमता रुजवण्याचे वेगळेपण पिंपरी यावेळी जलसेन शाळेने जपले आणि ते निकालातुन ते दाखून दिलें. यामध्ये १३ विद्यार्थ्यांनी २०० पेक्षा जास्त गुण मिळविले आहेत. जिल्हा गुणवत्ता यादीमध्ये निवड झालेल्यां विद्यार्थ्यांमध्ये, ओवी मोरे २५० , आर्यन भुकन २४२ , स्पृहा खार्गे २४० सोहम झरेकर २३२ ,समृद्धी खेडकर २२६ , अथर्व खोसे २२२ , ईश्वरी जंबे २१४ सान्वी लामखडे २१४ ,वेदिका एरंडे २०८ , विश्वराज भोंडवे २०० , उत्कर्षा अडसरे २००, श्रुती वेताळ २०० , शिवम भगत यांनी २०० गुण मिळवत मोठे यश प्राप्त केले आहे. याच शाळेतील नवोदय परीक्षेमध्येही सोहम झरेकर याची निवड झाली. प्रत्येक विद्यार्थ्यांमधे क्षमता रुजविण्याच्या प्रयत्नांमुळे ८५ टक्के गुणां पेक्षा जास्त गुण मिळवत तब्बल तीस विद्यार्थ्यांनी यशस्वी मजल मारली. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या प्रेरणेने सुरू झालेली वाचन चळवळ आता ४०० कुटुंबांपर्यंत पोहोचली असून रोज संध्याकाळी ७ वाजता सर्व विद्यार्थी कुटुंबांमध्ये सामूहिक वाचन करतात व त्याचा एक मिनिटाचा व्हिडिओ शाळेच्या ग्रुप वर शेअर करतात.



## बारडगाव सुद्रीक सोसायटीचा राम शिंदेंच्या नावाला एकमुखी पाठिंबा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत :** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू होण्यापूर्वीच कर्जत-जामखेड मतदारसंघात राजकीय हालचालींना वेग आला आहे. विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांना बारडगाव सुद्रिक विविध कार्यकारी सेवा सोसायटीने एकमुखी पाठिंबा जाहीर केला. सूचक म्हणून किसन बरकडे तर अनुमोदक म्हणून किसन जाधव यांनी महत्त्वाची भूमिका बजावली

अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात राजकीय वातावरण तापू लागले आहे. सध्या भाजपात जिल्हा बँकेसाठी जोरदार हालचाली सुरू असून निवडणुकीची रंगत दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी अहिल्यानगरच्या एका राजकीय कार्यक्रमात आगामी काळात जिल्हा बँकेच्या राजकारणात लक्ष घालावे लागेल असे सूचक वक्तव्य केले होते. त्या अनुषंगाने आता त्यांनी पावले उचलण्यास सुरुवात देखील केली आहे. जामखेड पाठोपाठ कर्जतमध्ये देखील त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब होत सहकार क्षेत्रात ठराव होताना दिसत आहे. याच पार्श्वभूमीवर बारडगाव सुद्रीकचे (ता.कर्जत) डॉ. सुनील गावडे, अंकुशराव गावडे, गणपत पाटील, लालासाहेब बरकडे, विलास जांभळकर यांच्या नेतृत्वाखाली बारडगाव सुद्रिक विविध कार्यकारी सेवा सोसायटीने विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या नावाचा ठराव एकमतांनी पास केला. यावेळी संचालक कांताबाई गावडे, महादेव साबळे, दिपक सुद्रिक, किसन जाधव, अक्षय गावडे, वसंत गावडे, लालासाहेब सोलंकर, दत्तात्रय गावडे, देविदास पांडुळे, किसन बरकाडे, दिगंबर दराडे, सुभाष गावडे, कमल सुद्रिक आदी संचालक उपस्थित होते. या सभेचे कामकाज सचिव विठ्ठल वाघमारे व लिपिक दिलीप सुद्रिक यांनी पाहिले. राम शिंदे यांच्या नावाचा ठराव केल्यामुळे कर्जतचे मंडळ अध्यक्ष अनिल गदादे यांनी सर्व संचालकांचे आभार मानले.

**जिल्हा बँकेच्या निवडणुकीत यंदा रंगत वाढणार**

## अग्रीपंख फौंडेशनकडून मिशन गर्ल्स स्कूलच्या विद्यार्थिनींना साहित्य वाटप

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** समाज्यातील उपेक्षित घटकांतील विद्यार्थिनींना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या स्वप्नांना नवी उभारी मिळावी या उद्देशाने भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रेरणेने कार्यरत असलेल्या अग्रीपंख फाउंडेशनच्या वतीने श्रीगोंदा येथील मिशन गर्ल्स स्कूलमधील विद्यार्थिनींना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात तहसीलदार सचिन डोंगरे, पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या हस्ते विद्यार्थिनींना शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. तसेच गुणवंत विद्यार्थिनी प्रकृती घोडके हिचा सत्कार करण्यात आला.यावेळी बोलताना तहसीलदार सचिन डोंगरे म्हणाले, विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याचे अग्रीपंख फाउंडेशनचे कार्य निश्चितच कौतुकास्पद आहे. विद्यार्थ्यांनी राष्ट्रपुरुष, महान खेळाडू, उद्योजक आणि शिक्षक यांच्या जीवनातून प्रेरणा घेत अभ्यास करून स्वतःचे उज्ज्वल भविष्य घडवावे.पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, विद्यार्थ्यांना मदत करण्याची समाजाची भावना वाढत आहे. मात्र शिक्षकांनी स्वतःची मुले ज्या शाळेत शिकवतात, त्याच शाळेत शिक्षण देण्याचा आदर्श निर्माण केला, तर पालकांचा शाळांवरील विश्वास अधिक दृढ होईल. मिशन गर्ल्स स्कूलमधील शिक्षकांनीही विद्यार्थीसंख्या वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत. विद्यार्थिनींना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत मार्गदर्शन केले. कार्यक्रमास जगतगुरू संत तुकाराम महाराज वृक्ष संवर्धन समितीचे अध्यक्ष नवनाथ दरेकर, मुख्याध्यापिका सुरेखा भालेराव, पिटर नरसिंग, अमोल गव्हाणे, दत्ता जगताप, गणेश कविटकर, सुहास कुलकर्णी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तुषार शिंदे यांनी केले.

## श्रीगोंदा तालुक्यात दोन दिवसाच्या पावसानंतर पुन्हा विश्रांती

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यात दोन महिने पावसाने हुलकावणी दिली. त्यामुळे खरीप हंगाम लांबीवर पडला त्यानंतर पाच आणि सहा जुलै रोजी पावसाने संततधार सुरुवात केली. आणि शेतकऱ्यांच्य जीव भांड्यात पडला .परंतु सात जुलै रोजी पुन्हा पावसाने विश्रांती घेतली. मात्र ढगाळ वातावरण कायम दिसून आले. मात्र धरण परिसरात जोरदार पाऊस असल्याने तालुक्यातील नदी काठावरील गावांना प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे. सहा जुलै रोजी रात्रभर संततदार पाऊस पडल्यामुळे तालुक्यातील काष्टी आणि पेडगाव मंडळामध्ये ५४ मिलिमीटर पावसाची नोंद झाल्याची माहिती समोर येत आहे. श्रीगोंदा तालुक्यात जवळपास ११ कृषी विभागाची मंडळे आहेत. प्रामुख्याने या मंडळातील सहा जुलै पर्यंत मिलिमीटर पावसाची नोंद पुढीलप्रमाणे:- श्रीगोंदा ४२.३, काष्टी ५४, मांडवगण २५.३, बेलवंडी ३३.८, पेडगाव ५४ मिलिमीटर, चिंभळा ४४.३, देवदैठण ४३ मिलिमीटर, कोळगाव ते ३३.८ मिलिमीटर, लोणी व्यंकनाथ ३१.८, भानगाव ४१.८ आणि आढळगाव मंडळामध्ये ४०.५ मिलिमीटर पावसाची नोंद झाली असल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी क्रांती चौधरी यांनी दिली.

## लोकप्रतिनिधींचा अवमान करणाऱ्या अधिकाऱ्याविरुद्ध कारवाई करावी : आव्हाड

**अविनाश मंत्री। राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी : कल्याण विशाखापट्टण राष्ट्रीय महामार्गावरील खड्ड्यांची दुरुस्ती करंजी घाटामधील प्रलंबित असलेले दरडीचे काम यासह शहरातील बस स्थानकासमोरील फुटलेल्या गटारीचे काम तुम्ही दुरुस्त करावे. लोकप्रतिनिधीं बरोबर बेजबाबदार पणे वर्तन करणाऱ्या अधिकाऱ्याविरुद्ध कारवाई करावी यासाठी नगराध्यक्ष अभय आव्हाड यांच्या नेतृत्वाखाली पालिका सत्ताधारी आघाडीचे नगरसेवक व कार्यकर्त्यांनी प्रांत अधिकाऱ्यांना निवेदन देत आंदोलनाचा इशारा दिला आहे.**



राष्ट्रीय महामार्ग निव्वळ नावापुरताच राहिला असून दुरुस्तीसाठी ठिकठिकाणी आंदोलने झाली. बेकायदेशीर रित्या महामार्गांवर गतिरोधक टाकले गेले. अधिकारी फोन उचलत नाहीत, कार्यालयात भेटत नाहीत. चुकून कधी संपर्क झाला तर केवळ आश्वासनापलीकडे काहीही काम करत नाही. त्यामुळे महामार्ग म्हणजे शोभेची वस्तू बनला आहे. महामार्ग च्या बाजूची अतिक्रमणे वाढत चालल्याने तिसगाव पाथर्डी या ठिकाणी वाहतूक कोंडी होते.

याबाबत माहिती देताना नगराध्यक्ष आव्हाड म्हणाले, आ. मोनिका राजळे यांनी महामार्गाच्या दुरावस्थेबाबत व प्रलंबित कामाबाबत संबंधित विभागाला वारंवार तोंडी व लेखी सूचना दिल्या. वाढत्या अपघातामुळे सर्वसामान्य प्रवाशांचा जीव धोक्यात येऊन निरपराध लोकांचे बळी जायला लागले. याकडे तातडीने लक्ष वेधण्यासाठी आमदार मोनिका राजळे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना फोन केला असता, त्यांनी फोनही उचलला नाही. त्यांच्याशी पुन्हा संपर्कही केला नाही. चार दिवसांपूर्वी आमदारांनी विधानसभेमधील लक्षवेधी सूचना मांडत या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधले.

राष्ट्रीय महामार्ग निव्वळ नावापुरता राहिला असून चांदबिबी महालापासून पुढे या रस्त्याची दुरावस्था सुरू होते. मेहेकरी चा सदोष पूल, कौडगाव पासून पुढे खड्ड्यांची मालिका सुरू होते. बारव येथील ओढ्या वरील खटकी, वर्षभरापासून प्रलंबित असलेले करंजी घाटामधील खचलेल्या दरडीचे रस्त्याचे काम, देवराई परिसरातील दोन्ही बाजूकडील रस्त्यावरील खड्डे, निवडुंगे स्टॅन्ड कडून पाथर्डी कडे येताना वळणाच्या मध्यभागी असलेले खड्डे, मानमोडी ओढ्यातील खटकी, निवडुंगे नदीवरील खटकी, कारखाना फाट्यापासून बाबळगाव फाट्यापर्यंतचे रस्त्यावरील निघालेले डांबर, शहरातील भानुप्रयाग लॉज समोरील एसटी स्टँडच्या प्रवेशद्वारावरील फुटलेल्या गटारी व खड्डे, आंबेडकर पुतळ्यासमोरील खड्डा, अशी अनेक कामे प्रलंबित आहेत. दिशादर्शक व आंतर दर्शक फलक अभावानेच दिसतात. शेकटा फाटा येथे ट्राफिक आयलँड प्रस्तावित असून त्याची कार्यवाही नसल्याने कोरडगाव कडून येणाऱ्या वाहनांना हमखास धोका होतो. आतापर्यंत तेथे अनेकांना प्राण गमवावे लागले आहेत येळी कडे वळताना अचानक वळावे लागत असल्याने बरेचसे नवखे वाहन चालक सरळ कोरडगाव कडे निघून जातात. शासन पदोपदी सर्वसामान्य माणसासाठी विविध विकास योजनांची अंमलबजावणी करते. बेजबाबदार अधिकाऱ्यांमुळे लोकप्रतिनिधींनाही लोकांच्या तीव्र संतापाला सामोरे जावे लागते. याबाबत तातडीने सुधारणा न झाल्यास पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व आ. मोनिका राजळे यांच्या उपस्थितीत राष्ट्रीय महामार्ग अधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांचे संयुक्त बैठक आयोजित करण्यात येईल.

दैनिक
राष्ट्र सह्याद्री
बुधवार दि.०८ जुलै २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

# पोहेगावात बिबट्याचा हल्ला; तीन कालवडी ठार

## बिबट्यानंतर मृत कालवडीवर तरसांचाही डल्ला

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : कोपरगाव तालुक्यातील पोहेगाव येथील पाटील मळा रोहमारे वस्ती परिसरात बिबट्याची दहशत पुन्हा एकदा समोर आली आहे. ६ जुलैच्या मध्यरात्री मुसळधार पाऊस सुरू असताना बिबट्याने थेट शेतकऱ्याच्या गोठ्यावर हल्ला चढवत तीन कालवडींचा फडशा पाडल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



मयूर बाळासाहेब रोहमारे यांच्या गोठ्यावर हा हल्ला झाला. सकाळी गोठ्यात तीन कालवडी मृतावस्थेत आढळून आल्याने कुटुंबीयांना मोठा धक्का बसला. घटनेची माहिती मिळताच वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. वन विभागाच्या अधिकारी निकिता पगारे यांनी प्राथमिक पाहणीनंतर हा हल्ला बिबट्या व त्याच्या पिल्लाने केल्याचे निदर्शनास आल्याची माहिती दिली. तसेच, बिबट्याने केलेल्या शिकारीवर नंतर तरसानेही डल्ला मारल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले.

या घटनेनंतर पोहेगाव परिसरातील शेतकरी आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून रात्रीच्या वेळी शेतात किंवा गोठ्याजवळ जाण्यास नागरिक धास्तावले आहेत. परिसरात बिबट्याचा मुक्त संचार सुरू असल्याने जनावरांसह मानवी जीवितालाही धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

शेतकरी मयूर रोहमारे यांनी झालेल्या नुकसानीची भरपाई तातडीने देण्यात यावी, तसेच पाटील मळा परिसरात बिबट्याला जेरबंद करण्यासाठी त्वरित पिंजरा लावावा, अशी मागणी वन विभागाकडे केली आहे. दरम्यान, वन विभागाने नागरिकांना रात्रीच्या वेळी एकटे बाहेर न पडण्याचे, जनावरे सुरक्षित गोठ्यात बांधण्याचे आणि बिबट्याचा वावर आढळल्यास तात्काळ वन विभागाला माहिती देण्याचे आवाहन केले आहे.

# नान्नजमध्ये कोल्ह्याच्या हल्ल्यात वृद्ध जखमी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड** : तालुक्यातील नान्नज येथे कोल्ह्याच्या हल्ल्यात ७० वर्षीय युसुफ कुरेशी हे गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. या प्रकारामुळे गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये घबराट पसरली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी सायंकाळी युसुफ कुरेशी हे घराजवळ असताना अचानक एका कोल्ह्याने त्यांच्या हाताचा चावा घेतला. हल्ल्यानंतर गावातील कुत्र्यांनी कोल्ह्याचा पाठलाग केल्याने तो चांभार गल्लीमार्गे शेताच्या दिशेने पळून गेला. या घटनेची चर्चा रात्रीभर गावात सुरू होती. शनिवारी सकाळी जखमी कुरेशी यांना नान्नज प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले. त्यानंतर पुढील उपचारासाठी जामखेड ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे वैद्यकीय अधिकारी डॉ. कुंडलिक अवसरे यांनी प्राथमिक उपचार केले. कोल्ह्याच्या चाव्यावरील आवश्यक प्रतिबंधक लस जिल्हा रुग्णालयात उपलब्ध असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी अहिल्यानगर जिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आले. घटनेची माहिती मिळताच कर्जत वनपरिक्षेत्र अधिकारी स्मिता हराळ यांच्या मार्गदर्शनाखाली जामखेडचे वनपाल आर. एस. राठोड आणि सेवानिवृत्त वनमजूर ताहेरअली सय्यद यांनी ग्रामीण रुग्णालयात भेट देऊन जखमीला आवश्यक मदत केली. दरम्यान, वन विभागाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले असून कोल्हा आढळल्यास तत्काळ माहिती देण्याचे सांगितले आहे.

# विकासकामाचा बोजवारा: पहिल्याच पावसात पढेगावमधील रस्ता वाहून गेला

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**




**श्रीरामपूर** : पढेगाव वार्ड क्रमांक ३ मध्ये विकासकामांतर्गत खोदण्यात आलेल्या रस्त्याची पहिल्याच पावसात दुरवस्था झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने विद्यार्थी, नागरिक आणि वाहनचालकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. संबंधित कामातील निष्काळजीपणामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून, एखादी दुर्घटना घडल्यास त्यास जबाबदार कोण, असा सवाल उपस्थित होत आहे. पडेगाव सोसायटीचे चेअरमन रणजीत बनकर यांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर टीका करत संबंधित दोषी अधिकारी व ठेकेदारांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच रस्त्याची त्वरित दुरुस्ती करून सुरक्षित वाहतुकीची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली. अन्यथा ग्रामस्थांच्या तीव्र आंदोलनाला प्रशासनाला सामोरे जावे लागेल, असा इशाराही त्यांनी दिला. गावातील नागरिकांनीही रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे.

# एसटीची इंडिका कारला जोरदार धडक; तिघे गंभीर जखमी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हार** : राहुरी तालुक्यातील कोल्हार खुर्द येथील हॉटेल प्रसादजवळ सोमवारी (दि. ७) सायंकाळी सुमारे ४ वाजण्याच्या सुमारास एसटी महामंडळाच्या बसने विरुद्ध दिशेने येत इंडिका व्हिस्टा कारला जोरदार धडक दिल्याची घटना घडली. या अपघातात कारमधील तिघेजण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर प्रवरा मेडिकल ट्रस्ट रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, एमएच १७ एजे २८१५ क्रमांकाची इंडिका व्हिस्टा कार राहुरीहून कोल्हारच्या दिशेने जात होती. त्यावेळी पुण्याकडे जाणाऱ्या सिंदखेडा-पुणे मार्गावरील एमएच १४ एलएक्स ९८१८ क्रमांकाच्या एसटी बसने कारला समोरून धडक दिली. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, कोल्हार-राहुरी मार्गावरील खड्डे चुकविण्यासाठी बसचालक विरुद्ध दिशेने वाहन चालवत होता. त्यामुळे समोरून येणाऱ्या कारचालकाला बसचा अंदाज न आल्याने हा अपघात घडल्याचा दावा नागरिकांनी केला आहे. अपघातानंतर बसचालक



घटनास्थळावरून पसार झाल्याचे सांगण्यात आले. जखमींना निखिल भोसले व रवी देवगिरे यांच्या रुग्णवाहिकेतून तातडीने प्रवरा मेडिकल ट्रस्ट रुग्णालयात दाखल करण्यात आले. या अपघातात राजू शेख, कदीर शेख व नजीर गुलाब सय्यद (रा. ममदापूर) हे गंभीर जखमी झाले असून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. अपघातामुळे काही काळ वाहतुकीची कोंडी झाली होती.

जेसीबीच्या सहाय्याने अपघातग्रस्त वाहने रस्त्याच्या बाजूला करून वाहतूक सुरळीत करण्यात आली. घटनेची माहिती मिळताच राहुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख हे पोलीस पथकासह घटनास्थळी दाखल झाले. या प्रकरणाचा पुढील तपास राहुरी पोलीस करीत आहेत.

# न्याय न मिळाल्यास बेलापूर सबस्टेशनच्या दारात गणेशचा 'दशक्रियाविधी'!

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : महावितरण कंपनीच्या भोंगळ आणि निष्काळजी कारभारामुळे एका प्रामाणिक कंत्राटी वायरमनला आपला जीव गमवावा लागल्याची धक्कादायक व दुर्दैवी घटना बेलापूर सबस्टेशन अंतर्गत घडली आहे. उच्च दाबाच्या वीज प्रवाहाचा जोरदार धक्का लागल्याने कंत्राटी वायरमन गणेश बाळासाहेब थोरात (वय २८, रा. उक्कलगाव) यांचा जागीच मृत्यू झाला. ही हृदयद्रावक घटना मंगळवारी (दि. ३० जून) सकाळी १० वाजेच्या सुमारास घडली होती.

या घटनेला आठ दिवस उलटूनही कारणीभूत ठरलेल्या बेजबाबदार ऑपरेटरवर अद्याप गुन्हा दाखल न झाल्याने मृत गणेश यांच्या नातेवाईकांसह उक्कलगाव ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहेत. जर तात्काळ गुन्हा दाखल करून न्याय मिळाला नाही, तर बेलापूर ( ता.श्रीरामपूर ) येथील महावितरण कंपनीच्या सबस्टेशनच्या दारातच गणेशचा दशक्रिया विधी केला जाईल, असा जाहीर इशारा नातेवाईकांसह ग्रामस्थांनी पावित्रा घेतला आहे. मयत गणेश थोरात हे गेल्या ११ वर्षांपासून 'प्रथमेश इलेक्ट्रिकल्स, संगमनेर' यांच्यामार्फत बेलापूर महावितरण कंपनीमध्ये कंत्राटी वायरमन म्हणून कार्यरत होते. त्यांच्याकडे उक्कलगाव आणि एकलहरे या दोन गावांची जबाबदारी होती. नेहमीप्रमाणे मंगळवारी सकाळी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सूचनेवरून गणेश बेलापूर सबस्टेशन येथे कामावर गेले होते.

तेथील एका पोलवर त्यांना दुरुस्तीचे काम सांगण्यात आले होते. काम सुरू करण्यापूर्वी गणेश यांनी सबस्टेशनमध्ये हजर असलेला कंत्राटी ऑपरेटर भोकरे (रा. वळदगाव) याच्याकडे किती फिडर चालू आहेत आणि कोणत्या फिडरवर काम करायचे आहे? याची रीतसर चौकशी केली होती. मात्र, ऑपरेटर भोकरे याने चालू फिडरबाबत कोणतीही स्पष्ट माहिती न देता अत्यंत हलगर्जीपणा केला. याच निष्काळजीपणामुळे गणेश यांचा उच्च दाबाच्या वीज प्रवाहाचा धक्का लागून जागीच मृत्यू झाला. एवढी मोठी आणि गंभीर घटना घडूनही महावितरण कंपनी आणि संबंधित ठेकेदार या दोषी ऑपरेटरला पाठीशी घालत असल्याचा थेट आरोप नातेवाईकांनी केला आहे. विशेष म्हणजे, घटना घडून आठ दिवस झाले तरी महावितरणच्या वरिष्ठ पातळीवर या संदर्भात अद्याप कोणताही



अधिकृत अहवाल पाठवला गेला नसल्याचे समोर आले आहे.

यावरून महावितरण या प्रकरणावर पडदा टाकण्याचा प्रयत्न करत आहे का? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. ही घटना मन हेलावून टाकणारी आहे. अवघ्या पाच वर्षांपूर्वीच गणेश यांच्या भावाचे एका दुर्दैवी घटनेत निधन झाले होते. त्यानंतर गणेश हाच कुटुंबाचा एकमेव कमावता आधार होता. केवळ एक वर्षापूर्वीच गणेश यांचा विवाह झाला होता. त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, चुलते आणि दोन चुलत भाऊ असा परिवार आहे. अत्यंत प्रामाणिक आणि मनमिळाऊ स्वभावामुळे गणेश यांनी अल्पवधीतच उक्कलगाव आणि एकलहरे ग्रामस्थांची मने जिंकली होती. त्यांच्या अशा अचानक जाण्याने संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. या प्रकरणात दोषींवर तात्काळ कडक कारवाई व्हावी आणि मयत गणेश यांच्या कुटुंबाला न्याय मिळावा यासाठी नातेवाईक आणि ग्रामस्थांनी प्रशासनाकडे धाव घेतली आहे.

या संदर्भात राज्याचे महसूल व पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, आमदार हेमंत ओगले, अपर पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक आणि महावितरण कंपनीचे मुख्य अभियंता यांना रीतसर निवेदने देण्यात आली आहेत. आता या संवेदनशील प्रकरणाची पोलीस प्रशासन आणि महावितरणचे वरिष्ठ अधिकारी दखल घेतात की उक्कलगावकरांचा रोष आणखी तीव्र होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या जयघोषाने अवघी राजुरी नगरी दुमदुमली

## संतश्रेष्ठ श्री निवृत्तीनाथ महाराज पालखीचे राजुरीत अभूतपूर्व स्वागत

**योगेश कडसकर | राष्ट्र सह्याद्री**

**राजुरी** : संतश्रेष्ठ श्री निवृत्तीनाथ महाराज यांच्या पवित्र पालखी सोहळ्याचे राहाता तालुक्यातील राजुरी येथे अत्यंत भक्तिमय, शिस्तबद्ध आणि उत्साही वातावरणात स्वागत करण्यात आले. पालखीच्या आगमनाने संपूर्ण परिसर विठू नामाच्या गजरात आणि ज्ञानोबा-तुकाराम, निवृत्तीनाथ महाराज की जय अशा जयघोषांनी दुमदुमून गेला होता. गावातील नागरिक, वारकरी, महिला, युवक तसेच विविध सामाजिक व धार्मिक संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी पालखीवर पुष्पवृष्टी करून विठ्ठल चरणी माथा टेकवला.

पालखी आगमनानिमित्त राजुरी गावातील प्रमुख मार्ग आकर्षक रांगोळ्या, भगवे ध्वज आणि नयनरम्य फुलांच्या सजावटीने सजवण्यात







आले होते. पारंपरिक टाळ-मृदुंगाच्या गजरात, सुश्राव्य भजन-कीर्तन आणि हरिनाम संकीर्तन करत वारकरी राजुरीत दाखल झाले. गावातील माता-भगिनींनी जागोजागी पालखीचे आणि दिंड्यांचे औक्षण केले, तर हजारोंच्या संख्येने उपस्थित भाविकांनी दर्शनासाठी दर्शनी रांगा लावल्या होत्या. ग्रामस्थांतर्फे वारकऱ्यांची सेवा राजुरी ग्रामस्थांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही वारकरी भाविकांसाठी उत्कृष्ट नियोजन करण्यात आले होते. सोहळ्या दरम्यान वारकऱ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून खालील सेवा पुरवण्यात आल्या आहेत. सर्व वारकऱ्यांसाठी सकस अल्पोपहार आणि भोजनाची व्यवस्था, जागोजागी पाण्याचे स्टॉल्स,आरोग्य सेवा,आपत्कालीन परिस्थितीसाठी विशेष वैद्यकीय मदत केंद्र आणि रुग्णवाहिका तैनात करण्यात आली आहे.

पालखी सोहळ्यामुळे राजुरी परिसरात भक्ती, श्रद्धा आणि अध्यात्माचा त्रिवेणी संगम पाहायला मिळाला. या अविस्मरणीय सोहळ्याने संपूर्ण गावाला तृप्त केले आहे.स्थानिक ग्रामस्थ व लोकप्रतिनिधी,या सोहळ्यात गावातील ज्येष्ठ नागरिक, लोकप्रतिनिधी, विविध संस्थांचे पदाधिकारी आणि परिसरातील हजारो भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. अतिशय शिस्तबद्ध आणि शांततेत हा सोहळा पार पडला.आज बुधवारी सकाळी राजूरी येथून पालखी श्रीरामपूर दिशेने मार्गस्थ होईल.

# टिकावाने मारहाण; तरुण जखमी, जीवे मारण्याची धमकी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील पिंप्री अवघड येथे कोणतेही कारण नसताना शेजाऱ्याने लोखंडी टिकावाने हल्ला करून एका तरुणाला जखमी केल्याची घटना ५ जुलै रोजी सायंकाळी घडली. या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भाऊसाहेब लक्ष्मण पवार (वय ३५, रा. पिंप्री अवघड, ता. राहुरी) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. ५ जुलै रोजी सायंकाळी सुमारे ७ वाजण्याच्या सुमारास भाऊसाहेब पवार हे घरासमोर उभे असताना शेजारी राहणारा आरोपी आबुसाहेब साहेबराव बर्डे हा लोखंडी टिकाव घेऊन तेथे आला. कोणतेही कारण नसताना त्याने पवार यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यानंतर टिकावाने वार करून त्यांना जखमी केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. हल्ल्यानंतर आरोपीने तुला व तुझ्या घरच्यांना जिवंत मारून टाकीन, अशी धमकीही दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. जखमी पवार यांनी राहुरी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर आरोपी आबुसाहेब साहेबराव बर्डे (रा. पिंप्री अवघड, ता. राहुरी) याच्याविरुद्ध गुन्हा रजिस्टर क्रमांक ७६५/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ३५१(२) व ३५२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# नळ तोडल्याची विचारणा केल्याच्या वादातून वृद्ध महिला वीट मारल्याने जखमी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील गोटूंबे आखाडा येथे पाण्याचा नळ तोडल्याच्या कारणावरून झालेल्या वादात एका महिलेने ६० वर्षीय महिलेला वीट फेकून मारून जखमी केल्याची घटना ५ जुलै रोजी सकाळी घडली. याप्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सुशीला मोहन खैरे (वय ६०, रा. गोटूंबे आखाडा, ता. राहुरी) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांच्या घराशेजारी स्वाती अरुण घोडके या कुटुंबासह राहतात. ५ जुलै रोजी सकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास सुशीला खैरे या घरासमोर उभ्या असताना स्वाती घोडके यांनी तू आमचा पाण्याचा नळ का तोडला? अशी विचारणा करत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. यावेळी सुशीला खैरे यांनी, मी तुझा नळ तोडलेला तू पाहिलास का? असे विचारत आरोप फेटाळून लावला. याचा राग आल्याने स्वाती घोडके यांनी वीटेचा तुकडा फेकून मारल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या हल्ल्यात सुशीला खैरे जखमी झाल्या. या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात आरोपी स्वाती अरुण घोडके यांच्याविरुद्ध गुन्हा रजिस्टर क्रमांक ७६२/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम १२५(अ) व ३५२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# मध्यप्रदेशातून श्रीरामपूरात पिस्तूल विक्री पिस्तूल व काडतुसांसह चौघे जेरबंद

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : मध्यप्रदेशातून श्रीरामपुरात पिस्तूल विक्रीसाठी आणलेल्या चौघांना पिस्तूल आणि जिवंत काडतुसांसह श्रीरामपूर पोलिसांनी जेरबंद केले.या कारवाईत पोलिसांनी ५ लाख ९५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलिसानी दिलेल्या माहितीनुसार, श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये वाकडी ते श्रीरामपूर ररत्यावर चार इसम इटिंगा गाडीतून गावठी कट्टा (पिस्तूल) विक्रीसाठी घेवून येणार असल्याची माहिती पोलिसांना समजली. तेव्हा पोलिसांना मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीस पथक सापळा लावला असता तेव्हा एक इटिंगा गाडी क्र.(एमएच ४८ ए.के ७७६३ ) श्रीरामपूरच्या दिशेने येताना दिसली. पोलिसांनी सदरचे गाडी हात दाखवून थांबवली व चालकाची विचारपूस केली.या गाडीत सागर दत्तू उपळकर (चालक), विशाल रामकिसन गुंजाळ, ऋतीक भगवान गुंजाळ व पवन गोरख उपळकर, (सर्व जण रा.रामपूर, ता.श्रीरामपूर) हे सर्व गाडीत होते. तेव्हा पोलिसांनी गाडीची झडती घेऊन त्या गाडीत ड्रायव्हरच्या सिटखाली लोखंडी गावठी पिस्तूल तसेच दोन जिवंत काडतुसे आढळून आले.

तेव्हा पोलिसांनी इटिंगा गाडीसह चौघांना जेरबंद केले. त्यांच्याकडून ४० हजारांचा गावठी कट्टा, चार हजारांचे दोन जिवंत काडतुसे, २५ हजारांचा विवो कंपनीचा मोबाईल, १६ हजार ४०० रू. किंमतीचा आणखी एक मोबाईल तसेच तिसऱ्या व्यक्तीकडून १० हजारांचा मोबाईल आणि ५ लाखांची इर्टिगा गाडी असा ५ लाख ९५ हजारांचा मुद्देमाल ताब्यात घेतला. याप्रकरणी पो.कॉ. रमीजराजा रफीक अत्तार यांच्या फिर्यादीवरून सागर दत्तू उपळकर (चालक), विशाल रामकिसन गुंजाळ, ऋतीक भगवान गुंजाळ व पवन गोरख उपळकर (सर्व रा.रामपुर ) यांच्याविरूद्ध श्रीरामपूर शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास श्रीरामपूर शहर पोलीस करीत आहेत.

# श्रीरामपूरात भर बाजारपेठेत एकास टोळक्याकडून मारहाण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : शहरात मध्यवस्तीतील धान्य गल्लीमध्ये सोमवारी संध्याकाळी एका तरूणाला पाच ते सहा जणांच्या टोळक्याने लाठ्या, काठ्या, दांड्याने बेदम मारहाण करण्याचा प्रकार घडला. त्यामुळे धान्य गल्ली,सोनारगल्ली परिसरात संध्याकाळी एकच खळबळ उडाली होती. याबाबतची अधिक माहिती अशी की, विशाल जालिंदर धनवटे, ( वय २९) हा आपल्या मित्रासमवेत धान्य गल्ली रोडवर उभा होता. त्यावेळी अचानक चार-पाच जणांचे टोळके त्याठिकाणी आले, व त्यांनी विशाल धनवटे यांच्यावर हल्ला केला. चार-पाच जणांनी मिळून धनवटे याला बेदम मारहाण करत होते.

यात काहींच्या हातात लोखंडी पाईप होते. अचानक झालेल्या हल्ल्यामुळे धान्य गल्ली परिसरात एकच खळबळ उडाली. मारहाण करणाऱ्यांनी शिवीगाळ करत धनवटे याला मारून जखमी केले. याचवेळी मागील काहीतरी कारणावरून धनवटे याला मारले असावे, असा अंदाज बांधला जात होता कारण या ठिकाणी मारहाण करणाऱ्यांनी धनवटे याचा एक व्हिडीओ काढला, त्या व्हिडीओत धनवटे याला माफी मागायला लावल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. त्यामुळे हा प्रकार नेमका कोणत्या कारणात्व प्रकार



घडला आणि आरोपी कोण होते? मात्र कारण समजू शकले नाही. विशाल धनवटे याला बेदम मारहाण केल्यानंतर आरोपी त्या ठिकाणाहून फरार झाले. धनवटे याला तातडीने कामगार रूग्णालयात दाखल करण्यात आले. त्या ठिकाणी धनवटे याच्या डोक्याला, कानाला, पायाला इजा असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. याबाबत हा प्रकार कशामुळे घडला याबाबत अद्याप माहिती मिळू शकली नाही. मात्र, जखमी धनवटे जबाब घेवून पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते.पोलीस आरोपींना शोधत असल्याचे त्यांनी पोलीस सुत्रांनी सांगितले.